CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २६८ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि केवळ योजना करून आणि कार्यकर्त्यांना नेमून सेवाकार्य सफल होत नाही. सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात आपल्या वंचित बंधू-भगिनींची दुर्दशा पाहून वेदना उत्पन्न झाली पाहिजे. तरच ठोस काम होईल आणि वंचित बांधवांच्या जीवनातही आवश्यक ते परिवर्तन झालेले दिसेल.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



सामाजिक अन्यायाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष करणारे महात्मा जोतिबा फुले यांची आज पुण्यतिथी

## ‘एससी-एसटी अत्याचार प्रतिबंधक’च्या धर्तीवर
# दिव्यांगांसाठी कायदा करा

**● सर्वोच्च न्यायालयाचा केंद्राला निर्देश ● अपमान-थट्टा करणारी टिप्पणी गुन्हेगारी कृत्य**

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

दिव्यांग, दुर्मिळ अनुवंशिक आजारांनी ग्रस्त असणाऱ्या व्यक्तीची थट्टा, अपमान करणे आणि त्यांच्यासंदर्भात अवमानकारक टिप्पणी करणाऱ्या चित्रफित समाज माध्यमांवर प्रसारित करणे गुन्हेगारी कृत्य आहे. कायद्यात तरतुदीचा अभाव असल्याने अशा प्रकरणातील व्यक्तीला कठोर शिक्षा करता येत नाही. दिव्यांगांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ धर्तीवर नवीन कायदा करा, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिला.



इंडियाज गॉट लॅटेंट कार्यक्रमात सूत्रसंचालक समय रैना आणि विपुन गोयल, बलराज परविंदर सिंग घई, सोनाली ठक्कर आणि निशांत जगदीश तंवर यासारख्या समाज माध्यम प्रभावकांनी दिव्यांगावर अपमानकारक टिप्पणी केली होती. यावर आक्षेप घेत स्पायनल मस्क्युलर अॅट्रोफी आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांसाठी काम करणारी संस्था एसएमए क्युअर फाउंडेशनने दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने गुरुवारी सुनावणी घेतली.

याचिकाकर्त्यांच्या वकील अपराजिता सिंह यांनी युक्तिवादात म्हटले की, कार्यक्रमात समय रैनाने या मुलांची थट्टा केली. ही सर्व मुले अत्यंत प्रतिभावान आहेत. समाज माध्यम प्लॅटफॉर्मवर अशा टिप्पण्या केल्या जातात तेव्हा अशा मुलांच्या मदतीसाठी निधी उभारणे कठीण होते. दिव्यांग व्यक्तीवर टिप्पणी करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायला हवी. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले, रैनाने स्पाइनल मस्क्युलर अॅट्रोफीने ग्रस्त असलेल्यांसाठी एक कार्यक्रम आयोजित करावा. या व्यक्तींना तुमचे पैसे नको, त्यांना प्रतिष्ठा आणि आदर हवा आहे. केंद्र सरकारने दिव्यांगांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी एससी-एसटी कायद्यातील तरतुदींप्रमाणेच कायदा करावा. ज्यामध्ये एखाद्याचा अपमान केल्याबद्दल शिक्षेची तरतूद असावी. यावर केंद्र सरकारची बाजू मांडणारे महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी सरन्यायाधीशांच्या निर्देशाचे पालन केले जाईल अशी हमी दिली. (वृत्तसंस्था)

### नियमन करण्यासाठी स्वायत्त संस्था हवी

**न्यायासनाने म्हटले की ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरील अश्लील, आक्षेपार्ह किंवा बेकायदेशीर सामग्रीचे नियमन करण्यासाठी एक तटस्थ, स्वतंत्र आणि स्वायत्त संस्था आवश्यक आहे. यावर केंद्र सरकारची बाजू मांडताना तुषार मेहता म्हणाले, विनोद एखाद्याच्या प्रतिष्ठेच्या किंमतीवर असू शकत नाही. माहिती आणि प्रसारण मंत्रालय काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करीत आहेत. यावर न्यायासन म्हणाले, मंत्रालयाने सार्वजनिक चर्चेसाठी ही मार्गदर्शक तत्त्वे जारी करावी.**



उत्तरप्रदेशातील मिर्झापूर येथे ‘एसआयआर’ फॉर्म भरून घेताना बीएलओ

# एसआयआर प्रक्रियेत हस्तक्षेप करणार नाही

**सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केली भूमिका**

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

निवडणूक आयोगाला संपूर्ण भारतात मतदार यादी अद्ययावत करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. मतदार यादी पुनरीक्षण अर्थात् एसआयआर प्रक्रियेत आम्ही हस्तक्षेप करणार नाही. याद्यांमध्ये विसंगती आढळल्यास त्या दुरुस्त कराव्यात, अशी भूमिका स्पष्ट करीत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारच्या सुनावणीत याचिकाकर्त्यांची एसआयआर प्रक्रिया रोखण्याची मागणी फेटाळून लावली.

केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगालसह १२ राज्यांनी दाखल केलेल्या याचिकेतून एसआयआरच्या संवैधानिक वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत ही प्रक्रिया रद्द करावी अशी मागणी केली. वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने सुनावणीवेळी एसआयआरच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे युक्तिवाद फेटाळून लावले. युक्तिवादत सिब्बल यांनी म्हटले की, एखादी व्यक्ती भारतीय नागरिक आहे की नाही हे ठरवणारा निवडणूक आयोग कोण, आधार कार्डमध्ये निवासस्थान आणि जन्मतारीख असते, त्यामुळे भारतीय नागरिकत्वाचा पुरावा देण्यासाठी इतर दस्तावेजाची आवश्यकता नाही, ही प्रक्रिया नागरिकांचे अधिकार हिरावून घेणारी आहे.

यावर सरन्यायाधीश म्हणाले, निवडणूक प्रक्रियेत घुसखोरांचा सहभाग रोखण्यासाठी आणि मतदार याद्यांतील त्रुटी दूर करण्यासाठी एसआयआर प्रक्रिया गरजेची आहे, त्यामुळे आम्ही त्यात हस्तक्षेप करणार नाही. निवडणूक आयोगाला ही प्रक्रिया राबविण्याचा संवैधानिक अधिकार आहे. (वृत्तसंस्था)

### निवडणूक आयोग डाक कार्यालय नाही

अर्ज क्रमांक ६ स्वयंचलितपणे स्वीकारले जावे, अशी मागणी याचिकाकर्त्यांच्या वकिलाने केली, यावर न्यायासन म्हणाले, निवडणूक आयोग डाक कार्यालय नाही. अर्ज ६ अंतर्गत जमा केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्याचा आणि त्यांची सत्यता पडताळण्याचा पूर्ण अधिकार आयोगाला आहे. याप्रकरणाची सुनावणी शुक्रवारी सुरूच राहणार आहे.

# ‘जमात-ए-इस्लामी’वर काश्मिरात धाडसत्र

**पाच जिल्ह्यांत २० हून अधिक ठिकाणी कारवाईचा धडाका | अनेक ठिकाणांची झडती, संशयितांची चौकशी**



जमातशी संबंध असल्याचा संशय असलेल्या पुलवामा येथील सदस्याच्या घराची झडती घेण्यात आली

◆ **जम्मू, २७ नोव्हेंबर**

जम्मू-काश्मीरमधील पाच जिल्ह्यांमध्ये गुरुवारी पोलिस आणि सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणावर शोध मोहीम राबवली. बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामी या संघटनेचे सदस्य असलेल्या नागरिकांच्या घरांची आणि कार्यालयाची झडती यावेळी घेण्यात आली आहे.

खोऱ्यातील सुरक्षा मोहिमेअंतर्गत शोपियां, पुलवामा, श्रीनगर, बारामुल्ला आणि कुलगाममध्ये झडती घेण्यात आली आहे. या दरम्यान, पोलिस पथकांनी पडताळणी केली आणि अनेक लोकांची चौकशीही केली. या मोहिमेचा उद्देश बंदी घातलेल्या संघटनांना पुन्हा सक्रिय होण्यापासून रोखणे, दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांचे जाळे नष्ट करणे, भूमिगत सदस्यांची ओळख पटवून त्यांना संपविणे आणि दहशतवाद्यांना आर्थिक आणि साधनसुविधांची मदत करणाऱ्यांवर कारवाई करणे हा आहे. परिसरात बेकायदेशीर हालचाली आढळल्यास कारवाई केली जाईल. (वृत्तसंस्था)

### काय आहे जमात-ए-इस्लामी?

● जमात-ए-इस्लामीची स्थापना १९४१ मध्ये सय्यद अबुल अला मौदूदीने ब्रिटिश भारतात केली होती. ● १९४७ च्या फाळणीनंतर संघटनेची जमात-ए-इस्लामी पाकिस्तान आणि जमात-ए-इस्लामी हिंद विभागणी ● सर्वात अलिकडील बंदी २०१९ मध्ये लादण्यात आली होती, जी फेब्रुवारी २०२४ मध्ये आणखी पाच वर्षांसाठी वाढवण्यात आली. ● संघटनेवर राष्ट्रविरोधी, फुटीरतावादी कारवाया आणि हिजबुल मुजाहिदीनसारख्या दहशतवादी गटांशी संबंध असल्याच्या आरोपांमुळे २०१९ पासून बंदी घालण्यात आली.

# यूट्यूब पाहण्यासाठी लागणार आधार कार्ड?

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

नेटफ्लिक्स आणि यूट्यूबसारख्या प्लॅटफॉर्मवर असलेल्या अश्लील कंटेटवरून आता सर्वोच्च न्यायालय कठोर भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत. अश्लील सामग्री पाहण्यासाठी आधार कार्ड गरजेचे असायला हवे, अशी शिफारस सरन्यायाधीशांनी केली आहे. यामुळे अल्पवयीन मुलांना चुकीच्या कंटेटपासून दूर ठेवता येईल, असे न्यायालयाला वाटते. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या घटनापीठाने ही शिफारस केली आहे. प्रेक्षकांना केवळ इशारा देणे पुरेसे नाही. जोपर्यंत प्रेक्षक सूचना वाचतात, तोपर्यंत तो कार्यक्रम सुरू झालेला असतो. त्यामुळे वय पडताळणीसाठी आधारचा वापर एक चांगला पर्याय असू शकतो, असे मत सूर्य कांत यांच्या घटनापीठाने व्यक्त केले. कॉमेडियन आणि पॉडकास्टर यांच्या विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणी सुरू होती. त्यात समय रैना आणि रणवीर अलाहबादिया यांच्या नावांचा समावेश आहे. न्यायालयाने दिव्यांगांच्या अपमानाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ मनमानी करणे असा होत नाही. यासाठी एखाद्या नियमन संस्थेची आवश्यकता असल्याचे न्यायालयाने म्हटले. (वृत्तसंस्था)





**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहिल्या टी-२० विश्वचषकाच्या विजेत्या भारतीय दिव्यांग महिला क्रिकेट संघाचे स्वागत केले. भारतीय संघाने श्रीलंकेत झालेल्या पहिल्या दिव्यांग महिला टी-२० विश्वचषकात अंतिम फेरीत नेपाळला सात गड्यांनी हरवून इतिहास घडविला. या खेळाडूंमध्ये सोलापूरच्या गंगा कदम हिचा समावेश आहे.**

## महत्त्वाचे

### नफा वसुलीमुळे बाजार सपाट

**मुंबई** : चढ-उतारांनी भरलेल्या दिवसानंतर भारतीय शेअर बाजार किंचित वाढीसह हिरव्या निशाणीवर बंद झाला. निर्देशांक, निफ्टी दोन्ही निर्देशांकांनी व्यवहारादरम्यान आपले सर्वकालीन उच्चांक गाठले. परंतु, वरच्या स्तरावर नफा वसुलीमुळे बाजार अखेरीस सपाट बंद झाला. निर्देशांक १११ अंकांनी वाढून ८५७२० वर बंद झाला तर निफ्टी १० अंकांच्या किरकोळ वाढीसह २६२१५ वर बंद झाला. बाजारातील निर्देशांक सपाट स्तरावर बंद झाल्याने गुंतवणूकदारांच्या संपत्तीत घट झाली. मुंबई बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४७४.३९ लाख कोटींपर्यंत खाली आले.

### एप्रिलपासून सात दिवसांत क्रेडिट स्कोअर अपडेट होणार

**नवी दिल्ली** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशाच्या कर्ज (लोन) संरचनेला मजबूत करण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी मसुदा मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. ही १ एप्रिल २०२६ पासून लागू होतील. आता क्रेडिट स्कोअर अपडेट होण्यासाठी जास्त वाट पाहावी लागणार नाही. सर्व क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्यांना (सीआयसीएस) दर सात दिवसांनी क्रेडिट स्कोअर अपडेट करावा लागेल.

### कॅनडामध्ये लुधियानाचे चार लोक जिवंत जळाले

**ओटावा** : पंजाबमधील लुधियाना येथील रहिवासी असलेल्या चार लोकांचा कॅनडामध्ये आगीत होरपळून मृत्यू झाला. चौघेही एकाच कुटुंबातील सदस्य होते. ते अनेक वर्षांपासून कॅनडातील ब्रॅम्पटन शहरात राहत होते. या घटनेची माहिती मिळाल्याने लुधियानामधील त्यांच्या गावातही शोककळा पसरली आहे. ग्रामस्थांच्या मते, त्यांच्या कुटुंबातील बहुतेक लोक कॅनडामध्येच राहतात. अनेक नातेवाईकही कॅनडामध्येच राहत आहेत. कॅनडा पोलीस या अपघाताची चौकशी करत आहेत. आता घटनेनंतर गावातील काही लोकही कॅनडाला जात आहेत. या घटनेशी संबंधित एक व्हिडीओही समोर आला आह

### २२ दिवसांत सात राज्यांमध्ये २५ बीएलओंचा मृत्यू

**नवी दिल्ली** : देशातील १२ राज्यांमध्ये ५१ कोटींहून अधिक मतदारांच्या घरी पोहोचणाऱ्या ५.३२ लाखांहून अधिक बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) वर कामाच्या दबावाचा आरोप वाढत चालला आहे. २२ दिवसांत सात राज्यांमध्ये २५ बीएलओंच्या मृत्यूमुळे चिंता वाढली आहे. या मृत्यूंवर राजकारण तापले आहे.



# डिजिटल माध्यमांनी जबाबदारीने बातमी करणे गरजेचे

**● तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलचे उद्घाटनप्रसंगी राज्य डिजिटल पत्रकार संघाचे अध्यक्ष राजा माने यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

सध्या जग पुढे चालले आहे माध्यम वेगवेगळ्या रूपाने समोर येत आहेत. या माध्यमांचा हत्याराप्रमाणे वापर करायचा असेल तर डिजिटल माध्यमांनी जबाबदारीने बातमी प्रसारित करणे, बातमीची संपूर्ण माहिती शहानिशा करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य डिजिटल पत्रकार संघाचे अध्यक्ष राजा माने यांनी केले. गुरुवारी दैनिक तरुण भारतच्या होटगी रोड येथील कार्यालयात सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी समूह संपादक दिलीप पेठे, श्री. दुलंगे, मुख्य संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बिनगुंदगी, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायणी आदी उपस्थित होते. यावेळी माने पुढे म्हणाले, कोरोना काळानंतर माध्यमांची वेगवेगळी रूप नव्या शस्त्राप्रमाणे पुढे आली आहेत. त्या शस्त्रांचा वापर आपण समाजाच्या हितासाठी करायला हवा. ब्रेकिंग न्यूजला प्रचंड महत्त्व असले तरी ब्रेकिंग न्यूज देत असताना त्याची शहानिशा करणे, सत्य मांडणे वास्तवाचे भान ठेवणे ही बातमीदारी प्रामाणिकपणे करता आली पाहिजे. एआयच्या पुढचे जरी कोणते माध्यम आले तरी बातमीदारीला कोणताच प्रकारचा पर्याय नाही ती करावीच लागणार आहे असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी दिलीप पेठे यांनी नव्या युगाबरोबर अपडेट राहण्यासाठी ही संकल्पना मांडली असल्याचे मत व्यक्त केले. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी तरुण भारतने नव्या काळा प्रमाणे स्वतः बदल करून नवनव्या प्रयोगांना स्पर्श केला आहे, असे मत व्यक्त केले. बिनगुंदगी यांनी लोकल ते ग्लोबल बातम्या देण्याचा एक वेगळा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार असल्याचे मत व्यक्त केले. तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या चॅनेल हेड अश्विनी तडवळकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारतीयांना एकत्र ठेवण्यात संविधानाचे मोलाचे योगदान




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**

१४५ कोटी विविध धर्म व जाती असलेल्या भारतीयांना एकत्र ठेवण्यात भारतीय संविधानाचे योगदान मोलाचे आहे. देशाचा चांगला नागरिक घडला पाहिजे तरच देशाचे रक्षण होईल. चांगला नागरिक बनून देशाचे रक्षण करणे हीच आपणा सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन डॉ.युवराज सुरवसे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या संविधान दिन कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ.अशोक एक्कलदेवी हे अध्यक्षस्थानी होते.

भारतामध्ये असलेल्या धर्मातील विविधता टिकावी, समानता प्रस्थापित व्हावी, कष्टकऱ्यांच्या हिताची जोपासना व्हावी आणि भारत एकसंघ राहावा यासाठी राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत धर्मनिरपेक्षता व समाजवाद हे शब्द समाविष्ट केले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.शंकर राजे, डॉ.ॲनी जॉन, डॉ.टी. एन.शिंदे, प्रा.गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. प्रा.उमाशंकर नादरगी यांनी आभार मानले. याप्रसंगी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## जिजामाता प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा, जिजामाता बालक मंदिर कोंडी येथे संविधान दिन व शहीद दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू यांच्या हस्ते आणि मुख्याध्यापक चंद्रकांत पांडुरंग कुंटेलू यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिमा पूजून करण्यात आले. महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांनी शुभेच्छा संदेश पाठविले.



## जी.पी.फाउंडेशनच्या शिबिरात १०८ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**

शहीद दिन आणि संविधान दिनाचे औचित्य साधून जी.पी.सोशल फाउंडेशनच्या वतीने आसरा चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०८ जणांनी रक्तदान केले. छत्रपती ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष तथा जी.पी.सोशल फाउंडेशनचे संस्थापक इस्माईल मकानदार यांच्या नेतृत्वाखाली या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

पोलिस निरीक्षक सुशांत वराळे, पोउनि अशोक तरंगे, शाम कदम, निखिल भोसले नितीन भोपळे, अरविंद शेळके, गजानन शिंदे यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. सोलापूर ब्लड बँकेने रक्तसंकलन केले. यावेळी बाबा शेख, रियाज शेख, रियाज बागवान, अल्ताफ मुल्ला, असिफ शेख, युवराज गायकवाड, अजीम मकानदार, मुस्तकीम शेख, अली शेख, जुल्फीकर शेख, बालाजी वाघे, रशीद बागवान, हाजी शेख आदी उपस्थित होते.

## जिल्हा न्यायालयात संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सोलापूर विधीज्ज्ञ संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालय येथे संविधान दिन साजरा करण्यात आला.

जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा न्यायाधीश योगेश राणे यांनी संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. संविधानातील न्याय, स्वतंत्र, समता व बंधुता या मुल्यांप्रती निष्ठा राखण्याचा संकल्प करण्यात आला.

दरम्यान, यावेळी रक्तदान शिबीर घेण्यात आले. ॲड.बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले.



## प्राथमिक शिक्षण मंडळात शहिदांना केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

मुंबई येथील २६/११ हल्ल्यात शहीद झालेले पोलिस अधिकारी, कर्मचारी व अन्य शहिदांना सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन करण्यात आले.

प्रशासनाधिकारी मल्हारी माने व मुख्य लिपिक महेजबीन शेख यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. अमोल गायकवाड यांनी संविधानमधील प्रास्ताविकाचे वाचन केले.

याप्रसंगी शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, महेश वालावलकर, सारंग अंजिखाने, अमोल गायकवाड, अविनाश शिंदे, रियाज अत्तार, तरंगिणी कोंडा, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, जाकीर सय्यद, ताहीर बिराजदार, संभाजी घुले, श्रावण भंडारे, वैभव साखरे, भालचंद्र साखरे, सायली ढोले, नाशिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

## पी.बी. ग्रुपच्या वतीने संविधानाच्या उद्देशिकेचे सामुदायिक वाचन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

बुधवार पेठ येथील पी.बी.अर्थात प्रबुध्द भारत ग्रुपच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा पी.बी.ग्रुपचे मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते भगवान गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.



यावेळी श्रीमंत जाधव, भारत बाबरे, गौतम चंदनशिवे, बापू शिंदे, सुखदेव इंगळे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, नितीन बंदपट्टे, बाबा गायकवाड, बाप तळभंडारे, अरविंद गायकवाड, अर्जुन तळभंडारे, अभिजीत कापुरे, धन्ना कापुरे, मनोज थोरात, प्रतीक वाघमारे, प्रतीक चंदनशिवे, विशाल गायकवाड, गुड्डू शिंदे, रवी सकट उपस्थित होते.



## महापालिकेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.२७ नोव्हेंबर-**

संविधान दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पार्क चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथील पुतळ्यास महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, जावेद पानगल, बी.के. तळभंडारे, सुशील सरवदे, के.डी.कांबळे, श्रीनिवास सरवदे, अतुल नागटिळक, विकास सरवदे, महादेव बाबरे, शिवम सोनकांबळे, संजय बाबरे, अजित सरवदे, बापू सदाफुले, लिंगरे, कांबळे, अजितकुमार खानसोळे, गणेश बिराजदार आदी उपस्थित होते.

## भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, इतर मागास विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान व इतर मागास बहुजन कल्याण विभाग सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विजयपूर रोडवरील मुलांचे शासकीय वसातीगृह येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा.धन्यकुमार बिराजदार, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के, श्रीकांत आव्हाड यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

सुनील पवार यांनी प्रास्ताविक केले. मौला शेख, सागर डीडोळे या विद्यार्थ्यांनी संविधान दिनाविषयीची माहिती विशद केली. कार्तिक राठोड याने आभार मानले. यावेळी शितल कंदलगावकर, सचिन कांबळे, सी.के. जाधव, संजय राठोड आदी उपस्थित होते.




## महापालिकेच्या वतीने शहिदांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेले अशोक कामटे, हेमंत करकरे, विजय साळस्कर या पोलिस अधिकाऱ्यांसह राज्य राखीव दलाचे जवान राहुल शिंदे, मेजर संदीप उन्नीकृष्णन आणि अन्य शहिदांना अभिवादन करण्यात आले.

महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील आयुक्त कार्यालयात या सर्व शहिदांच्या प्रतिमेस उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी विभागीय अधिकारी जावेद पानगल, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, सिध्दू तिमिगार, अशोक खडके आदी उपस्थित होते.

## जनविकास क्रांती सेनेच्या वतीने संविधान वाचन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २७ नोव्हेंबर-**

येथील जनविकास क्रांती सेनेच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. मुंबई येथे झालेल्या २६/११ घटनेत शहिद झालेल्यांना यावेळी अभिवादन करण्यात आले.

जनविकास क्रांतीसेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश उपाध्यक्ष अंगद जाधव यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जनविकास क्रांती सेनेचे संस्थापक विष्णू कारमपुरी याप्रसंगी बोलताना म्हणाले, संविधानाचा आधार घेऊन सत्तेवर आलेले मोदी सरकार संविधान हटवण्याचा प्रयत्न करत आहे. हे अत्यंत दुर्दैवी आहे. प्रदेश उपाध्यक्ष अंगद जाधव म्हणाले की, केंद्र सरकारने संविधानाचा गैरअर्थ लावून गोरगरीब, दिनदुबळे, व श्रमिक कामगार वर्गाला देशोधडीला लावण्याचा प्रयत्न करत आहे.

यावेळी ॲड.मुनीनाथ कारमपुरी, रेखा आडकी, श्रीनिवास बोगा, विठ्ठल कुराडकर, गुरुनाथ कोळी, प्रसाद जगताप, प्रकाश डोंगरे, राधिका मिठ्ठा, यल्लप्पा गायकवाड, सविता दासरी, आप्पासाहेब पवार, राणी दासरी, आशिष वाघमारे, लक्ष्मी गुंटला, आनंद कोकणे, रंगरेज राजेंद्र, पद्मा मॅकल, लक्ष्मीबाई ईप्पा, दानम्मा कुरले, सरुबाई कुरले, रामबाई माटेटी, लक्ष्मी रच्चा, लक्ष्मी येमुल आदी उपस्थित होते.

## सुशीलकुमार शिंदे दृष्टीबाधित निवासी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**

एन.ए.बी. संचलित मा.सुशीलकुमार शिंदे दृष्टीबाधित निवासी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या अंधकार्यशाळेत भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी नॅब संस्थेचे उपाध्यक्ष अंकुश कदम, जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत, रियाज मुल्ला, आकांक्षा भंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती.



अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. शिवशरण गडदरे व गुणानंद बिहाडे यांनी डॉ.आंबेडकर साहेबांची स्तुतीपर गीत गायली. हर्षद पुंडगे, प्रकाश काळे व दीपांजली केसकर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीनिवास समदुर्ले व शुभम वांझरे यांचे सहकार्य लाभले.

# आपले संविधान, आपला अभिमान... संविधानावर निष्ठा हीच व्यक्तीची प्रतिष्ठा...

## वालचंदच्या वतीने काढण्यात आली रॅली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**

वालचंद आर्ट्स ॲन्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयच्या वतीने आयोजित केलेल्या संविधान दिनपर कार्यक्रमाच्या निमित्ताने रॅली काढण्यात आली. या रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी आपले संविधान, आपला अभिमान... संविधानावर निष्ठा हीच व्यक्तीची प्रतिष्ठा... संविधानाची कास धरु, विषमता नष्ट करु... डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, भारताचे संविधान... अशा गगनभेदी घोषणा देत परिसर दणाणून सोडले होते.




विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक मूल्य रुजवणे, संविधानाबद्दल आदर आणि जागरूकता निर्माण करणे या अनुषंगाने विविध उपक्रम राबवण्यात आले. यानिमित्ताने चित्रकला स्पर्धाही घेण्यात आले होते. यातील यशस्वीतांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. मानवी साखळीद्वारे हम सब एक है चा संदेश देण्यात आला.

विजय वाघमोडे, पुष्पांजली बेलपवार, हंसिका होटकर, लीना इटकल यांनी संविधान दिनाविषयीची माहिती दिली. प्राचार्य डॉ.संतोष कोटी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे, राहुल हजारे, चेतन तुपकर, चंद्रशेखर कस्तुरे, संदीप कुलकर्णी, तुषार ढोले आदींनी परिश्रम घेतले.

## लोकमंगल कृषी महाविद्यालयात संविधान दिन साजरा




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत संविधान दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.अमोल शिंदे हे अध्यक्षस्थानी होते. योगिता शिंदे, गायत्री कांबळे, किरणकुमार हाके आणि प्रा.अभिजित नारायणकर, प्रा.सुजाता चौगुले, प्रा.अजित कुरे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्कार ठेले यांनी सूत्रसंचालन केले. साक्षी काळे यांनी आभार मानले.

## श्री प्रतिष्ठानने केली संविधानातील मूल्यांची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर**

येथील श्री प्रतिष्ठानच्या वतीने अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघम्चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा शिवसेनेचे युवा नेते श्रीनिवास संगा यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या संविधान दिन कार्यक्रम द्वारे लोकशाही, स्वातंत्र्यता, समता आणि बंधुता मूलभूत मूल्यांची जनजागृती करण्यात आली. यावेळी शहीद अशोक कामटे यांच्यासह दिवंगत अन्य पोलिस अधिकारी आणि इतर शहिदांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी अतिश म्हेत्रे, हिरालाल चन्नापट्टण, संतोष संगा, बालाजी श्रीचिप्पा, किसन पासकंटी, गोवर्धन पासकंटी, ॲड. संदीप संगा, सचिन जवळकर, अजय आडम, महेश कल्याणम, पवन येलदंडी आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# युवाशक्ती देशाच्या विकासाचे केंद्र

## पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन, अंतराळ क्षेत्र जागतिक गुंतवणुकीसाठी आकर्षक ठिकाण

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

देशातील तरुण हेच आपली शक्ती असून, विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. युवाशक्ती देशाच्या विकासाचे केंद्र आहे आणि त्यांना योग्य संधी मिळावी यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. आम्ही अंतराळ क्षेत्रात ऐतिहासिक सुधारणा करून हे क्षेत्र खासगी व्यवसाय आणि गुंतवणुकीसाठी खुले केले. याचा मोठा फायदा स्टार्टअप्सला होत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले.



### अंतराळ मोहिमांचा प्रवास प्रेरणादायी

पंतप्रधानांनी भारतीय अंतराळ कार्यक्रमाच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण करून देताना म्हणाले की, एक काळ असा होता की, उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यासाठी आपल्याला रॉकेट्स सायकलवरून न्यावे लागायचे. हा प्रवास मर्यादित संसाधनातून सुरू झाला, परंतु यामुळे हे सिद्ध झाले, की दृढनिश्चय असल्यास कोणतेही स्वप्ने साध्य करता येऊ शकते. काळानुरुप अंतराळ क्षेत्र वेगाने वाढत आहे.

### स्कायरूट आघाडीची खाजगी अंतराळ कंपनी

स्कायरूट ही भारतातील आघाडीची खाजगी अंतराळ कंपनी आहे. कंपनीची स्थापना पवन चंदना आणि भरत ढाका यांनी केली. दोघेही आयआयटीचे माजी विद्यार्थी आणि इस्रोचे माजी शास्त्रज्ञ आहेत. स्कायरूट त्यांचे सब-ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-एस लाँच करेल, असे करणारी ती पहिली भारतीय खाजगी कंपनी बनेल. अनेक प्रक्षेपण वाहनांची रचना, विकास, एकत्रितता आणि चाचणी या कंपनीच्या माध्यमातून केली जाते.

पंतप्रधान मोदी यांनी हैदराबाद येथील 'स्कायरूट एरोस्पेस इन्फिनिटी कॅम्पस'चे उद्घाटन आभासी पद्धतीने केले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना मोदी म्हणाले, 'स्कायरूट इन्फिनिटी कॅम्पस' हे अवकाश क्षेत्रात काम करणारे स्टार्टअप आहे. आज देशातील अवकाश क्षेत्रात अभूतपूर्व संधी उपलब्ध आहेत. भारताची खाजगी क्षेत्रातील अवकाश प्रतिभा जागतिक स्तरावर छाप पाडत आहे. आजच्या घडीला या क्षेत्रात ३०० पेक्षा अधिक स्टार्टअप्स कार्यरत आहेत. मला आशा आहे की, अवकाश क्षेत्रात कार्यरत खासगी संस्था जागतिक स्तरावर नवी उंची गाठतील आणि देशाचे नाव उज्ज्वल करतील. (वृत्तसंस्था)

### अणु क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले होणार

**आम्ही अंतराळ क्षेत्रात ऐतिहासिक सुधारणा केल्या आणि खाजगी क्षेत्रासाठी खुले केले. स्टार्टअप्स आणि उद्योगांना नवोपक्रमाने जोडले. अणु क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी देखील खुले करण्याची आमची योजना आहेत. यासंदर्भातील विधेयक हिवाळी अधिवेशनात संसदेत सादर केले जाणार असल्याचे मोदी म्हणाले.**



बहुमजली इमारतींना लागलेली आग विझविताना अग्निशमन दलाचे जवान

# पाकचे वक्तव्य म्हणजे, लादेनने जागतिक शांततेविषयी बोलणे होय!

### भाजपाचे टीकास्त्र

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

राम मंदिराच्या धार्मिक ध्वजाबाबत पाकिस्तानच्या विधानावर परराष्ट्र मंत्रालयाने आधीच पाकिस्तानवर टीका केली आहे. आता, भारतीय जनता पक्षाने (भाजपा) पाकिस्तानला ओसामा बिन लादेनच्या नावाने डिवचत कठोर शब्दात प्रहार केला आहे. अल्पसंख्याकांच्या हक्कांबाबत पाकिस्तानचे विधान म्हणजे ओसामा बिन लादेन जगाला शांतीचा संदेश देत असल्यासारखो होय, अशी टीका केली.

भाजपाच्या वतीने राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी पाकिस्तानला जोरदार फटकारले. ते म्हणाले, पाकिस्तानसारख्या देशाने अल्पसंख्याक आणि मानवी हक्कांवर कोणालाही व्याख्यान देऊ नये. त्यांनी फक्त स्वतःचे रेकॉर्ड पाहावे. सर्वात मजेदार गोष्ट म्हणजे ते हे सर्व २६/११ रोजी बोलत आहेत, ज्या दिवशी त्यांनी सर्वात घृणास्पद दहशतवादी हल्ला केला, ज्यामध्ये अनेक निष्पाप लोकांचे बळी गेले.



पाकिस्तानमधील आयएसआय आणि लष्करी यंत्रणा अनेक समुदायांना त्रास देतात. म्हणून, त्यांना या मुद्यावर इतर देशांना भाषण देण्याचा अधिकार नाही.

पंतप्रधान मोदींनी अयोध्येतील राम मंदिरावर ध्वज फडकवल्यानंतर, पाकिस्तानने एक निवेदन जारी केले. या निवेदनात अयोध्येतील घटनेचे वर्णन, मुस्लिम वारसा नष्ट करण्याचा प्रयत्न आणि भारतातील धार्मिक अल्पसंख्याकांवर दबाव आणण्याचे लक्षण, असे केले आहे. परराष्ट्र मंत्रालयानेही इस्लामाबादने जारी केलेल्या या विधानावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी स्पष्टपणे सांगितले की पाकिस्तानला इतरांना व्याख्याने देण्याचा नैतिक अधिकार नाही. (वृत्तसंस्था)

# फाझिलनगरचे नाव बदलणार

### मुख्यमंत्री योगी आदित्यनाथांची घोषणा

◆ **गाझियाबाद, २७ नोव्हेंबर**

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यातील आणखी एका ठिकाणचे इस्लामिक नाव बदलण्याची घोषणा केली आहे. फाझिलनगरचे नाव जैन धर्मानुसार 'पावा नगर' असे बदलले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री गाझियाबादमधील मुरादनगर येथील श्री तरुण सागरम पारसनाथ अतिशय तीर्थ धाम येथे गुहा मंदिर उद्घाटन समारंभात बोलत होते.



त्यांनी सांगितले की जैन भिक्षू परंपरा तपस्वीपणा, त्याग आणि नैतिक जीवनाचा संदेश देते, जे समाजाचे मार्गदर्शन करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. या संदर्भात, मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की जैन समुदायाच्या ऐतिहासिक श्रद्धेनुसार कुशीनगरमधील फाझिलनगरचे नाव 'पावा नगर' असे ठेवले जाईल. पावा हे पवित्र स्थळ आहे जिथे भगवान महावीरांना महापरिनिर्वाण मिळाले, असे मानले जाते. फाझिलनगर हे कुशीनगर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे शहर आहे, जे त्याच्या भौगोलिक स्थान आणि व्यावसायिक क्रियाकलापांसाठी ओळखले जाते. पूर्व उत्तरप्रदेशला बिहारशी जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर असल्याने हे व्यापार आणि वाहतुकीचे एक प्रमुख केंद्र आहे. (वृत्तसंस्था)



**जम्मू येथील श्री माता वैष्णोदेवी वैद्यकीय महाविद्यालयात जागा वाटपावरून सध्या गदारोळ सुरू आहे. जास्तीत जास्त जागांवर मुस्लिम विद्यार्थ्यांची निवड केल्याने शिवसेना डोग्रा फ्रंटच्या कार्यकर्त्यांनी गुरूवारी आंदोलन केले.**

# निवासी इमारतींना आग, होरपळून ५५ जण ठार

## हाँगकाँगमधील हृदयद्रावक घटना, २७९ नागरिक बेपत्ता, तीन आरोपींना अटक

◆ **हाँगकाँग, २७ नोव्हेंबर**

हाँगकाँगमध्ये एकाच परिसरातील आजूबाजूला असलेल्या चार गगनचुंबी इमारतींना लागलेल्या आगीत मृत पावलेल्या नागरिकांचा आकडा ५५ वर पोहोचला आहे, तर इमारतींमध्ये राहणारे २७९ नागरिक अजूनही बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, ताई पो जिल्ह्यातील वांग चुक कोर्ट या गृहनिर्माण संकुलात बुधवारी अचानक आग लागली. काही मिनिटातच आग लगतच्या इमारतीपर्यंत पोहोचली. अग्निशमन पथकाने आगीवर नियंत्रण आणत आतापर्यंत ५५ मृतदेह बाहेर काढले आणि २५ जखमींना रुग्णालयात हलविले. इमारतीतील २७९ जण अजूनही बेपत्ता असून, त्यांचा शोध सुरू आहे. या घटनेसाठी जबाबदार असलेल्या तीन जणांना अटक करण्यात आली. आग कशामुळे लागली याचा तपास केला जात आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी या घटनेची दखल घेतली असून, त्यांनी बचावकार्याला गती देण्याचे आदेश दिले. (वृत्तसंस्था)

### सामूहिक हत्येचा आरोप

हाँगकाँगचे मुख्य कार्यकारी अधिकारी जॉन ली यांनी सांगितले की आग लागलेल्या इमारती १९८० च्या दशकात बांधल्या गेल्या. इमारतींमध्ये वृद्धांसह सुमारे चार हजार लोक राहत होते. काही काळापासून नूतनीकरणाचे काम सुरू होते, ज्यामुळे सर्व इमारतींभोवती तेल रंग आणि बांबूचे मचान तयार करण्यात आले होते, यामुळे आग वेगाने पसरली. या घटनेनंतर पोलिसांनी इमारतीचे बांधकाम आणि नूतनीकरण करणाऱ्या कंपनीतील दोन संचालक आणि एका अभियंत्याला अटक केली. त्यांच्यावर सामूहिक हत्येचा आरोप ठेवण्यात आला आहे.

# जुने निर्णय रद्द करण्याच्या वाढत्या प्रकारामुळे सर्वोच्च न्यायालय नाराज



### आम्ही तो मार्ग अवलंबणार नाही

अनेक प्रकरणांमध्ये, नवीन न्यायाधीश असलेली खंडपीठे जुने निर्णय रद्द करत आहेत. हे न्यायव्यवस्थेसाठी हानिकारक आहे. निर्णय फिरविताना असंतोष किंवा खेद व्यक्त करून आम्हाला हा मार्ग अवलंबायचा नाही, असे म्हटले जाते. पण, केवळ खंडपीठाची रचना बदलून न्याय मिळत नाही आणि निर्णयांचा सतत आढावा घेतल्याने सर्वोच्च न्यायालयाची प्रतिष्ठा कमी होते, असेही खंडपीठाने म्हटले आहे.

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

देशातील सर्वोच्च न्यायालयात पीठ बदलून पूर्वी दिलेल्या निर्णयांना आव्हान देण्याच्या वाढत्या ट्रेंडबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या पीठाने गंभीर चिंता व्यक्त केली. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायपीठाने म्हटले की, ही प्रवृत्ती केवळ सर्वोच्च न्यायालयाची प्रतिष्ठा आणि अधिकार कमी करत नाही तर संविधानाच्या कलम १४१ च्या भावनेच्या विरुद्ध आहे. निर्णय अंतिम म्हणून कायम ठेवल्याने केवळ अंतहीन खटलेच रोखले जाणार नाहीत तर न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वासही टिकेल.

पीठाने असे नमूद केले की, अलिकडच्या काळात असे दिसून आले आहे की एका पीठाने दिलेले निर्णय काही काळानंतर इतर पीठांकडून फिरवले जातात, मग ते न्यायाधीश सेवारत असोत किंवा निवृत्त असोत. न्यायमूर्ती दत्ता म्हणाले, कलम १४१ चा उद्देश असा आहे की सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा अंतिम असावा आणि सर्व न्यायालयांनी त्याचे पालन करावे. तथापि, जर नंतर वेगळे मत श्रेयस्कर वाटले म्हणून निर्णय पुन्हा फिरवला गेला तर कलम १४१ चा उद्देशच रद्द होतो. ही टिप्पणी पश्चिम बंगालचे रहिवासी आणि खूनाचे आरोपी एस.के. मोहम्मद अनिसूर रहमान यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान आली. (वृत्तसंस्था)

# आता प्रियांकांनी पक्षाची धुरा सांभाळावी

## काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचे राहुल गांधींवर प्रश्नचिन्ह

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रशीद अल्वी यांनी पक्षाच्या वर्तमान स्थितीवर प्रश्न उपस्थित करीत पक्षाची धुरा आता प्रियांका वढेरा यांनी सांभाळावी, असे विधान केले आहे.



अल्वी म्हणाले, पक्षाची स्थिती कमकुवत आहे. काँग्रेस संघटना अत्यंत वाईट स्थितीत असून यासाठी काँग्रेस नेतृत्व थेट जबाबदार आहे. निवडणूक कठोर परिश्रम आणि तयारीच्या बाबतीत काँग्रेस भाजपाशी स्पर्धा करण्यासही असमर्थ आहे. भाजपा जमिनीवर काम करत आहे, परंतु काँग्रेसचे प्रयत्न कुठेही दिसत नाहीत.

आज काँग्रेसचे वरिष्ठ नेते दुर्लक्षित आहेत. यासाठी पक्षाचे नेतृत्व देखील जबाबदार आहे. काँग्रेस पक्षातील या आवाजामुळे पुन्हा एकदा संघटनात्मक परिस्थिती आणि नेतृत्वशैलीबद्दल वाद निर्माण झाला आहे. वरिष्ठ नेत्यांना बाजूला करण्यात आले आहे. कर्नाटकातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे अल्वी म्हणाले. त्यांनी एका वृत्तवाहिनीला सांगितले की, काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांना वाटते की त्यांना जबाबदारी दिली जात नाही. आज ज्यांना बाजूला ठेवण्यात आले आहे त्यांची नाराजी दूर करणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे सर्वात महत्त्वाचे आहे.

कर्नाटकात मुख्यमंत्रीपदावरून सुरू असलेला वाद संपवण्याचे आवाहनही त्यांनी केले. (वृत्तसंस्था)

### इंदिरा गांधींची प्रतिमा

रशीद अल्वी यांनी काँग्रेस हायकमांडच्या कार्यशैलीवरही तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित करीत राहुल गांधींना भेटणे देखील काँग्रेस नेत्यांसाठी कठीण आहे. त्या मानाने इंदिरा गांधींना भेटणे सोपे होते. प्रियांका वढेरा इंदिरा गांधींच्या प्रतिमेचे प्रतीक असल्याने त्यांनी पक्षाची सूत्रे हाती घ्यावीत, असे सुचवले.

## चित्रपट वार्ता

### अखेर पती निधनानंतर व्यक्त झाल्या हेमा मालिनी



**मुंबई** : धर्मेंद्र यांच्या निधनानंतर तीन दिवसांनी हेमा मालिनी यांनी त्यांच्यासाठी अनेक भावनिक पोस्ट शेअर केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, धर्मेंद्र त्यांच्यासाठी सर्व काही होते आणि त्यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती आयुष्यभर राहील. हेमा मालिनी यांनी धर्मेंद्र यांच्यासोबतचा फोटो शेअर करत भावूक होऊन लिहिले, धरमजी हे माझ्यासाठी खूप काही होते. ते एक प्रेमळ पती, आमच्या दोन मुली ईशा आणि अहानाचे स्नेही वडील, एक मित्र, तत्त्वज्ञ, मार्गदर्शक, कवी, गरजेच्या प्रत्येक वेळी माझे गो-टू व्यक्ती होते. खरे सांगायचे तर, ते माझ्यासाठी सर्व काही होते. चांगल्या आणि वाईट प्रत्येक काळात ते नेहमी माझ्यासोबत होते. माझी वैयक्तिक हानी शब्दांच्या पलीकडची आहे. अनेक वर्षांच्या सहप्रवासा नंतर आता मी फक्त अगणित आठवणींच्या आधाराने ते खास क्षण पुन्हा पुन्हा जगेन.

### मुक्ताला हिंदीत करायचेय् काम



**मुंबई** : गेल्या २० वर्षांपासून मराठी मनोरंजन जगतात वावरणारी सशक्त अभिनेत्री म्हणून ख्यात असणारी मुक्ता बर्वे हिने आजवर अनेक दर्जेदार भूमिका सादर केल्या. अनेक उत्तमोत्तम चित्रपटही दिले. आता तिचा 'असंभव' हा चित्रपट येऊ घातला आहे. त्या अनुषंगाने एका मुलाखतीत मुक्ता म्हणाली की, माझ्यासोबत या चित्रपटात प्रिया बापट आहे. ती अनेक भाषांमध्ये काम करून आली आहे. मलाही आता हिंदीत काम करण्याची इच्छा आहे. त्यासाठी मी ऑडिशन्सदेखील देत आहे. तेथे प्रवेश कसा करायचा, याविषयी प्रिया मला मार्गदर्शन करतेच आहे. मला यापुढे हिंदी-मराठी दोन्हींकडे कामाचा समतोल साधायचा आहे.

### आता तेजश्रीने आणला नव्या मंगळसूत्राचा प्रकार



**मुंबई** : तेजश्री प्रधान म्हटले की, 'होणार सून मी या घरची' ही मालिका डोळ्यासमोर येते आणि त्यातील जान्हवीचे पात्र ज्या पद्धतीने तेजश्रीने साकारले ते आजही लोकांच्या पसंतीचे आहे. जान्हवीचे संवाद जसे लोकप्रिय झाले तसे तिचे तीन पदरी छोटे मंगळसूत्रही बायकांमध्ये खास आवडीचे ठरले. आता सध्या तिची मालिका 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिका सुरू आहे. या मालिकेत ती स्वानंदी ही भूमिका साकारत आहे. या स्वानंदीचेही मंगळसूत्र वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. याची चर्चाही खूप होते आहे. दोन पदरी असणारे हे मंगळसूत्र प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. यात एका बाजूला चेन आणि दुसऱ्या बाजूला काळे मणी तर मध्ये पेंडंट असे खास डिझाईन यात आहे. आता लवकरच बाजारात हे मंगळसूत्र येणार, अशीही चर्चा आहे.

# शेख हसीनांना २१ वर्षांची शिक्षा

◆ **ढाका, २७ नोव्हेंबर**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना गुरुवारी तीन वेगवेगळ्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये २१ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. ढाकाच्या विशेष न्यायालय-५ चे न्यायाधीश मोहम्मद अब्दुल्ला अल मामुन यांनी पूर्वाचल परिसरातील तीन सरकारी भूखंडांच्या वाटपाशी संबंधित प्रकरणांमध्ये हा निर्णय दिला.


बांगलादेश भ्रष्टाचार विरोधी आयोगाने जानेवारी २०२५ मध्ये ढाकाच्या पूर्वाचल येथे सरकारी जमिनीच्या बेकायदेशीर वाटपासाठी शेख हसीना आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरुद्ध एकूण सहा खटले दाखल केले. यापैकी तीन प्रकरणांचा निकाल जाहीर करण्यात आली, तर उर्वरित तीन प्रकरणांचा निकाल १ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहेत. (वृत्तसंस्था)

# तीन फूट उंचीचा गणेश झाला डॉक्टर !

### सर्वोच्च न्यायालयापर्यंत दिला लढा

◆ **नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

म्हणतात ना 'मूर्ती लहान पण, किर्ती महान'. निसर्गत:च कमी उंची असणाऱ्यांना बरेचदा स्वत:विषयी न्यूनगंड असतो. पण, उंची महत्त्वाची नाही, कर्तृत्व महत्त्वाचे आहे, हे गुजरातमधील गणेश बरैया यांनी सिद्ध केले आहे. त्यांची उंची फक्त तीन फूट असून वजन २० किलो आहे. ते आता डॉक्टर बनले आहेत. पात्रता असूनही, गणेशला त्याच्या कमी उंचीमुळे सर्वोच्च न्यायालयात लढावे लागले. परंतु सर्वात आव्हानात्मक अडथळ्यांवर मात करून, गणेशने त्याचे ध्येय गाठले आहे. आता, त्याला वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



२५ वर्षीय बरैयाची उंची बरीच आधी खुंटली आहे, ज्यामुळे हालचाल संबंधित ७२ टक्के अपंगत्व आले आहे. आव्हान केवळ शारीरिक कमकुवतपणाचे नव्हते तर आर्थिक अडचणीचे देखील होते. भावनगरमधील गोरखी गावात जन्मलेला गणेश आठ भावंडांपैकी एक आहे. गणेश जितका शारीरिकदृष्ट्या कमकुवत होता तितकाच तो मानसिकदृष्ट्याही कणखर आणि कुशाग्र होता. बालपणापासूनच शैक्षणिक क्षेत्रातील हुशार गणेशने १२ व्या वर्गात ८७ टक्के गुण मिळवून सर्वांना आश्चर्यचकित केले. पण ही फक्त सुरुवात होती. त्यानंतर त्याने नीट परीक्षा उत्तीर्ण केली. तथापि, २०१८ मध्ये, गुजरात सरकारने त्याच्या अपंगत्वामुळे त्याला एमबीबीएस अभ्यासक्रमात प्रवेश नाकारला.

डॉ. बरैया यांनी आपले अनुभव सांगताना म्हटले की, १२वी उत्तीर्ण झाल्यानंतर आणि एमबीबीएस प्रवेशासाठी नीट परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया समितीने माझ्या उंचीच्या आधारे मला नाकारले. त्यांनी सांगितले की माझ्या कमी उंचीमुळे मी आपत्कालीन प्रकरणे हाताळू शकणार नाही. हा लढा शेवटपर्यंत लढायचा निर्धारच केला होता. त्यामुळे जोवर विजय मिळाला नाही तोवर मी थांबलो नाही, हार मानली नाही. त्यामुळे मला डॉक्टर होण्याचे माझे स्वप्न पूर्ण करता आले आणि इथून पुढे आयुष्यभर मी रुग्णांची सेवा करणार आहे. (वृत्तसंस्था)

### शेवटपर्यंत हार मानली नाही

गणेशने त्याच्या उंचीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींपुढे हार मानली नाही. त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मदतीने, गणेशने जिल्हाधिकाऱ्यांना आणि शिक्षणमंत्र्यांना अपील केले. त्यानंतर त्याने त्याची समस्या घेऊन गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर निराश न होता त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या बाजूने निकाल देत त्याला एमबीबीएस प्रवेश दिला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# निर्धास्त, सुस्त आणि व्यस्त

व्यक्ती, समाज, सरकार किंवा कोणत्याही यंत्रणांच्या कार्यकाळातील शांततेचा काळ हा त्यांच्यासाठी सर्वाधिक कसोटीचा काळ असतो असे म्हणतात. सारे काही स्वस्थ आहे, आश्वस्त आहे, कोणत्याही प्रकारच्या चिंतेचे, काळजीचे किंवा सावधगिरीचे कोणतेही कारण नाही, असा निर्धास्ततेचा काळ म्हणजे शांततेचा काळ असला, तरी तो सुस्ततेचा काळ नसतो. लष्करासारख्या यंत्रणा केवळ युद्धकाळातच सतर्क आणि कार्यमग्न असतात असा सर्वसाधारण समज असतो. पण तो संपूर्ण खरा नाही. उलट, शांततेच्या काळात लष्करे अधिक कार्यमग्न असतात. या काळात लष्कर केवळ युद्धाची वाट पाहात स्वस्थ बसत नाही. उलट हा काळ लष्करासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात भविष्यातील रणनीतीची आखणी, त्या दृष्टीने सैन्याचे प्रशिक्षण, सैनिकांची मानसिक मशागत, तांत्रिक बाबींची पूर्तता, नव्या युद्धनीतीचा अभ्यास, नव्या शस्त्रास्त्रांची जुळवाजुळव आणि प्रत्यक्ष मैदानात उतरल्यानंतर करावयाच्या कृतींचा सराव अशा अनेक गोष्टी जेव्हा शांततेच्या काळात सातत्याने केल्या जातात, तेव्हा प्रत्यक्ष युद्धकाळात हे सैन्य सक्षमपणे त्यास सामोरे जात असते.

पण, सर्वांनाच शांततेच्या काळात व्यस्त राहण्याचे महत्त्व माहीत असते असे मात्र नाही. शांततेच्या काळात करण्यासारखे काहीच नसते हीच ज्यांची समजूत असते, ते सर्व जण सुस्तावलेलेही असतात आणि युद्धभूमीवर उतरण्याची वेळ आली की त्यांना खडबडून जाग येते, शांततेच्या काळातील सुस्ती उतरली तरी प्रत्यक्ष कृतीच्या काळात काय करावे हे सुचेनासे होते आणि घाईगडबडीत जे काही सुचेल ते करण्याची वेळ येते. त्याच्या परिणामांची कल्पनाही नसताना काहीतरी करावे एवढेच ज्यांना माहीत असते, त्यांचा 'ठाकरे' होतो असे म्हणण्याची वेळ आता आली आहे. गेल्या काही वर्षांपासून राज ठाकरे यांच्या राजकारणातील बराचसा काळ हा सुस्ततेचाच होता. म्हणजे, निवडणुका आल्या की त्यांचा पक्ष हातपाय हलवू लागतो आणि त्या काळात जे काही राजकारण करण्याची संधी समोर चालून येईल, त्यावर झडप घालण्याचे राजकारण केले जाते असाच राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा इतिहास दिसतो. म्हणूनच, शांततेच्या काळात सुस्त आणि निवडणुकांच्या काळात व्यस्त असा त्यांचा खाक्या असतो. मुळात, ठाकरे परिवाराची आजची पिढी हीच अपघाताने राजकारणात उतरलेली पिढी असल्याने, त्यांच्या राजकारणाचा बाजही वातकुक्कुटासारखाच आहे. म्हणजे, वाऱ्याच्या दिशेने पाठ फिरवायची आणि त्याच दिशेने बांग द्यायची असा बाज या कुटुंबातील या पिढीच्या राजकारणाने स्वीकारला आहे. केवळ बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकारणाचा वारसा एवढीच त्यांच्या राजकारणाची पुंजी असल्याने, चालून आलेले नेतृत्व एवढीच त्यांची कमाई आहे. या संधीचा नेमका फायदा उठविण्यासाठी त्यांनी काही मोठे कर्तृत्व दखविल्याचा ठोस पुरावा तर नाहीच, उलट, बाळासाहेबांची पुण्याई पाठीशी नसती तर आपण शून्यवत आहोत, ही जाणीवही त्यांना आहे. उद्धव ठाकरे यांनी तसे काही वेळा कबूलही केले आहे. राज ठाकरे यांच्याही पाठीशी बाळासाहेबांचीच पुण्याई असली तरी नेतृत्व सिद्ध करण्याची संधी त्यांच्यासमोर अनेकदा उभी राहिली होती. मुळात आपले व्यक्तिमत्त्व आता जे दिसते तसेच आहे, की याहून वेगळे आहे, आपले नेतृत्व खरे आहे की बेगडी आहे याविषयी त्यांच्याही मनात काहीसा संभ्रम असावा, असेही दिसून आले आहे. 'मला अस्सल राज ठाकरे व्हायला भाग पाडू नका' असा एक सज्जड इशारा त्यांनी काही वर्षांपूर्वी आपल्याच कार्यकर्त्यांना दिला होता. तेव्हापासून ते ज्या रूपात वावरत आहेत, ते खरे राज ठाकरे, की त्यांचे याहून काही वेगळे रूप आहे हे त्यांच्या कार्यकर्त्यांसही उमगलेले नाही. म्हणूनच, राजकारणाच्या रणांगणात उतरण्याची वेळ आली की हाती येईल ते शस्त्र परजून सिद्ध होण्याची वेळ त्यांच्यावर वारंवार येते असे वारंवार स्पष्ट झालेले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकारणाचा वारसा म्हणून या बंधूंच्या हातात मिळालेले एक असेच शस्त्र आता निवडणुकांच्या रणधुमाळीत त्यांनी परजले आहे. काही शस्त्रांचा वापर केला नाही तर त्यांना गंज चढतो. त्यांची धारही कमी होते आणि अशी बोथट शस्त्रे हवेत फिरवावी लागली तर त्यांचा उपयोगही होत नाही. याआधी त्यांनी अनेकदा ते हवेतच चालवलेले असल्याने त्या शस्त्राचा प्रभावही फारसा राहिलेला नाही. पण ऐनवेळी, शांततेच्या काळात भावी संघर्षाच्या तयारीसाठी कार्यमग्न राहण्याऐवजी हाती असलेल्या हत्याराच्या भरवशावर मैदानात उतरण्याच्या विश्वासामुळे त्यांनी पुन्हा तेच शस्त्र हवेत फिरविण्यास सुरुवात केली आहे. मराठी भाषेचा मुद्दा मराठीजनांच्या गळी कोणा राजकीय नेत्यांनी उतरवावा, एवढी मराठी माणसाची मानसिकता खचीतच सुस्तावलेली नाही. मराठी ही महाराष्ट्राची अस्मिता आहे, हे तमाम मराठीजनांस पक्के ठावूक आहे आणि त्याबाबतीत त्याची अस्मिता सदैव जिवंत आणि धगधगतीदेखील राहिलेली आहे. मराठीच्या संरक्षणासाठी राजकारणाहूनही प्रभावीपणे काम करणारी अन्य क्षेत्रे महाराष्ट्रात सतत कार्यरत असतात आणि शांततेच्या काळातही त्यावर त्यांचे काम सुरू असते, हेही सिद्ध झालेले आहे. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि संरक्षणासाठी साहित्यक्षेत्र सजग असते, मराठीचे अभ्यासक जागरूक असतात. त्यामुळे, ठाकरे बंधूंनी मराठीचा मुद्दा उचलण्याआधीच कोणी तो राजकारणाच्या रणांगणावर केंद्रस्थानी आणून ठेवतो व ठाकरे बंधू केवळ या मुद्याचे आपल्या हातातील गुळगुळीत हत्यार परजून, अगोदरच जागे असलेल्या मराठीजनांस जागे राहण्याचा इशारा करू लागतात, हेही स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे, विचारांचा वारसा म्हणून हाती आलेला हा मुद्दा केवळ निवडणुकांपुरता वापरून अगोदरच जागे असलेल्या मराठीजनांस जागे करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांतील गांभीर्य आता संपले आहे. विचारांचा वारसा म्हणून या बंधूंच्या हाती असलेल्या आणखी एका मुद्याचे हत्यार वारंवार हवेत फिरवून त्यांनी या गंभीर मुद्याची धारही संपवून टाकली आहे. बॉम्बेचे मुंबई आणि मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव ही त्यांची आवडती रणनीती आहे. प्रत्येक निवडणुकांच्या तोंडावर त्याची आवई उठविली जाते आणि त्या मुद्याभोवती निवडणूक फिरविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जातो. मुळात, गेल्या अनेक दशकांपासून हाच मुद्दा वारंवार उठविला गेल्याने व तसे काहीच होणार नसल्याची ग्वाही आताच्या व याआधीच्या प्रत्येक सरकारने दिलेली असल्याने, हा मुद्दादेखील आता गुळगुळीतच झाला आहे. मराठी माणसाला जागे करण्यासाठी आपण राजकारण करतो, असा त्यांचा असाच एक समज आहे. पण मुळात मराठी माणूस त्यांच्या राजकारणामुळे नव्हे, तर त्याच्या परंपरा, अस्मिता आणि जाणिवांमुळे सतत जागाच राहिलेला आहे. म्हणूनच, तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्याबाबतच्या मुद्यावर ठाकरे बंधूंच्या अगोदरही, मराठीप्रेमींनी त्याविरोधात संघर्ष सुरू केला होता.

मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याची आवई हा कपोलकल्पित राजकारणाचा भाग आहे हे माहीत असूनही, जेव्हा जेव्हा ही आवई उठविली जाते तेव्हा तेव्हा त्याचे निःसंदिग्ध निराकरण केले जाते, त्याचे कारणदेखील मराठी माणूस जागा आहे हेच आहे. असा कोणताही प्रयत्न महाराष्ट्रात सहन होणार नाही आणि या मुद्याचे राजकारण करणाऱ्यांच्याही अगोदर मराठी जनता त्याविरोधात संघर्षास सिद्ध होईल याची पुरेपूर साक्ष इतिहासाने देऊन ठेवलेली आहे. संयुक्त महाराष्ट्राचा संघर्ष हा त्या जाणिवेचाच आविष्कार होता. त्यामुळे, मुळातच जागा असलेल्या मराठी माणसास जागे राहण्याचे इशारे निवडणुकीच्या राजकारणात चालणार नाहीत. राजकारण करावयाचे असेल तर त्यासाठी पूर्ण वेळ द्यावा लागतो, उशिरापर्यंत झोपून चालत नाही असा एक खोचक इशारा एका ज्येष्ठ राजकीय नेत्याने राज ठाकरे यांनाच दिला होता. राज ठाकरे हे फावल्या वेळातील राजकारणी आहेत, असा तेव्हापासून महाराष्ट्रातील अनेकांचा समज आहे. म्हणूनच, जे नेते पूर्णवेळ राजकारण करत नाहीत, शांततेचा काळ सुस्ततेत घालवितात, जे स्वतःच झोपून राहतात, त्यांनी इतरांस जागे राहण्याचा सल्ला देणे हाच एक विनोद असतो. राजकारणात असे विनोद घडतच असल्याने तेदेखील आता गुळगुळीत होऊन गेले आहेत.

## प्रासंगिक

# डिजिटल इंडिया ते स्मार्ट इंडिया

**प्रा. डॉ. स्वाती महेश जोशी**

**(बाबाजी दाते महाविद्यालय यवतमाळ येथे शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय परिषदेनिमित्त...)**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या युगात ''डिजिटल इंडिया'' ही केवळ घोषणा नसून, संपूर्ण समाजव्यवस्था बदलून टाकणारी एक मोठी चळवळ बनली आहे. या चळवळीमुळे शिक्षण, उद्योग, संशोधन, कला, व्यवस्थापन, पर्यावरणशास्त्र या क्षेत्रांत अभूतपूर्व परिवर्तन घडत आहे. अशा काळात ''डिजिटल इंडिया टु स्मार्ट इंडिया : ए मल्टिडिसिप्लिनरी स्टडी ऑफ एज्युकेशन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ॲण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट'' या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील परिषद आयोजित करणे अत्यंत योग्य आणि दूरदर्शी पाऊल आहे.

मी स्वतः संगीत विभागातील प्राध्यापिका असल्यामुळे, तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या नव्या शक्यता आणि आव्हाने यांचा थेट अनुभव मला दररोज येतो. त्यामुळे अशा परिषदांचे महत्त्व मला अधिक ठळकपणे जाणवते.

आज उद्योगक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), विदा विश्लेषण, डिजिटल सेवा, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) अशा संकल्पनांचा वेगाने वापर वाढत आहे. उद्योगक्षेत्राला नव्या पिढीतील विद्यार्थ्यांकडून सृजनशील विचार, डिजिटल कौशल्ये, बहुआयामी अभ्यास, समस्यांचे त्वरित समाधान आणि तंत्रज्ञान-आधारित दृष्टिकोन अपेक्षित आहे. शैक्षणिक जगताला मात्र उद्योगाच्या या गतीशी सातत्याने ताळमेळ साधणे कठीण जाऊ शकते. भविष्यातील ही दरी कमी करणाऱ्या परिषदांची गरज आणि महत्त्व या ठिकाणी अधोरेखित होते.

कौशल्य आणि मूल्याधारित शिक्षणावर भर देत शाश्वत विकास साधने भविष्यात सोपे जाणार आहे. त्यामुळे शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, कला, सामाजिक शास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान या सर्वांमधील नैसर्गिक दुवे शोधून काढणे हा एक प्रमुख दृष्टिकोन या उपक्रमांमध्ये असणे आवश्यक आहे.



उच्चशिक्षण, उद्योगक्षेत्रातील गरजांशी सुसंगत संशोधन काय असावे, याविषयी मार्गदर्शन अशा परिषदांतून होणे अपेक्षित आहे.

संगीत क्षेत्र सुद्धा तंत्रज्ञानापासून दूर राहिलेले नाही. आज प्रत्येक संगीत विद्यार्थी, कलाकार, अध्यापक सर्व जण डिजिटल विश्वाशी जोडले गेले आहेत. रियाज ॲप्स, एआय आधारित स्वर विश्लेषण, कंपोझिशन सॉफ्टवेअर, डिजिटल तबला-तानपुरा, ऑनलाईन गुरुकुल प्रणाली यामुळे संगीत शिक्षणात क्रांती घडत आहे. या बदलांसोबत अनेक तंत्रज्ञानविषयक धोके सुद्धा उद्‌भवत आहेत, ज्यामध्ये शास्त्रीय व शुद्ध कलेला कुठेतरी मागे खेचले जात आहे. त्यामुळे या परिषदेच्या माध्यमातून तंत्रज्ञान व कलेची शुद्धता यांचा योग्य सुवर्णमध्य कसा गाठता येईल हे शोधले जावे.

ज्ञान हे व्यक्तिपुरते नसावे, तर ते समाजाचे सामूहिक संपत्ती असावे. पण आज माहिती इतक्या वेगाने बदलते की ज्ञानाची परंपरा निर्माण करण्यासाठी संशोधकांचे सतत संपर्कात राहणे अत्यावश्यक झाले आहे. या परिषदेमुळे विद्यापीठे व महाविद्यालयांतील शिक्षकसंशोधक एकत्र येतील, नवीन तंत्रज्ञानांच्या संदर्भात मूल्याधारित चर्चा होईल आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी व संशोधकांना संशोधन संस्कृतीची प्रेरणा मिळते.

या परिषदेचा आधार असलेली पीएम-यूएसएचए (प्रायमिनिस्टर-उच्चतर शिक्षा अभियान) ही केंद्र सरकारची महत्त्वपूर्ण योजना आहे. पीएम-यूएसएचएमुळे महाविद्यालयांना स्मार्ट क्लासरूम्स, डिजिटल लॅब्स, संशोधन प्रकल्प, प्रशिक्षण कार्यक्रम यांसाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळते. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या पाठबळामुळे दाते कॉलेजला ही परिषद राष्ट्रीय स्तरावरील विद्वानांसह आयोजित करता येत आहे. सांगताना अत्यंत अभिमान वाटतो की, पीएम-उषा योजनेच्या अंतर्गत आमच्या बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालयात अत्यंत काटेकोरपणे या योजनेची अंमलबजावणी होत असून त्या निधीचा उपयोग बांधकामासह महाविद्यालयाच्या सर्व विभागांना अत्याधुनिक करण्याचा स्तुत्य उपक्रम संस्था राबवीत आहे.

आमच्या महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल ही नेहमीच प्रगतशील आणि विद्यार्थिकेंद्रित राहिली आहे. १९५९ मध्ये केवळ १४५ विद्यार्थ्यांनी सुरू झालेल्या या संस्थेने आज २१००+ विद्यार्थ्यांपर्यंतचा प्रवास केला आहे, ही मोठी कामगिरी आहे. महाविद्यालयामध्ये प्रशस्त व आधुनिकीकरण केलेले ग्रंथालय, उत्कृष्ट प्रयोगशाळा, इनडोअर-आऊटडोअर जिम्नॅशियम, संगीत विभागासाठी स्वतंत्र कक्ष, मुलींसाठी वसतिगृह, एनसीसी-एनएसएस अशा अनेक सुविधा आहेत, ज्यामुळे विद्यार्थी बहुआयामी प्रगती करतात.

या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यभरातून ३०० हून अधिक संशोधक, विद्यार्थी, उद्योगक्षेत्रातील व्यक्ती या चर्चासत्रामध्ये सहभागी होत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात संशोधनपर संवाद घडवून आणणे हे शिक्षणसंस्थेच्या शैक्षणिक बांधिलकीचे प्रमाण आहे.

ज्ञान, तंत्रज्ञान आणि शाश्वत विकासाचा संगम म्हणजेच स्मार्ट भारताचा पाया आहे. भारताला प्राचीन परम वैभव प्राप्त करून देण्यासाठी अशा प्रकारच्या चर्चासत्रांमधून सखोल चिंतन मंथन होवो, हाच या परिषदेचा एक उद्देश आहे.

(संगीत विभाग, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ.)

## वेध

**- ॲड. विजय रामचंद्र देशपांडे, सोलापूर**

# नवीन कामगार कोड यांची तोंडओळख

नवीन कामगार कायद्यांनुसार ग्रॅच्युइटी आणि भविष्य निर्वाह निधी बाबतच्या नियमांमध्ये महत्त्वाचे बदल झाले आहेत. हे बदल प्रामुख्याने नवीन वेतन संहिता आणिसामाजिक सुरक्षा संहिता या नवीन कामगार संहितेच्या अंमलबजावणीमुळे आले आहेत.

**ग्रॅच्युइटी आणि पीएफ संबंधी प्रमुख नवीन नियम**

**१. वेतनची बदललेली व्याख्या**

नवीन नियमांनुसार वेतनाची व्याख्या बदलण्यात आली आहे. कंपनीच्या एकूण खर्चापैकी किमान ५०%रक्कम मूळ वेतन आणि महागाई भत्ता असणे अनिवार्य केले आहे. या नियमामुळे, पीएफ आणि ग्रॅच्युइटीची गणना ज्या मूळ वेतनावर होते, त्याची रक्कम वाढेल.

परिणाम: कर्मचारी आणि कंपनी दोघांचेही पीएफ आणि ग्रॅच्युइटीमध्ये योगदान वाढेल. यामुळे निवृत्तीनंतर मिळणारी एकूण रक्कम वाढेल, पण कर्मचाऱ्याच्या हातात येणारा मासिक पगार किंचित कमी होऊ शकतो, कारण जास्त रक्कम पीएफ आणि ग्रॅच्युइटीसाठी वळवली जाईल.

**२. ग्रॅच्युइटीसाठी पात्रता कालावधीत बदल हा सर्वात महत्त्वाचा बदल:**

फिक्स्ड-टर्म कर्मचारी: निश्चित कालावधीच्या करारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, ग्रॅच्युइटीसाठी आवश्यक असणारा ५ वर्षांचा सतत सेवेचा कालावधी आता केवळ १ वर्षांवरआणला आहे.

फायदा: अनेकदा नोकरी बदलणाऱ्या किंवा विशिष्ट प्रोजेक्टसाठी काम करणाऱ्या फिक्स्ड-टर्म कर्मचाऱ्यांना आता लवकर ग्रॅच्युइटीचा लाभ मिळू शकेल. त्यांना स्थायी कर्मचाऱ्यांप्रमाणेच इतर फायदे मिळतील.

**३. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी नियम**

नवीन नियमांनुसार, कंत्राटी कामगारांनासुद्धा स्थायी कर्मचाऱ्यांप्रमणेच ग्रॅच्युइटी आणि सामाजिक सुरक्षा (, आरोग्य विमा लाभ मिळतील.

लक्षात ठेवण्यासारख्या इतर गोष्टी

**नियुक्ती पत्र :** प्रत्येक कर्मचाऱ्याला गिग कामगार वगळता (झोम्याटो, स्विगी, ब्लिकीट यांचे डिलीव्हरी बॉय व त्यासारखी कामे करणारे कर्मचारी) नोकरीचे औपचारिक नियुक्ती पत्र देणे आता अनिवार्य केले आहे, ज्यात पगार आणि सामाजिक सुरक्षा लाभांचा तपशील असावा.

**वेळेवर वेतन :** पगार मिळण्यास विलंब झाल्यास कंपनीला दंड भरावा लागेल, ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनाची सुरक्षा वाढली आहे.

**ओव्हरटाईम :**ओव्हरटाईम नेहमी स्वैच्छिक असेल आणि त्याचे पेमेंट दुप्पट दराने करावे लागेल.

**स्त्री कामगार:** योग्य सुरक्षा व्यवस्था असल्यास महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी दिली आहे.

या बदलांमुळे कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर मोठा आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता आहे, पण त्यांच्या पगाराची रचना बदलल्यामुळे टेक-होम सॅलरी किंचित कमी होऊ शकते.

**मो. ९३२६१ ६१७९३**

## दखल

# भाजपा, ठाकरे आणि निवडणुका

**मोरेश्वर बडगे**

चॅनेलवाल्यांना ब्रेकिंग न्यूज हवी असते. त्यासाठीच सनसनाटी बातम्या चालविल्या जातात. सारं कसं आलबेल दाखवलं तर ते कोण पाहणार, हा चॅनेलवाल्यांपुढे प्रश्न असतो. त्यामुळे ब्रेकिंग न्यूज तयार केल्या जातात. अलिकडे आपल्याकडे हेच सुरू आहे. ते तर बरे की, तो भांडुपचा भोंगा म्हणजे संजय राऊत बंद आहे. दररोज सकाळी नसलेल्या गोष्टींचा रतीब राऊत घालत होते. ते आजारी आहेत. त्यामुळे भोंगा बंद आहे. पण म्हणून खोट्या बातम्या रंगवण्याचा उद्योग बंद पडलेला नाही. तो सुरूच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात नसलेली भांडणं रंगवण्याचा खेळ चालला. फडणवीस आणि शिंदे यांच्यात कसा अबोला आहे ते दाखवले गेले. त्यासाठी सोयीस्कर क्लिप्स दाखवल्या गेल्या. याच दरम्यान शिंदे यांच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. एकनाथ शिंदे अचानक केंद्रीय मंत्री अमित शाह यांना भेटायला दिल्लीला गेले. त्यामुळे तर खोट्या बातम्यांचा बाजार चांगलाच पेटला. लोकांना उल्लू बनवण्याची चॅनेलवाल्यांची ही धडपड आणखी बराच काळ चालली असती, पण फडणवीसांनी टाचणी मारली. हे चांगलेच झाले. या प्रकाराला फडणवीसांनी 'वेड्यांचा बाजार' असे संबोधले आहे. पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, ''आमच्यात दुरावा नाही. मात्र काही माध्यमं वेडी झाली आहेत. जे दाखवत आहेत तशी कुठलीही परिस्थिती नाही. चुकीचे चित्र रंगवणारे तोंडावर पडतील. शिंदे यांच्यासोबत माझा चांगला संवाद आहे. आम्ही भेटतो, बोलतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम्ही महायुती म्हणून लढत आहोत. काही जागी मैत्रीपूर्ण लढती आहेत. पण निकालानंतर आम्ही महायुती म्हणून एकत्र येऊ.'' फडणवीसांच्या या खुलाशानंतरही चिमटे काढणं सुरू आहे. याला 'अजेंडा पत्रकारिता' म्हणतात. भाजपाच्या म्हणजेच महायुतीच्या विरोधकांनी या 'अजेंडा पत्रकारितेला' अस्त्र बनवलं आहे. त्या माध्यमातून लोकांमध्ये भ्रम पसरविणे सुरू असते. विरोधी नेते जनतेत फिरताना कमी दिसतात. मीडियामध्ये दाखविण्यात येणाऱ्या गोष्टींवर ते खूश आहेत. महायुतीतील भांडणांमध्ये देवेंद्र सरकार कोसळून पडणार आणि मग आपली सत्ता येणार अशा मानसिकतेत विरोधी पक्ष आहेत. याच मानसिकतेने नुकत्याच झालेल्या बिहारच्या निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या महागठबंधनचा दारुण पराभव झाला. तेजस्वी यादव यांच्या प्रचार सभांपूर्वी काही गाणी वाजवली जात होती. ती गाणी वाजत होती तेव्हा यादव यांना गुदगुल्या होत होत्या. मात्र आता त्या गाण्यांनी आपला घात केला, असे यादव यांना वाटते आहे. तिकडच्या ४०० गायक आणि युट्युबर्सना तेजस्वी यादव यांनी नोटीस दिली आहे. प्रचार चुकीच्या दिशेने गेला तर काय होते ते बिहारने दाखवून दिले. बिहारच्या रणधुमाळीत काँग्रेसचे युवराज विदेशात गेले होते. काँग्रेसचा बँडबाजा वाजला. प्रशांत किशोर हे रणनीतिकार म्हणून प्रसिद्ध आहेत. नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनण्यासाठी त्यांनीच रणनीती बनवून दिली होती. मात्र, या प्रशांत किशोर यांच्या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. सध्या आपल्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकांसाठी बिहारचे निकाल बरेच मार्गदर्शक ठरू शकतात.



फाजील आत्मविश्वास धोका देतो. राजकारण हा आता 'पार्ट टाईम' खेळायचा विषय राहिलेला नाही. भाजपा २४ तास आणि १२ महिने राजकारण करतो म्हणून त्याला चांगले रिझल्ट मिळतात. झटपट यश कमावू पाहणाऱ्यांचा 'उद्धव ठाकरे' होतो. उद्धव ठाकरेंनी एका मिनिटात महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद मिळविले. पण वडिलांनी ४० वर्षे मेहनत करून उभा केलेला शिवसेना पक्ष अडीच वर्षांत संपवला. उद्धव आज एकदम रिकामे आहेत. त्यांच्या हातचा पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले. आमदार गेले ते वेगळे. आता मुंबई महापालिकेची निवडणूक कशी लढवायची ही त्यांची चिंता आहे. काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. लोकसभा आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी या नात्याने काँग्रेस त्यांच्यासोबत होती. त्यामुळे मुस्लिम आणि दलितांची मतं त्यांना मिळाली. त्या जोरावर मुंबईतल्या विधानसभेच्या १० जागा ठाकरे सेनेने जिंकल्या. पण आता काँग्रेस सोबत नाही म्हटल्यावर मुस्लिम आणि दलित मतांना विसरायचे, या कल्पनेनेही त्यांना घाम फुटतो आहे. ठाकरे बंधू एकत्र लढतील, अशी जोरदार चर्चा आहे. पण मनसे सुप्रीमो राज ठाकरे युतीबाबत अजून बोलले नाहीत. मुंबईच्या वरळी डोममध्ये महाराष्ट्र हिताच्या नावाने ठाकरे बंधू एका व्यासपीठावर आले होते. त्या गोष्टीला आता चार महिने झाले. पण राज ठाकरेंनी अजून युतीचा शब्दही जिभेवर आणला नाही. त्यामुळे राज यांच्या मनात नेमके आहे तरी काय, असा प्रश्न शिवसैनिकांना पडला आहे. काँग्रेस नाही, राज ठाकरे यांचेही काही खरे नाही. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची मुंबईत फारशी ताकद नाही. अशा हवेत भाजपा बाजी मारून जाईल, याचे टेन्शन उद्धव ठाकरे यांना आले आहे. त्यामुळे त्यांनी आता मराठी अस्मितेसोबत 'ठाकरे ब्रँड'चा जप चालवणे सुरू केले आहे. मुंबईचा महापौर मराठी असेल असे सांगत उद्धव सुटले आहेत. पण 'ठाकरे बंधू' म्हणजे मराठी हे सूत्र कुठून आणले? भाजपाचा महापौर झाला तर तो मराठी नसेल हे कुणी सांगितले? शिवसैनिकाला मुख्यमंत्री करेन असे वचन वडिलांना दिले होते, असे उद्धव सांगतात. प्रत्यक्षात त्यांना स्वतःला मुख्यमंत्री व्हायचे होते. शिवसैनिकांसाठी मागायचे आणि ठाकरेंनी घ्यायचे असा गेम झाला. मात्र, संधी मिळताच भाजपाने शिवसैनिकाला मुख्यमंत्रिपद दिले. भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करून शब्द पूर्ण केला. उद्धव ही दानत दाखवू शकले नाहीत. त्यामुळे आता ठाकरे बंधूंच्या गोटातील माणूस म्हणजेच मराठी हे समीकरण लोकांना पचणार नाही. देवेंद्र फडणवीस यांनी हा इशारा फार पूर्वी उद्धव यांना दिला होता. 'तुम्ही म्हणजे मुंबई नाही, तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही, तुम्ही म्हणजे मराठी माणूस नाही' ह्या शब्दात फडणवीस यांनी उद्धव यांना वाजवले होते. भाजपा दीर्घकालीन राजकारण करतो, सुडाचे राजकारण करीत नाही हे फडणवीसांनी दाखवून दिले. उतावळ्या उद्धवना ते जमले नाही. त्यामुळे ते शिवसेना बुडवून बसले. भविष्य तर आणखी कठीण आहे. असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाचेही आव्हान असणार आहे. समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांच्या जोडीला मुस्लिम मतदारांना आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. मुंबईमध्ये १५ टक्के मुस्लिम मतदार आहेत. एमआयएम मुस्लिम मतं फोडेल. यात काँग्रेसचे मोठे नुकसान होणार आहे. मुंबईमध्ये ३५ टक्के मराठी मतदार आहे. या मोठ्या व्होट बँकेचे तीन तुकडे पडतील. या भाऊगर्दीत भाजपा आणि त्याची महायुती हीच चांगल्या परिस्थितीत दिसत आहे. मुंबईची निवडणूक भाजपाने प्रतिष्ठेची केली आहे. मुंबईचा महापौर महायुतीचाच असेल, असे फडणवीस सांगत आहेत. मुंबईच्या लढाईत भाजपाला एकनाथ शिंदे यांच्या सेनेची मदत होणार आहे. जुने ६५ नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्याकडे आले आहेत. मुंबईत महायुती शंभरावर जागा जिंकत आहे, असा एक सर्व्हे नुकताच पुढे आला आहे. सध्या सुरू नगर परिषद निवडणुकीत भाजपा बल्लेबल्ले आहे. भाजपाचे १०० पेक्षा अधिक नगरसेवक अविरोध निवडून आले आहेत. तीन शहरात अविरोध आलेले नगराध्यक्ष भाजपाचे आहेत. प्रभावी रणनीतीचा भाजपाला फायदा होताना दिसत आहे.

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-९६

शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५

### चिरविजयाचे वारस आम्ही

कर्तव्याचे पूजक आम्ही चिरविजयाचे वारस आम्ही ॥धृ.॥

व्यक्तिसुखाचे पाश तोडुनी, ध्येयपथावर युवक चालले
अविरत अमुच्या तपस्येतुनी, संघटनेचे तत्त्व उदेले
संघटनेचे सेवक आम्ही ॥१॥

समाजसेवा ब्रीद आमुचे स्वार्थ सुखाची आस नसे
थोर कारणी देह वहावा एक मात्र हा ध्यास असे
ध्येय पथावर सैनिक आम्ही ॥२॥

खडतर असले वाण घेतले स्वेच्छेने तर आम्ही आमुच्या
या भूमीचे भाग्य अखेरी प्रयत्नातुनी घडेल आमुच्या
पराक्रमाचे पाइक आम्ही ॥३॥

तमा न आम्हा कळिकाळाची केवळ अमुचे कार्य करू
कर्तव्याचे पूजक आम्ही ध्येयास्तव या जगू मरू
चिरविजयाचे वारस आम्ही ॥४॥

### अयोध्येत धर्मध्वज : सनातन संस्कृतीचा गौरवशाली क्षण

मार्गशीर्ष शुक्ल पंचमी अर्थातच, २५ नोव्हेंबर २०२५ या पवित्र दिवशी अयोध्येतील मंदिराच्या कळसावर धर्मध्वजाची स्थापना झाली. ध्वज हे राष्ट्राच्या अस्तित्वाचे आणि संस्कृतीच्या अभिमानाचे सन्मानचिन्ह आहे. ५०० वर्षांच्या संघर्षानंतर धर्मध्वजाची स्थापना होणे हा प्रत्येक भारतीयांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. प्रभू श्रीरामांच्या सैन्यध्वजाप्रमाणे दैवी कोविदार वृक्ष, सूर्यवंशी रघुवंशाचे प्रतीक असलेला तेजोमय सूर्य आणि ब्रह्मांडाचे बीजाक्षर 'ॐ' यांची नक्षी असलेला हा ध्वज श्रीराममंदिराच्या कळसावर स्थापन होणे, हे भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान आहे. यातून राष्ट्रीयत्वाची भावना निश्चितच अधिक दृढ होईल. रामराज्यात जसे सर्वांना समान न्याय मिळत होता, महिला सुरक्षित होत्या आणि प्रजेला शिस्त, नैतिकता व कर्तव्यपालनाचे भान होते, तसे आदर्श राज्य घडण्यासाठी आज प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकानेही वैयक्तिक स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपल्या अंतरंगात साधनेचे बीज रोवून प्रभू श्रीरामांचे आदर्श गुण आचरणात आणणे, हा खऱ्या अर्थाने सनातन राष्ट्राचा शंखनाद ठरेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### गुरुचरित्र सप्ताह

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्र सप्ताह असे म्हणतात. भगवान दत्तात्रेय यांच्याशी संबंधित दत्त संप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे श्री गुरुचरित्र हा होय. दत्त जयंतीपूर्वी सात दिवस दत्त भक्त (पुरुष) या गुरुचरित्र ग्रंथाचे काटेकोर नियम पाळून वाचन करतात. दत्त जयंतीला या वाचनाचे पारणे करतात. श्री गुरुचरित्र हा श्रीदत्तात्रेयाचे अवतार मानल्या जाणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती यांच्याबद्दलचा चरित्रग्रंथ आहे. सरस्वती गंगाधर रचित हा ग्रंथ दत्त संप्रदायाच्या कथा सांगणारा आहे. गुरुचरित्र या ग्रंथात एकूण ५२ अध्याय असून त्यात ७४९१ ओव्या आहेत. मंगलाचरण, गुरुभक्ती आणि गुरुप्रसाद हे या ग्रंथाचे प्रमुख विषय आहेत.

व्यक्तीपेक्षा गुरू या पदाला आणि गुरू-शिष्य या नात्याला गुरुचरित्रात महत्त्व दिलेले आढळते. अवतरणिका असे विषय या ग्रंथामध्ये आहेत. गुरूची कृपा प्राप्त करणे, ऐहिक आणि पारमार्थिक जीवनातील यश मिळविणे याचे मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आहे. श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती ही दोघेही दत्तात्रेय यांचा अवतार मानले गेले आहेत. गुरुचरित्र या ग्रंथाचे पारायण हा दत्त संप्रदायातील महत्त्वाचा घटक मानला जातो. दररोज सकाळी स्नान करून संकल्प करावा. यासाठी कायम एकच आसन वापरावे. पारायण करणाऱ्या व्यक्तीने सात्त्विक आहार घ्यावा. दिवसभर नामस्मरण करावे. पारायण काळात घोंगडी पसरून जमिनीवर झोपावे. पारायण काळात शरीर, मन आणि बुद्धी यांची शुद्धता पाळावी. दत्त जयंतीच्या दिवशी दत्ताची मनोभावे पूजा आणि नामजप केल्यास दत्त-तत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास मदत होते. श्री दत्त ही पूर्वजांना पुढील गती देणारी देवता आहे. श्री गुरुदेव दत्त । हा दत्ताचा नामजप आणि प्रार्थना अधिकाधिक करावी. सायंकाळी दत्त स्तोत्राचे पठन करावे आणि दत्त प्रभूंची कृपा संपादन करावी.

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

## महत्वाचे...



### रेल्वे विभागाच्या वतीने संविधान प्रस्तावनेचे वाचन

**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने भारतीय संविधानात समाविष्ट असलेल्या मूलभूत मूल्यांप्रती असलेल्या आपल्या सामूहिक वचनबद्धतेची पुष्टी करत संविधान दिन २०२५ मोठ्या सन्मानाने आणि देशभक्तीच्या उत्साहाने साजरा केला.विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ.सुजित मिश्रा यांच्यासह अधिकारी व कर्मचारी आदी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या तत्त्वांचे पालन करण्यासाठी एकता, सामायिक संकल्पाचे प्रतीक असलेल्या सामूहिक वाचनात सहभागी झाले होते.




### अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात शहिदांना अभिवादन

**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**
अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आले.प्रा.अनंत सुरते यांनी संविधानाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे तसेच भारतीय लोकशाहीची पायाभूत तत्त्वे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य इस्माईल शेख, मुख्याध्यापिका मेहजबीन शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.अर्चना दीक्षित यांनी प्रास्ताविक केले. प्रा.धनाजी धेंडे यांनी सूत्रसंचालन केले. संविधान प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कुमठे प्रशालेमध्ये संविधान दिन व शहीद दिन साजरा

**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**
येथील कुमठे प्रशालेमध्ये संविधान दिन व शहीद दिन साजरा करण्यात आला. प्रा.संजय जाधव यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, शिक्षिका सुवर्णा धारेराव यांनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान, जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक वसंत गुंगे, कलाशिक्षक शांतप्पा काळे उपस्थित होते.



### समता सैनिक दलाच्या वतीने डॉ.आंबेडकर यांना मानवंदना

**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**
संविधान दिनाच्या अमृत महोत्सवनिमित्त समता सैनिक दलाच्या वतीने सुमित्रा केरु जाधव, अण्णासाहेब भालशंकर यांच्या हस्ते पार्क चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पकार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी सुनीता अरुण गायकवाड, सुचित्रा थोरे, मंजुश्री खंडागळे, विठ्ठल थोरे, अंगद जेटीथोर, प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, रत्नदीप कांबळे, यशवंत फडतरे, बाबासाहेब सातपुते, प्रा.युवराज भोसले आदी उपस्थित होते.

# सोलापूरचा विकास पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर करणार

## सत्ताधारी भाजपच्या काळात शहराचा विकास खुंटला ; नव्याने शहराचा विकास आराखडा मांडणार सत्तेतील सहभागी राष्ट्रवादीचा भाजपवर घणाघात

### विधानसभेचे उपाधक्ष अण्णा बनसोडे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर**
सोलापूर शहर जिल्ह्याचा विकास गेल्या अनेक वर्षांपासून म्हणावा तसा झाला नाही. यापुढील शहराचा विकास आराखडा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर असेल, त्यासाठी आमचा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूर शहर जिल्ह्याचा विकास खुंटला आहे. मात्र आता सोलापूरचे रूप पालटण्यासाठी ''मी इथे आलो आहे. कारण सोलापूर हे माझे आजोळ आणि जन्मस्थळ आहे. सोलापूर शहर जिल्ह्यासाठी माझा एक प्रकारे वेगळा जिव्हाळा आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याची संपूर्ण जबाबदारी मी माझ्या खांद्यावर घेतली आहे.''

त्यामुळे आगामी महापालिका निवडणूक स्वबळावर लढणार आहोत. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत राहील. तर काही जागेवर स्वबळावर लढणार असल्याचा निर्वाळा सत्तेतील सहभागी मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख नेते महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष तथा सोलापूर शहर जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी गुरुवारी दुपारी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत प्रसार माध्यमांशी बोलताना केला.



#### बी.एल. ओ.मार्फत मतदार यादीचे काम होणे गरजेचे

मतदार यादीत झालेला मतदारांचा घोळ लक्षात घेता, कार्यकर्त्यांनी निवडणूक लागण्यापूर्वीपासूनच मतदार यादीचे काम करणे गरजेचे आहे. बी.एल. ओ.मार्फत मतदार यादीचे काम होणे गरजेचे आहे. तरच त्यामध्ये सत्यता टिकून राहते. आता सध्या राज्यात मतदार यादीचा घोळ कायम आहे. असेही अण्णा बनसोडे म्हणाले.

#### एम.आय.एमचे उर्वरित नगरसेवक देखील राष्ट्रवादीत दाखल होणार

गत महापालिका निवडणुकीत एमआयएम पक्षाने सोलापूर महापालिकेत नऊ जागा जिंकत एक वेगळे अस्तित्व निर्माण केले. परंतु पाच वर्षात एम.आय.एम. पक्षातील ६ माजी नगरसेवक एम.आय.एम. पक्ष सोडून आमच्या पक्षात दाखल झाले असून, उर्वरित नगरसेवक देखील आमच्या राष्ट्रवादीत लवकरच दाखल होतील असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला.

#### शहराच्या संपूर्ण २६ प्रभागात संकल्प यात्रा पोहोचणार

तीन दिवसांच्या सोलापूर दौऱ्यात प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्ता आणि मतदार यांच्याशी संपर्क साधून अडीअडचणी जाणून घेणार आहोत. महापालिका निवडणुकीच्या दृष्टिकोनातून शहरातील संपूर्ण २६ प्रभागात पोहोचण्याचा संकल्प या यात्रेनिमित्त केला असल्याचे अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले, राज्यात अजित पवार यांची राष्ट्रवादी महायुतीमध्ये आहे. शिवाय पक्षामध्ये प्रवेश करणाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेता आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहरातील सर्व २६ प्रभागात १०२ जागा लढवून किमान ७५ जागा जिंकून सत्तेत येईल, यापूर्वी सोलापूर महापालिकेवर काँग्रेसची त्यानंतर भाजपची सत्ता होती. या काळात सोलापूरचा विकास म्हणावा तशा प्रगतीने झाला नाही. यापुढे सोलापूर शहराचा विकास हाच आमचा ध्यास असणार आहे. त्यासाठी सोलापूर शहराच्या विकास आराखड्यासंबंधी काम चालू आहे. लवकरच तो प्रसिद्ध करणार आहोत. नव्वदीच्या काळामध्ये सोलापूरच्या प्रत्येक भागात एक दिवसाआड पाणी येत होते. आता बिकट अवस्था तीन झाली आहे. असे प्रश्न विचारले असता, त्यांनी विकासकामांवरून सत्ताधाऱ्यांवर याचे खापर फोडले. तत्पूर्वी तीन दिवसांच्या सोलापूर दौऱ्यावर आलेल्या महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे जंगी स्वागत जुने पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे मोठ्या उत्साही वातावरणात करण्यात आले.

या पत्रकार परिषदेस शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, सुधीर खरटमल, महिला अध्यक्षा संगीता जोगदंडकर, चित्रा कदम, माजी नगरसेवक गणेश पुजारी, प्रदेश सचिव प्रमोद भोसले, आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## मार्कंडेय जलतरण तलाव परिसरातील अतिक्रमणे हटविले

### चार खोके निष्काष्कित, चारचाकीच्या चार गाड्या जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**
अक्कलकोट रोडवरील मार्कंडेय जलतरण तलाव ते उद्यान या रस्त्यावरील अतिक्रमण सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या पथकाकडून हटविण्यात आले. या कारवाईत चार खोके निष्काष्कित करण्यात आली. चारचाकीच्या चार गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

यावेळी फुटपाथवरील खोके, पत्राशेड, पानटपरी, हातगाडी आदी अतिक्रमण काढण्यात आले. जेसीबीच्या सहाय्याने व पोलीस बंदोबस्तात म



हानगरपालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी अतिक्रमण प्रतिबंधक विभागप्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून कनिष्ठ अभियंता सूफियान पठाण यांच्यासह कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## तालुक्यातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांना तब्बल १६ कोटींची मंजुरी

### आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नाला यश

**भा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**
महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केंद्रीय मार्ग निधी CRIF योजनेअंतर्गत २०२५-२०२६ या वर्षासाठी एकूण १०३ कामांना तब्बल १६८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या मंजूर कामांमध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोन महत्त्वपूर्ण रस्त्यांचा समावेश असून, त्यासाठी १६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सीआरआयएफ योजनेअंतर्गत प्रत्येक वर्षी महत्त्वपूर्ण प्रकल्पांना मान्यता दिली जाते. या वर्षीच्या मंजुरीमध्ये दक्षिण तालुक्याचे विशेष वाढीव प्रतिनिधित्व दिसून येते. या दोन



रस्त्यांसाठी मोठ्या निधीची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. स्थानिक नागरिकांनी वारंवार रस्ता दुरुस्तीबाबत मागण्या केल्या होत्या. यासंदर्भात आमदार सुभाष देशमुख यांनी राज्य आणि केंद्रस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्याप्रयत्नांना अखेर यश मिळाले असून शासनाने मंजुरीचा निर्णय घेतला आहे.

सीआरआयएफ अंतर्गत मंजूर झालेल्या कामांमध्ये पहिल्या प्रकल्पात कुर्घोट - माळकवठे - निंबर्गी - विंचूर रस्त्याच्या सुधारणा कामासाठी ६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. दुसऱ्या प्रकल्पात मंद्रूप - निंबर्गी - भंडारकवठे रस्त्याच्या सुधारणा कामासाठी १० कोटी रुपये दिले गेले आहेत. हा रस्ता दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामीण भागाला मुख्य महामार्गांशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. स्थानिक ग्रामस्थांनी आमदार सुभाष देशमुख यांचे आभार व्यक्त केले आहेत. पुढील काही महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण करून कामाला वेग येणार आह. निधी मंजूर केल्याबद्दल आमदार सुभाष देशमुख यांनी शासनाचे आभार मानले.

## नांदणीच्या महाराजा ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांचा छापा; २१ जणांवर गुन्हे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर ,**
नांदणी येथील महाराजा आर्केस्ट्रा बारवर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने रविवारी मध्यरात्री छापा टाकून २६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच २१ जणांविरुद्ध मंद्रूप पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर १५ महिलांना नोटीस देऊन सोडण्यात आले. या बारमध्ये बेकायदा धंदे होत असल्याची खबर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळाली होती. लेडीज बारला बंदी असताना या बारमध्ये महिलांकडून तोकडे कपडे घालून अश्लील नृत्य केले जात होते. तसेच नियमाचे उल्लंघन करून रात्री उशिरापर्यंत बार सुरू ठेवला जात होता. त्यामुळे रविवारी मध्यरात्री पोलिसांनी छापा टाकला. पोलिस बारमध्ये गेले तेव्हा मोठ्या आवाजात संगीत सुरू होते. स्टेजवर १५ महिला अश्लील हालचाली करत नृत्य करत होत्या. प्रेक्षक त्यांच्यावर नकली नोटा व कूपन उधळताना दिसून आले. पोलिसांनी छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले.

संतोष ईरप्पा हिरेमठ विजापूर नाका, सोलापूर, नितीन दीपक जाधव श्रीहरी पार्क जुळे सोलापूर, शरणाप्पा नागप्पा तेली, शिवशरण सोमनाथ दिवटे, संजय मनोहर झेंडेकर, बबलू महमद नदाफ सर्वजण रा. टाकळी (ता. दक्षिण सोलापूर), राजेश विलास गायकवाड, सेटलमेंट फ्री कॉलनी सोलापूर, सचिन शिवाजी जाधव भैरु वस्ती सोलापूर, सैफ फकरोद्दीन जमादार, कमलानगर सोलापूर, आकाश चंद्रकांत जाधव, सेटलमेंट फ्री कॉलनी सोलापूर, नंदू मुनीलाल गोस्वामी, महाराजा बार नांदणी, दत्ता केशव जाधव, रामवाडी सोलापूर, यतिराज सुधीर सुपाते, देगांव (ता.उत्तर सोलापूर), आदिनाथ हणमंत बाबर, देगाव, (ता उत्तर सोलापूर), आदित्य नागेश मेणसे, सलगर वस्ती सोलापूर, अक्षय सतीश शेंडे दमाणी नगर सोलापूर, प्रशांत सुखदेव घुले, लक्ष्मी चाळ सोलापूर, गौस युसूफ विजापूर, सलगर वस्ती सोलापूर, संतोष राजप्पा पाटील, बीदर, कर्नाटक, अन्वर हुसेन आत्तार, जामखाना गल्ली विजापूर, विठ्ठल गायकवाड, सोलापूर या २१ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बारमधील १५ नृत्यांगना या उत्तर प्रदेश, कोलकाता, उत्तराखंड, राजस्थान या राज्यांतील असल्याचे सांगण्यात आले.

या बारमध्ये दुर्गेश सनद, गोविंद गोस्वामी, हीरोकुमार गोस्वामी, लल्लन पंडित यांसह इतरांना पोलिसांनी ताब्यात घेतले. वारचा मॅनेजर संजू उर्फ परसप्पा गायकवाड व मालक रोहित चव्हाण असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी केलेल्या पंचनामादरम्यान नकली नोटांचे ८ बंडल सापडले. यावेळी साउंड सिस्टम, अम्लिफायर, मिक्सर, तसेच १० चारचाकी वाहने ३ मोटारसायकली व एक रिक्षा ७ मोवाईल फोन असा २६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मंद्रूप पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांनी सर्व महिला व गुन्हा दाखल झालेल्यांना नोटीस दिल्याचे सांगितले.

## द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशनची सुरुवात

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**
ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने त्यांच्या गुरुग्राम आवृत्तीत द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन ची सुरुवात केली, ज्यामध्ये तंत्रज्ञान, डिझाइन आणि आकर्षक कथाकथन फॅशनच्या अनुभवाची पुनर्कल्पना कशी करत आहे याचा एक अभूतपूर्व शोध घेण्यात आला. फॅशनच्या पुढील वाटचालीची व्याख्या करण्याच्या या वर्षीच्या ध्येयापासून पुढे जात, या आवृत्तीने एक अविश्वसनीयपणे आकर्षक असे दृश्य सादर केले ज्यामुळे फॅब्रिक आणि त्याचे स्वरूप याच्या पलीकडे, एआय, कोड आणि परस्परसंवादाच्या डिजिटल युगाची झलक दिसली.ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर नेहमीच क्रिएटिव्हीटी आणि एक्सप्रेशन यांच्या सीमांच्या पलीकडे नेणारे व्यासपीठ राहिले आहे,असे पर्नोड रिकार्ड इंडियाच्या सीएमओ देबश्री दासगुप्ता म्हणाल्या.एफडीसीआयचे अध्यक्ष सुनील सेठी म्हणाले, गुरुग्राम आवृत्ती क्रिएटिव्हीटी, संस्कृती साजरी करते आणि भारतीय फॅशनमध्ये पुढील गोष्टींची गती निश्चित करते.

**CHANGE IN NAME**
I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Alimuddin Basumiya Naikwadi** HAS BEEN CHANGED TO **Aleem Basumiya Naikwadi**
Resi. - Plot No.314, Siddheshwar Nagar Bhag-4, New Jindagi Chowk, Solapur
**KINDLY NOTE**
THE SAME. (41772 Dtd.27.11.2025)

## भाजपाजवळ मोदीजीरुपी ऑक्सिजन : चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २८ नोव्हेंबर -**
पंतप्रधान नरेंद्र मोदीजी हे प्राणवायूसारखे आहेत. त्यामुळे भाजपाजवळ २४ बाय ७ ऑक्सिजन आहे. कोणी कितीही हायड्रोजन बॉम्ब आणले, तरीही विजय ऑक्सिजनचाच होतो. असे प्रतिपादन भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. बिहार विधानसभा निवडणुकीच्या लागलेल्या निकालात सत्तारुढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं दणदणीत यश मिळवलं. त्यानंतर भाजपाने मुंबईत विजयोत्सव साजरा केला.

**जाहीर नोटीस**
**खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे**
तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी तालुक्यातील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळिवण्यात येते की,
श्री. सुरेश प्रभाकर ठोंगे यांच्याकडुन डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे-बार्शी शहर येथील प्लॉट जागा जुना गट नं. ९१५/१/२अ, याचा नविन गट नं. ९२१/१/२अ मधील क्षेत्रफळ ०२ आर. याबाबतचे रजिस्टर खरेदीखत बरस दस्त नं. ४४६/२००६ व खरेदी दस्त नं. ५०९३/२०१२ आणि सदर खरेदीखताचे इंडेक्स २ व आर. आर. पावती हे अनावधानाने हिंगणगांव ते बार्शी रोड दरम्यान दि. ३१/१०/२०२५ रोजी गहाळ होऊन हरविलेले आहे, त्याबाबत त्यांनी ऑनलाईन सोलापूर पोलिस स्टेशन येथे दि. २४/११/२०२५ रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे.
श्री. सुरेश प्रभाकर ठोंगे यांना सदर जागा कर्ज प्रकरण करुन बँकेकडे तारण ठेवण्याकरीता खरेदी दस्त नं. ४४६/२००६ व ५०९३/२०१२ आवश्यक आहे. परंतु, सदर खरेदीखत हरविल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधून आणुन द्यावे अथवा आमचे अशिल मुळ खरेदी दस्त ऐवजी दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील यदाकदाचित याबाबत कोणाचीही काही हरकत अथवा सदर मिळकतीबाबत हक्क, हितसंबंध, गहाण, टाच, बोजा अशाप्रकारे हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. अन्यथा, मुदतीनंतर आमचे अशिल कोणाचीही कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरुन सदरील मिळकत बँकेकडे तारण ठेवतील. नंतर कोणाचीही कसलीही हरकत आल्यास आमचे अशिलांच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे. दि. २८/११/२०२५
सही/-
अशिलातर्फे ॲड.
**श्री. संतोष गोपीनाथ गायकवाड**
बी.ए. एल.एल.बी.
उपळाई रोड, चव्हाण प्लॉट, बार्शी, ता. बार्शी
जि. सोलापूर मो. नं. ९८५०५८७७१५

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**
सोलापुर शहर व आजुबाजुचे परिसरातील तमाम लोकांस आमचे अशिल नुरजहाँ महिबुब शेख, यांनी दिलेल्या माहितीवरुन या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,
सोलापुरातील व आजूबाजूचे परिसरातील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येत की, डी।।। सब डी सोलापूर, ता.उ. सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका सोलापूर हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २२४/२ व नवीन सर्व्हे नं. ५५/२ या पैकी प्लॉट नं. २२० यांसी म.न.पा मिळकत क्रमांक ६४४४९७ यापैकी पेठ विजयनगर, मजरेवाडी या नावांने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट घरजागा असून याची हद्द पुर्वपश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण १००० चौरस फुट इतके असून याचेच ९२.९३ चौ.मी. आहे.
यात आ सी सी बांधकाम करुन वरती स्लॅब घातलेल्या ४ खोल्या आहेत. यात लाईट, नळ व संडास बाथरुमची सुविधा आहे.
वर नमुद संपुर्ण मिळकत घरजागा ही नबीसाब महिबुब पटेल, यांचे मालकी व कब्जे वहिवाटीचे असून सदरची मिळकत आजमितीस त्यांचे मालकी व कब्जे वहिवाटीत आहे.
सदरची संपूर्ण मिळकत घरजागा आमचे अशिलास नबीसाब महिबुब पटेल, यांनी सदरची मिळकत खुष खरेदीने विकत देण्याचे मान्य व कबुल करुन आमचे अशिल नुरजहॉ महिबुब शेख, यांचेकडून या खरेदी व्यहारापोटी बरीच मोठी रक्कम इसार म्हणून घेतलेली आहे तसे ते स्विकारलेले आहे. तरी सदरची संपूर्ण मिळकत घरजागा ही निर्वेध व निजोखमी आहे असा विश्वास व भरवसा आमचे अशिलास दिलेला आहे.
तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही तक्रार, वांदे हरकती व कसल्याही प्रकारचा मालकी हक्क, खरेदी देण्याचा हक्क, करार, मदार, लीज, लिन, जप्ती, टाच, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, बोजा, चार्ज, कब्जा, कोर्ट वाद, वहिवाटी हक्क, वारसा हक्क अधिकार, कुलमुख्त्यार, दिवाणी वाद, इंजमेटरी राईट इत्यादी किंवा इतर अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा व हक्क, हितसंबंध असल्यास अथवा न्यायालयात वादाचा विषय असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत आम्हांस खालील नमूद पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी व तसे आम्हांस लेखी स्वरूपात कळवावे. मुदतीत कोणाचेही कसलेही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची मिळकत ही संपूर्ण निर्वेध निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील तद्नंतर याबाबत कोणाचेही हरकत आल्यास ते आमच्या अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. या खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २७/११/२०२५
सही/-
**ॲड. एस.एम. ढेकणे**
रा. १२६-ओ वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र- १ दिनांक १८/१०/२०२३
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे ११**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर**
ईमेल: eeudmd@yahoo.co.in
दूरध्वनी क्र. ०२१८३-२३६५१२, फॅक्स ०२१८३-२३६५५१

**ई-निविदा सूचना क्र.३ सन २०२५-२६**
महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ : https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.
निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रूपये |
|---|---|---|---|
| १ | सीना माढा उपसा सिंचन योजना रब्बी व उन्हाळ आवर्तन सन २०२५-२६ मध्ये बाह्य अभिकरणाद्वारे सिंचन व्यवस्थापन करणे. | सोलापूर | १७.०० लक्ष |
| २ | सीना माढा उपसा सिंचन योजना खरीप, रब्बी व उन्हाळ आवर्तन सन २०२५-२६ मध्ये बाह्य अभिकरणाद्वारे बंदीस्त नलीका वितरीका क्र. १ व २ सिंचन व्यवस्थापन करणे. | सोलापूर | १६.९४ लक्ष |
| ३ | उजनी धरणाच्या उजव्या बाजूकडील राष्ट्रीय महामार्ग ६५ ते धरण पोहोच रस्त्याचे दुरुस्ती व डांबरीकरण करणे. | सोलापूर | ३१.९६ लक्ष |
| ४ | उजनी धरण व्दितीय द्रोण पातळी मधील Piers चे Construction Joint मधील गळती (Sweating) थांबवण्यासाठी उर्ध्व बाजूने ईपॉक्सी मॉर्टर च्या सहाय्याने उपाययोजना करणे. | सोलापूर | ३६.७७ लक्ष |
| ५ | सीना माढा उपसा सिंचन योजना पंपगृहाच्या आवारास संरक्षक भिंत बांधणे | सोलापूर | ३२.७६ लक्ष |

ई-निविदा उपलब्ध कालावधी दिनांक २८/११/२०२५ ते दिनांक ५/१२/२०२५
ई-निविदा उघडण्याचा दिनांक ८/१२/२०२५
**जा.क्र. उधव्यवि/लेशा/५०२५/सन२०२५**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भीमानगर**
**दि. २०/११/२०२५**
DGIPR/20526/No.5/C4252
सही/-
(सु. उ. डुंबरे)
कार्यकारी अभियंता
उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### यश गुल्हानेला कांस्य

**जयपूर :** येथे आयोजित खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक जलतरण प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा



जलतरणपटू यश गुल्हाने (रायसोनी इंजीनियरिंग कॉलेज) याने ०:३०.४९ सेकंदात स्पर्धा पूर्ण करून कांस्यपदक पटकावले. रा तु म नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, कुलसचिव श्री,राजु हिवसे व क्रीडा संचालक डॉ. संभाजी भोसले, डॉ. जय क्षीरसागर डॉ. प्रवीण लामखाडे यांनी यशचे अभिनंदन केले. पुरुषांच्या २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक शर्यतीत मुंबई विद्यापीठाच्या दीपक बाजीराव पाटीलने रौप्यपदक पटकावले. पाटीलने २:२८.८६ वेळ नोंदविली. पुरुषांच्या ५० मी. फ्री स्टाइल प्रकारात पुणे विद्यापीठाच्या साहिल पवारने (२४.३५ सेकंद) रौप्यपदकाची कमाई केली. मुंबई विद्यापीठाच्या जलतरणपटूंनी ४ बाय २०० मीटर फ्रीस्टाईल रिले स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले. भारोत्तोलन स्पर्धेत ६५ किलो वजन गटात पुणे विद्यापीठाच्या संजय लोखंडेने सुवर्णपदक पटकावले. ■

### संतोष करंडकाच्या अंतिम फेरीचे सामने आसाममध्ये

**नवी दिल्ली :** प्रतिष्ठेच्या संतोष करंडक २०२५-२६ साठी ७९ व्या राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरी जानेवारी २०२६ मध्ये आसाममध्ये होणार आहे. गट टप्पे १५ ते २६ डिसेंबर २०२५ दरम्यान नऊ ठिकाणी होतील. पस्तीस संघ गट टप्प्यात भाग घेतील, ज्यामध्ये नऊ गट (चार संघांसह आठ गट आणि तीन संघांसह एक गट) असतील. गटातील विजेते संघ धाकुआखाना आणि धेमाजी येथे होणाऱ्या १२ संघांच्या अंतिम फेरीत यजमान आसाम, गेल्या हंगामातील विजेता पश्चिम बंगाल आणि उपविजेता केरळ यांच्यासोबत सहभागी होतील. आसामने शेवटचे संतोष करंडकाच्या अंतिम फेरीचे आयोजन २०१०-११ च्या हंगामात केले होते जेव्हा पश्चिम बंगालने गुवाहाटी येथे मणिपूरला हरवून संतोष करंडक जिंकला होता. १५ डिसेंबर रोजी गट अ- जम्मू-काश्मीर विरुद्ध लडाख, हिमाचल प्रदेश विरुद्ध पंजाब, गट क- बिहार विरुद्ध रेल्वे, झारखंड विरुद्ध दिल्ली, गट ड- मिझोराम विरुद्ध नागालँड, मणिपूर विरुद्ध त्रिपुरा सामने होतील.

### भारताचा न्यूझीलंडवर रोमहर्षक विजय

**इपोह :** भारतीय पुरुष हॉकी संघाने गुरुवारी इपोह येथील सुल्तान अझलन शाह चषक स्पर्धेत झालेल्या चुरशीच्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ३-२ असा विजय मिळवत दमदार कामगिरी केली. भारताकडून अमित रोहिदास (४), संजय (३२) आणि सेल्वम कार्ती (५४) यांनी गोल केले, तर न्यूझीलंडकडून जॉर्ज बेकरने ४२ व्या आणि ४८ व्या मिनिटाला दोन गोल केले. न्यूझीलंडने सामन्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात सुरुवात केली, परंतु भारताच्या बचावफळीने गोल करण्याच्या कोणत्याही संधी रोखल्या. भारताने एका सुव्यवस्थित खेळाद्वारे पहिली महत्त्वाची संधी निर्माण केली, ज्यामुळे पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि अमित रोहिदासने एका शक्तिशाली ड्रॅग-फ्लिकने यशस्वीरित्या रूपांतरित करून भारताला आघाडी मिळवून दिली. न्यूझीलंडच्या गोलरक्षकाने अभिषेकचा जवळून मारलेला फटका वाचवला तेव्हा भारत पुन्हा गोल करण्याच्या जवळ होता, आणि पहिल्या चरणाचा शेवट १-० ने झाला. भारताने उत्तरार्धाची जोरदार सुरुवात केली आणि सुरुवातीलाच आघाडी वाढवली, कर्णधार संजयने पेनॉल्टी कॉर्नरवरून गोल केला. भारताकडून गोल करण्यात पवनने उत्कृष्ट कामगिरी केली.

### जिल्हा १२ वर्षांखालील क्रिकेट निवड चाचणी ६,७ डिसेंबरला

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

जिल्हा १२ वर्षांखालील मुले व मुलींची क्रिकेट निवड चाचणी ६ व ७ डिसेंबर रोजी येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ पर्यंत होईल. एक जानेवारी २०१३ नंतर जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. ही निवड चाचणी चेअरमन अनिल सांब्रणी, योगेश कोम्पल, राजेश येमूल, मुश्ताक खैराटकर, आनंद शेलार व किरण मणियार हे करणार आहेत. इच्छुक खेळाडूंनी नोंदणी शुल्काच्या पुराव्यासह मैदानावर उपस्थित रहावे, असे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सो यांनी कळविले आहे.

# भारत जेतेपद मिळविण्यासाठी सज्ज

## कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धा आजपासून




कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषकासह स्पर्धेत सहभागी झालेल्या संघांचे कर्णधार

**◆ चेन्नई, २७ नोव्हेंबर**

शुक्रवारपासून येथे कनिष्ठ पुरुष गटाच्या हॉकी विश्वचषक स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. यजमान भारत शुक्रवारी पहिल्या गट साखळी सामन्यात चिलीविरुद्ध आपली मोहीम सुरू करणार आहे. स्पर्धेच्या इतिहासातील संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात यशस्वी संघ असलेला भारत नऊ वर्षांनंतर घरच्या मैदानावर जेतेपद मिळवण्याच्या तयारीत असेल.

पहिल्यांदाच, २४ संघ यजमान शहरे चेन्नई आणि मदुराई येथे जेतेपदासाठी लढतील. दोन वेळा विजेता असलेल्या भारतीय संघाने २०१६ मध्ये लखनौमध्ये आताच्या वरिष्ठ महिला संघ प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली शेवटचा स्पर्धा जिंकली होती. तो गट ब मधून प्रगतीसाठी पसंतीचा संघ आहे.

भारत आणि चिली शिवाय ओमान व स्वित्झर्लण्ड हे गट मब मधील इतर संघ आहेत. ऑपरेशन सिंदूर नंतर सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तानने स्पर्धेत सहभागी होण्यास नकार दिला. स्पर्धेत ओमानने पाकिस्तानची जागा घेतली.

भारताने दोनदा जेतेपद जिंकले आहे- २००१ मध्ये होबार्ट येथे आणि २०१६ मध्ये लखनौ येथे. ४६ वर्षांपूर्वी १९७९ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेत जर्मनी हा सर्वात यशस्वी संघ आहे. जर्मनीने सात जेतेपदे जिंकली आहेत. अर्जेंटिना भारतासोबत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात यशस्वी संघ आहे. अर्जेंटिनाने २००५ आणि २०२१ मध्ये विजेतेपद जिंकले होते. पाकिस्तानने १९७९ मध्ये व्हर्साय (फ्रान्स) येथे पहिल्या आवृत्तीत आणि ऑस्ट्रेलियाने १९९७ मध्ये मिल्टन केन्स येथे भारताला हरवून जिंकले होते.

२०२३ मध्ये क्वालालम्पूर येथे झालेल्या शेवटच्या आवृत्तीत, भारत चौथ्या स्थानावर राहिला, कांस्यपदकाच्या सामन्यात स्पेनकडून १-३ असा पराभव पत्करावा लागला आणि जर्मनीने विश्वचषक जिंकले.

जगात दुसऱ्या क्रमांकावर असलेला भारत जेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहे. ही स्पर्धा दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता गोलरक्षक-प्रशिक्षक पी.आर. श्रीजेशसाठी सर्वात मोठी परीक्षा असेल. श्रीजेश सुद्धा आपली प्रशिक्षक क्षमता सिद्ध करण्यास उत्सुक असेल.

संघांना राउंड-रॉबिन स्वरूपात प्रत्येकी चार अशा सहा गटांमध्ये विभागण्यात आले आहे. प्राथमिक फेरीनंतर, गट विजेते आणि दोन सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकाचे संघ उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील.

◄(वृत्तसंस्था)



## रेल्वे व्हॉलिबॉल : सेवासदन; पानगल, नागनाथ विद्यालय मोहोळची सलामी

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

शालेय १७ वर्षाखालील संविधान चषक व्हॉलिबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात सेवासनद, एम.ए. पानगल प्रशालेसह मोहोळच्या नागनाथ विद्यालयाने विजयी सलामी दिली.

मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर विभागीय स्पोर्ट्स असोसिएशन मध्य रेल्वे सोलापूर व ऑल इंडिया एसटी एससी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधान दिनानिमित्त ही स्पर्धा आयोजिली आहे. यात मुलांच्या गटात १८ व मुलींच्या गटात १२ संघानी भाग घेतला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे ए.डी.आर.एम अंशूमली कुमार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ कार्मिक अधिकारी विपिन कुमार सिंग, ऑल इंडिया एसटी एसटी असोसिएशनचे अध्यक्ष विराज गायकवाड, सेंट्रल रेल्वे मजदूर युनियनचे सचिव उल्हास बागेवाडी, किशोर पिल्ले, ऋषिकेश यरगल आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे माजी राष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू सुदेश मालप व अनिल यरगल यांनी स्पर्धेतील मुले व मुली दोन्ही गटाच्या प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी आपले वडील कै वीरभद्र रेगळ व पै. हिमायत अली शेख यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत केले आहेत. स्पर्धेतील वैयक्तिक बक्षिसे सचिन बनसोडे यांनी आपले वडील कालकथित बनसोडे यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत केली आहेत स्पर्धेतील दोन्ही गटातील विजेत्या प्रथम तीन क्रमांकाच्या संघांना रू ५ व २ हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे.

**आजचे निकाल :** सेवासदन अ वि. वि. सेवासनद बी, एम.ए. पानगर वि. वि. मंद्रूप ब, नागनाथ मोहोळ वि. वि. सेवासदन

## प्रशिक्षक केवळ संघ तयार करू शकतात, पण कामगिरी खेळाडूंनाच करावी लागते : गावस्कर

**◆ नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

मुख्य प्रशिक्षक केवळ संघ तयार करू शकतात, मैदानावर कामगिरी खेळाडूंनाच करावी लागते, असे म्हणत लिटील मास्टर व माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी गौतम गंभीरची पाठराखण केली आहे.

गुवाहाटीतील दुसऱ्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ४०८ धावांनी झालेल्या पराभवानंतर गंभीरवर टीका झाली आहे. या पराभवामुळे पाहुण्या दक्षिण आफ्रिकेने भारताविरुद्धची दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० ने जिंकली.

गंभीरच्या नेतृत्वाखाली भारताचा हा तिसरा कसोटी मालिका पराभव होता. त्याच्या नेतृत्वाखालील १६ महिन्यांत भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध ०-३, परदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध १-३ आणि आता शेवटी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभव पत्करावा लागला आहे.



गंभीर एक प्रशिक्षक आहे. प्रशिक्षक संघ तयार करू शकतो. प्रशिक्षकाला अनुभवी माणूस म्हणून ओळखता येते. पण प्रत्यक्ष मैदानावर कामगिरी ही खेळाडूंनाच करावी लागते, असे गावस्कर यांनी सांगितले.

गंभीर हा तोच प्रशिक्षक आहे ज्याने भारताला चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आशिया चषक जिंकण्यास मदत केली होती आणि आता घरच्या मालिकेतील पराभवानंतर त्याच्यावर जोरदार टीका होत आहे.

कसोटी मालिकेतील पराभवास गंभीरला जबाबदार धरले पाहिजे, असे म्हणणाऱ्यांना माझा उलट प्रश्न आहे की, जेव्हा भारताने आपल्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली तेव्हा तुम्ही काय केले? जेव्हा भारताने त्याच्या नेतृत्वाखाली आशिया चषक जिंकला तेव्हा तुम्ही काय केले?

तेव्हा तुम्ही गंभीरचा वन-डे व टी-२० क्रिकेटसाठी आजीवन करार वाढवावा? तुम्ही ते म्हटले नाही. आणि आता गंभीरला काढून टाकण्याची मागणी करत आहात. जेव्हा एखादा संघ चांगला खेळत नाही तेव्हाच तुम्ही प्रशिक्षकाकडे पाहता, असे गावस्कर म्हणाले.

गावस्कर यांनी इंग्लंडचे सर्व स्वरूपाचे प्रशिक्षक असलेले न्यूझीलंडचे ब्रेंडन मॅक्युलम यांचे उदाहरण देत म्हटले की गंभीरने खेळाच्या सर्व प्रकारांमध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून काम करण्यात काहीही चूक नाही. ब्रेंडन मॅक्युलम हे इंग्लंडसाठी तिन्ही स्वरूपांचे प्रशिक्षक आहेत. बऱ्याच देशांमध्ये सर्व फॉरमॅटसाठी प्रशिक्षक असतो, पण जेव्हा संघ हरतो तेव्हा आपण केवळ एखाद्याकडे पाहतो व बोट दाखवतो.

तुम्ही गंभीरला श्रेय देण्यास तयार नाही. जर तुम्ही त्याला चॅम्पियन्स ट्रॉफी व आशिया चषक विजयाचे श्रेय देण्यास तयार नसाल, तर भारतीय संघाने चांगली कामगिरी केली नाही, त्यासाठी तुम्ही त्याला का दोष देऊ इच्छिता? तुम्ही त्याला का दोष देत आहात? असा उलट प्रश्नही गावस्कर यांनी उपस्थित केला.

भारताचे माजी फिरकीपटू आर. अश्विननेही गंभीरचा बचाव केला आहे. खेळाडूंनी पुरेशी जबाबदारी घेतलेली नसताना त्याला काढून टाकण्याची मागणी करणे योग्य नाही असे गावस्कर यांनी म्हटले आहे. ◄(वृत्तसंस्था)

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

## पराभवाबद्दल पंतने मागितली माफी

### संघ पुन्हा संघटित होईल

**◆ नवी दिल्ली, २७ नोव्हेंबर**

भारतीय कसोटी संघाचा उपकर्णधार ऋषभ पंतने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ०-२ अशा पराभवात संघाच्या निराशाजनक कामगिरीबद्दल माफी मागितली आहे. भारतीय संघ पुन्हा संघटित होईल. संघ पुन्हा लक्ष केंद्रित करेल आणि मजबूत होईल, असे आश्वासन त्याने दिले आहे.

मंगळवार गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताला ०-२ असा पराभव पत्करावा लागला. नियमित कर्णधार शुभमन गिल मानेला दुखापतीमुळे या सामन्यात पंतने घरच्या संघाचे नेतृत्व केले.



संघ ४०८ धावांनी प्रचंड पराभव पत्करला, त्यामुळे घरच्या मैदानावरील अजिंक्यतेचा आभा आणखी कमी झाला आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्याचा त्यांचा मार्ग अधिक कठीण झाला. गत दोन आठवड्यात आपण पुरेसे चांगले क्रिकेट खेळलो नाही या वस्तुस्थितीबद्दल आपल्याला लाज वाटण्याचे कारण नाही. एक संघ म्हणून आणि वैयक्तिक म्हणून, आपल्याला नेहमीच उच्च पातळीवर कामगिरी करायची असते आणि कोट्यवधी भारतीयांना हास्य मिळवून द्यायचे असते, असे पंतने एक्स वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.या मालिकेदरम्यान पंतने चुकीच्या फटक्यांची निवड केल्यीबद्दल त्याच्यावर वैयक्तिकरित्या टीका होत आहे. 'माफ करा, यावेळी आम्ही अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही, परंतु खेळ तुम्हाला शिकायला, जुळवून घेण्यास आणि वाढण्यास शिकवतो- एक संघ म्हणून आणि वैयक्तिक म्हणून... आम्हाला माहित आहे की हा संघ काय सक्षम आहे आणि आम्ही कठोर परिश्रम करू, पुन्हा संघटित होऊ, पुन्हा लक्ष केंद्रित करू आणि संघ आणि वैयक्तिक म्हणून मजबूत आणि चांगले परत येण्यासाठी मेहनत करू, असे तो म्हणाला. ◄(वृत्तसंस्था)

## शालेय राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेत सोलापूरचे १६ खेळाडू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

बारामती येथे ३० नोव्हेंबरपर्यंत सुरु असलेल्या शालेय राज्य सॉफ्टटेनिस स्पर्धेसाठी येथील १६ खेळाडूंची निवड झाली. पुणे विभागीय स्पर्धेतून त्यांची निवड करण्यात आली. या स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात आर्य पवार तर १९ वर्षाखाली गटात केतकी चौगुले, सार्थक धुमाळ यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

यांना सुधीर सालगुडे महेश झांबरे ,अक्षय गवळी पूजा सालगुडे बालाजी केदार चंद्रकांत वाघमोडे गणेश बंडगर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्राध्यापक संतोष गवळी, राज्य लॉन टेनिस मानद सचिव राजीव देसाई, सहसचिव शिवाजी वसपटे, मारूती घोडके, प्रशांत वर्धमाने, व्यंकप्पा शेंडगे, अक्षय गवळी यांनी अभिनंदन केले.

**राज्य स्पर्धेसाठी निवडलेलेले खेळाडू : १४ वर्षाखालील :** आर्य पवार (वि.मो. मेहता प्रशाला), ऋषिकेश चव्हाण (लिटल फ्लॉवर स्कूल), तनुज संचेती (केएलई स्कूल), देवांश क्षीरसागर (डी.बी.एफ दमानी हायस्कूल). मुलीः मृण्मयी गायकवाड (ऑर्किड स्कूल), आराध्या जाधव (राज मेमोरियल स्कूल), नेत्रा मगर (सिंहगड स्कूल), प्रणव्या मेघनातन (इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल).

**१७ वर्षाखालील :** मुले : अजिंक्य वसपटे (निर्मलाताई ठोकळ प्रशाला). मुली : विपश्यना सोनवणे (शांती स्कूल), भवानी हिरेमठ (डीबीएफ दमाणी हायस्कूल).

**१९ वर्षाखालील :** मुले : सार्थक धुमाळ, शिवम हडपत (नेताजी सुभाष चंद्र बोस ज्युनिअर कॉलेज), जोसेफ भंडारी (छत्रपती शिवाजी प्रशाला). मुली : केतकी चौगुले ,भक्ती जाधव (संगमेश्वर जूनियर कॉलेज सोलापूर).



## कर्मयोगी इन्स्टिट्यूटची बॅडमिंटन, बुद्धीबळ, पावरलिप्टींग व ज्युदो स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरे अंतर्गत आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन, बुद्धीबळ व ज्युडो या क्रीडाप्रकारात येथील श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय काम गिरी केली. त्यातील करण माने याची भोपाळ येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये निवड झाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी व ऑर्चिड कॉलेज सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. त्यांना शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा.गणेश बागल यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक, प्राचार्य डॉ.एस.पी.पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए. बी.कणसे, रजिस्ट्रार जी.डी.वाळके, उपप्राचार्य प्रा.जे. एल.मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉ.अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा.राहुल पांचाळ, विभागप्रमुख डॉ.सोमनाथ लंबे, डॉ.अनिल बाबर, डॉ.एस.व्ही. एकलारकर, प्रा.दीपक भोसले यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी : ज्युदो :** करण माने (सुवर्ण) सोहम पवार (कांस्य). **पॉवरलिफ्टिंग :** स्वप्नील देशमाने (चतुर्थ). **विभागीय बुद्धिबळ :** अच्युत भाले, विशाल गुंड, वासुदेव कवडे, प्रतीक सुतार, अभिजीत शिंदे. **विभागीय बॅडमिंटन :** (गौरव दळवे, प्रेम शिंदे, ओंकार जाधव, रामरतन जाधव, वेदान्त देशमुख, उपविजेतेपद).

# महाराष्ट्र-हिमाचल प्रदेश सामना १ डिसेंबरपासून सोलापुरात

## १९ वर्षाखालील कूच बिहार क्रिकेट : साहिल पारिख महाराष्ट्र तर आदित्य कटारिया हिमाचलचे नेतृत्व करणार

### सोलापूरचा समर्थ दोरनाल महाराष्ट्र संघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

येथील इंदिरा गांधी (पार्क) स्टेडियमवर येत्या १ डिसेंबरपासून १९ वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील तिसऱ्या फेरीतील महाराष्ट्र विरुद्ध हिमाचल प्रदेश सामना रंगणार असून २८ नोव्हेंबर रोजी दोन्ही संघ सोलापुरात दाखल होणार असून २९-३० नोव्हेंबर रोजी सकाळ दुपार सत्रात सराव करणार आहे. महाराष्ट्र संघाचे नेतृत्व साहिल पारिख तर हिमाचल प्रदेशचे नेतृत्व आदित्य कटारिया करणार आहे. महाराष्ट्र संघात सोलापूरच्या समर्थ दोरनालाचा समावेश आहे. हे स्टेडियम नुकेतच सोलापूर मनपाकडून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडे हस्तांतरित केल्यानंतरचा हा पहिलाच सामना असल्याने सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे वतीने जय्यत तयारी करण्यात आली असून मुख्य खेळपट्टी उत्तम रित्या बनवली गेली आहे तसेच संपूर्ण मैदान हिरवेगार झाले आहे. जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने विविध समिती स्थापन करण्यात आल्या असून त्यात खेळाडू, क्रीडा संघटक, पदाधिकारी कार्यरत आहेत व जे ते आपल्या समितीचे काम उत्तमरित्या हाताळत आहेत.

दोन्ही संघ यापूर्वी प्रत्येकी २ सामने खेळले असून महाराष्ट्राने पहिल्या सामन्यात दणदणीत विजय मिळविल्यानंतर दुसरा सामना अनिर्णित झाला होता तर हिमाचल प्रदेश संघ पहिल्या सामन्यात पराभूत तर दुसरा सामना अनिर्णित झाला होता. क गटातील हे दोन्ही संघ सध्या अनुक्रमे दुसऱ्या आणि पाचव्या स्थानी असून महाराष्ट्राचे १० तर हिमाचल १ गुण आहेत.

मागील वर्षी याच मैदानावर महाराष्ट्र आणि केरळ मध्ये सामना झालेला व तो महाराष्ट्र संघाने जिंकला होता आणि सध्याचा महाराष्ट्र संघ पाहता महाराष्ट्राचे पारडे जड असल्याचे दिसते. या सामन्यासाठी फिरोज घयास हे सामनाधिकारी तर पंच म्हणून इंद्रनील व अमन राज हे काम पाहणार आहेत.


साहिल पारिख


आदित्य कटारिया


समर्थ दोरनाल

### प्रेक्षकांना सामना विनामूल्या पाहता येणार

एक डिसेंबर ते चार डिसेंबर दरम्यान होणारा हा क्रिकेट सामना सकाळी ९.३० ते सायंकाळी ५:०० पर्यंत चालणार आहे या सामन्यास तिकीट नसून विनामूल्य दाखवण्यात येणार आहे. प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी केले आहे.

### दोन्ही संघ याप्रमाणे

**महाराष्ट्र -** साहिल पारख, साई परदेशी, समकित सुराणा, सुश्रुत सावंत, जशान सिंग, ईशान खोंड, सौशिक जगताप, अर्कांम सय्यद, अभिनंदन अडक, हर्षिल सावंत, रोनक अंदानी, यतीराज पाटोळे, इंद्रजीत शिंदे, समर्थ दोरणाल प्रथमेश झंवर.

**हिमाचल प्रदेश :** आदित्य कटारिया (कर्णधार), अर्पित सिंग, वास्तव गर्ग, आरमान वीज, अक्षय वशिष्ठ, अंशुल शर्मा (यष्टिरक्षक), नौनिहाल, आर्यन ठाकूर, सिद्धक धिल्लोन, लक्ष ठाकूर, शिवांश कलथा, कार्तिकय शर्मा, अक्षय शर्मा पारस बडोगा, सचिन मेहता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पिलीव येथील तरुणाची राहत्या घरातच गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि.२७ नोव्हेंबर-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव ( जरगवस्ती) पोपट राजाराम जाधव वय ३३ वर्ष याने दारूच्या नशेत आपल्या राहत्या घरातील पञ्याच्या लोखंडी गलला दोरीच्या साहहयाने गळफास घेऊन बुधवारी रात्री आत्महत्या केली. मात्र घरात कोणीच नसल्यामुळे ह्या घटनेचा उलगडा गुरूवारी सकाळी झाला.यानंतर मयत पोपट याचे भाऊ सागर पोपट जाधव वय ३१ याने सदरच्या घटनेची माहीती पिलीव पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलीस हवालदार धनाजी झगडे व स्वरूप शिंदे व पोलीस नाईक अमीत जाधव यांनी सदरच्या घटनेचा घटनास्थळी जाऊन रितसर पंचनामा केला.व सदरचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी माळशिरस येथे पाठविण्यात आला शवविच्छेदन करून तो नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.या घटनेची खबर सागर पोपट जाधव यांनी दिली असुन त्यानुसार मयत नं ४२/२०२५ बीएसएनएस नुसार १९४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन या घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार धनाजी झगडे हे करीत आहेत.

याबाबत या घटनेबाबत पिलीव परीसरात दिवसभर अशी चर्चा सुरू होती की मयत पोपट ह्याची पत्नी पाच सहा दिवसांपुर्वी कोणालाही काहीच न सांगता निघुन गेली होती .तिचा सर्व नातेवाईकाडे शोध घेऊनही तपास लागला नाही .मयताला चार वर्षांची एक मुलगी तर अवघ्या सहा महिन्याचा मुलगा आहे.या मुलांचा आता पत्नी निघुन गेल्यामुळे सांभाळ कोण करणार याच्या टेन्शन मध्येच त्याने हे शेवटचे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे बोलले जात आहे.आता त्या दोन निरागस बालकांचा सांभाळ कोण करणार आता वडील ह्यात नाहीत आणी काळीज नसणारी निडर आई आपल्या चिमुकलयांना सोडुन निघुन गेली .मयत पोपट याचे आई वडील पण हयात नाहीत मग या मुलांचा सांभाळ आता कोण करणार अशी चर्चा पिलीव परीसरात सुरू आहे.

# दुधनीच्या विकासासाठी भाजपा महायुतीची सत्ता आवश्यक

**पालकमंत्री जयकुमारे गोरे : नगरपरिषद निवडणुकीसाठी जाहीर प्रचारसभा**




**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ नोव्हेंबर-**

दुधनी शहराच्या विकासासाठी आगामी नगरपरिषदेवर भाजपा-महायुतीची सत्ता आणण्याचे आवाहन ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

दुधनी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्षपदाचे अधिकृत उमेदवार अतुल मेळकुंदे यांच्यासह सर्व नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पालकमंत्री गोरे यांची दुधनी येथे जाहीर सभा झाली. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, भाजपा सरकारकडून दुधनीच्या विकासाला लागणारा निधी आणि आवश्यक योजनांना प्राधान्य दिले जाईल. दुधनीच्या शाश्वत विकासासाठी सक्षम नेतृत्व, पारदर्शक कामकाज आणि ठोस निर्णयक्षमतेची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दुधनीच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा उमेदवारच सक्षम नेतृत्व देऊ शकतील असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास शहाजी पवार, अप्पू परमशेट्टी, महेश बिराजदार, महेश पाटील, शंकर भांजी, बसवराज हौदे, बाबा टक्कळकी, सिद्धाराम बाके, मल्लिकार्जुन झळकी, महादेव पाटील, जगन्नाथ जाधव, प्रदीप पाटील, अप्पू बिराजदार, बसवराज परामशेट्टी, सैदप्पा परामशेट्टी यांच्यासह उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आचेगांव येथे संविधान रॅलीसह तथागत बुद्धविहारात प्रतिमापूजन

**आचेगांव,दि.२७ नोव्हेंबर-**

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथे संविधान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय येथे संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भाजप अनु, जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे यांच्या हस्ते तर तथागत बुद्धविहार येथील पूजन ग्रामपंचायत अधिकारी रुक्मिणी कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी श्री शावरसिद्ध हायस्कूल च्या वतीने संविधान रॅली काढण्यात आली. तसेच संविधान प्रस्ताविक प्रतिज्ञा घेण्यात आले. या प्रसंगी सरपंच विश्रांती पाटील, उपसरपंच रफिक मुल्ला, मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार, ग्रामपंचायत सदस्या श्रीमती मंगल ताई गोतसुर्वे, ग्रामपंचायत सदस्य नागप्पा कांबळे, तंटामुक्त अध्यक्ष पंडित गोतसुर्वे, प्रदीप पाटील, जयंती उत्सव अध्यक्ष राम गोतसुर्वे, विकास सुर्वे,भगवान गोतसुर्वे,काशिनाथ क्षीरसागर,जालिंदर गोतसुर्वे, बलराम सुर्वे,भारत गोतसुर्वे, मनोज गोतसुर्वे,इरफान पटेल, रवि विधाते, उत्तरेश्वर सुर्वे, शावरसिद्ध माळी, खाजेंद्र भणजे, तसेच श्री शावरसिद्ध प्रशालेचे मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार सर, सर्व शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनी गावकरी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# 'यळकोट यळकोट'च्या गजरात बोरगाव येथे खंडोबा उत्सव

**पालखीसह नंदीध्वज मिरवणूकीने जल्लोष**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ नोव्हेंबर**

सदानंदाचा येळकोट.! च्या निनादाने व भंडाऱ्याच्या उधळण करीत बोरगाव (दे) ग्राम दुमदुमून गेले. श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी पंचक्रोशीतीली भक्तांनी मोठ्या गर्दी केली होती. तालुक्यातील बोरगाव (दे) येथील श्री खंडोबा मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चंपाषष्ठी उत्सव मोठ्या भक्तीभावाने जल्लोषात साजरा करण्यात आला.

चंपाषष्ठी मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी तिथीला साजरा केला जाणारा एक सण असून, या दिवशी भगवान शंकराचा अवतार असलेल्या खंडोबाने मणी-मल्ल या राक्षसांचा वध करून विजय मिळवला होता. या दिवशी खंडोबाचे नवरात्र संपते आणि तळी भरण्याचा विधी केला जातो. या दिवशी खंडोबाने लोकांना राक्षसांच्या अत्याचारातून मुक्त केले होते, म्हणून त्याचे स्मरण म्हणून हा सण साजरा करतात. दरम्यान चंपाषष्ठीच्या आदल्या दिवशी जागरण गोंधळ, पहाटे देवाचा लंगर तोडण्याचा कार्यक्रमानंतर महापुजा, आरती व संपूर्ण गावातून श्री खंडोबा देवाची पालखी व नंदीध्वज मिरवणूक काढण्यात आली. महानैवद्या नंतर सदर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. चंपाषष्ठीच्या दिवशी खंडोबाच्या नवरात्राची सांगता होते. हे नवरात्र मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होऊन षष्ठीपर्यंत चालते. यासह चंपाषष्ठीच्या दिवशी मुख्य विधींपैकी एक म्हणजे तळी भरणे. यात खंडोबाच्या मूर्तीभोवती तळी भरली जाते आणि आरती केली जाते. श्री खंडोबा देवाचे पूजन मंदिराचे पुजारी शशिकांत फुलारी यांनी केले. उत्सव साजरा करण्यासाठी हंसराज कामशेट्टी, भीमशंकर जिरगे, लिंबण्णा जिरगे, आनंदराव भोसले, शरणप्पा जिरगे, खंडाप्पा जिरगे, महादेव माने, अर्जुन धरगुंडे, खुशाबा बंदिछोडे, राम कामशेट्टी, चंद्राम जिरगे, राजेंद्र जुबरे, ज्ञानेश्वर माने, नितीन जिरगे, शरद भोसले, सचिन जिरगे, पिराप्पा कामशेट्टी, महादेव जिरगे, खंडाप्पा कामशेट्टी, योगेश फुलारी, राजू माने, तानाजी निंबाळकर, दयानंद पाटील, बाबाराव जिरगे, परमेश्वर देडे व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



श्री क्षेत्र अक्कलकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक येथील श्री स्वामी समर्थ महाराज आलेले प्रथम स्थळ श्री खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. श्री खंडोबा देवाचे विधीवत पूजन, महाआरती, महानैवद्य, महाप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रम मंदिराचे मुख्य पुरोहित गुरव बंधूच्या हस्ते संपन्न झाले. मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेलेला होता.



# केम येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना ब्लँकेट व खाऊ वाटप

**राजाभाऊ देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२७ नोव्हेंबर-**

श्री संत दामाजी अपंग सेवा मंडळ मंगळवेढा संचलित श्री नागनाथ मतिमंद निवासी विद्यालय केम तालुका करमाळा या शाळेमध्ये ब्लँकेट व खाऊ वाटप करण्यात आले.

केम येथील राजाभाऊ देवकर यांच्या ३२ व्या वाढदिवसानिमित्त शाळेतील दिव्यांग मुलांना ब्लँकेट व खाऊ वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा खर्च इतरत्र न करता व सामाजिक बांधिलकी जपत या दिव्यांग मुलांना आनंदित करण्यासाठी ब्लँकेट व खाऊ वाटप केले. अध्यक्षस्थानी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मनोज राऊत होते. केम येथील महेश तळेकर, संस्थापक अध्यक्ष संदीप तळेकर, प्रहार संघटना करमाळा तालुकाध्यक्ष सागर राचे, दौंड कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सागर तळेकर, शिवसेना जिल्हा समन्वय बापूराव तळेकर, सचिन तळेकर, योगेश ओहोळ,संजय राऊत,धनंजय ताकमोगे,सुलतान मुलानी, संजय अवघडे, आप्पा पळसकर, रवींद्र मोरे व इतर मित्र परिवार उपस्थित होते.

मुख्याध्यापक नाळे सर यांनी स्वागत व सत्कार केला. रविंद्र पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक श्री.नाळे यांनी आभार मानले.

## महत्वाचे...

# चिंचोलीकाटीत आजपासून अखंड हरिनाम सप्ताह; ज्ञानेश्वरी पारायण

**मोहोळ,दि.२७ नोव्हेंबर-**

मोहोळ तालुक्यातील चिंचोळी काटी येथे शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर ते गुरुवार दि. ४ डिसेंबर २०२५ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह आणि श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती सप्ताह समितीचे सदस्य बापू कोळी यांनी दिली. सप्ताहाचे हे २६ वे वर्ष आहे. यावेळी हभप रोहिदास महाराज घुगे, हभप वैभवी महाराज कदम, हभप विश्वनाथ महाराज मोरे, हभप आनंद महाराज गोसावी, हभप किरण महाराज बोधले, तर गुलालाचे कीर्तन हभप समाधान महाराज शिंगण अंत्रोळीकर, हभप श्रीगुरु शाहू महाराज भारती आंदोरा यांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. दरम्यान सप्ताह काळात पहाटे ४ ते ६ काकड आरती, दुपारी ४ ते सायंकाळी ६ संत तुकाराम महाराज चरित्र कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन, रात्री ९ वाजता महाप्रसाद व नंतर १० वाजता हरिजागर होणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.



# अकलूज नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजयुमोचा झंझावती प्रचारदौरा

**अकलूज, दि.२७ नोव्हेंबर-**

अकलूज नगरपरिषदेसाठी येत्या २ तारखेला मतदान होणार आहे. या निवडणुकीत सोलापूर शहर भारतीय जनता युवा मोर्चा पूर्ण ताकदीने मैदानात उतरला आहे. प्रभाग क्रमांक २, ४ आणि ५ मध्ये शहर भाजयुमो पदाधिकाऱ्यांनी घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधला. भारतीय जनता पार्टीचे ध्येय, आणि केलेली विकासकामे जनतेसमोर स्पष्टपणे मांडण्यात आली. भयमुक्त अकलूज - भ्रष्टाचारमुक्त अकलूज हा संदेश मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचवण्यात आला. अकलूजमधील व्यापारी, डॉक्टर, इंजिनिअर आणि महिला वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवकांच्या उत्साही प्रचारामुळे प्रभागांमध्ये सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. अकलूजच्या विकासासाठी सक्षम, जबाबदार आणि जनतेशी जोडलेले नेतृत्व निवडले जाईल, आणी भारतीय जनता पार्टीचा पहिला नगराध्यक्ष जनतेतून निवडून येईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी यतीराज होनमाने, विश्वनाथ प्याटी, योगेश कबाडे, गणेश पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्राध्यापक विलास पात्रुडकर यांचे निधन

**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर -**



येथील प्राध्यापक विलास जनार्दन पात्रुडकर यांचे बुधवार दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रूपाभवानी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई येथून एम. ए. पदवी प्राप्त होणारे ते त्या काळातले प्रथम सोलापूरकर होते. लक्ष्मी विष्णू व एन. जी. मिल येथे त्यांनी मनुष्यबळ अधिकारी म्हणून अनेक वर्ष कार्य केले. तदनंतर वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथे प्राध्यापक म्हणून रुजू झाले १९८९ साली भारतीय विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे प्राचार्य पदी रुजू होऊन २०१० सालापर्यंत उत्तम कामगिरी बजावली. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्यघटना सर्व जगात श्रेष्ठ

**डॉ. यशवंत कुलकर्णी : कर्मयोगी कारखान्यात संविधान दिन कार्यक्रम**



**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २७ नोव्हेंबर-**

भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताची लिहिलेली राज्य घटना ही सर्व जगात श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले .

२६ नोव्हेंबर संविधान दिनाचे औचित्य साधून कारखाना कार्य स्थळावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस डॉ. कुलकर्णी यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. संविधान निर्माण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सखोल अभ्यास करून भारताची राज्यघटना लिहीली. यामध्ये सर्वात महत्वाची बाब म्हणजे सर्व नागरिकांना मुलभूत हक्क प्रदान करताना समानता, स्वातंत्र्य, शोषणाविरुद्ध, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक व शैक्षणीक तसेच संवैधानिक उपचारांचा अधिकार यावर भर दिल्याचे डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले.

या वेळी पत्रकार दत्तात्रय नाईकनवरे, माजी जि. प. सदस्य सुहास गाडे यांनीही आपल्या मनोगता मध्ये घटनेने जसे मुलभूत अधिकार आपणांस दिले तसेच काही कर्तव्यही सांगितली आहेत याचे आपण पालन करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

याप्रसंगी प्रोडक्शन मॅनेंजर एम. आर. कुलकर्णी, मुख्य लेखापाल रविंद्र काकडे, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, डिस्टरली मॅनेंजर एस. आर. पाटील, परचेस ऑफीसर महेश देशपांडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे, सेक्रेटरी भिमराव बाबर, कम्प्यूटर इंचार्ज तानाजी भोसले, मुख्य अभियंते सचिन विभूते, सिव्हील इंजिनिअर हणमंत नागणे, इंन्ट्रमेन्ट मॅनेंजर समिर सय्यद टाईम किपर सोपन कदम , रसायन तज्ञ मारती उपासे , सुरक्षा अधिकारी सदगर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुधीर पोफळे यांनी तर आभार सोमनाथ भालेकर यांनी मानले .



# पंढरपुरात शहिद दिनानिमित्त 333 जणांनी केले रक्तदान

**पोलीस संकुल येथे संविधान दिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ नोव्हेंबर -**

मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा मुकाबला करताना शहीद झालेल्या मुंबई पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी तसेच सुरक्षा दलातील वीरांच्या व नागरिकांच्या सन्मानार्थ तसेच पंढरपूरचे वीर सुपुत्र शहीद मेजर कुणालगिरी गोसावी यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या रक्तदान शिबिरात ३३३ जणांनी रक्तदान केल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

रुक्मिणी सभागृह, पोलीस संकुल येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन देखील करण्यात आले. मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यातील शहीदांना आदरांजली वाहण्यात आली. उपविभागातील पोलीस प्रशासन व पंढरपूर ब्लड बैंक व बजाज ब्लड बैंक पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यामाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पोलिस निरिक्षक विश्वजीत घोडके, टि. वाय. मुजावर, रेखा घनवट, सहा.पो.नि सांगर कुंजिर, पोसई हमीद शेख तसेच पंढरपूर ब्लड बँकेचे डॉ. प्रसाद खाडिलकर, बजाज ब्लड बँकेचे डॉ. मंदार सोनवणे उपस्थित होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डगळे जवानांच्या असामान्य धैर्य, शौर्य, पराक्रमाबाबत माहिती दिली. रक्तदानाचे महत्व विशद करुन यावर्षी रक्तदान शिबीराचे हे ०९ वे वर्षे असून आतापर्यंत सुमारे ४००० रक्त बॅगा संकलन करून यापुढेही या सामाजिक कार्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी सहभाग नोंदवून रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.

उपविभागीय अधिकारी इथापे यांनी वैद्यकीय क्षेत्रात रूग्णांना होणारा रक्ताचा अपुरा पुरवठा व त्याकरीता पोलीस दलातर्फे आयोजित केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

# मंगळवेढ्यात १९ जागांसाठी ५७ जणांना चिन्हांचे वाटप

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.२७ नोव्हेंबर-**





मंगळवेढा नगरपरिषद निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप बुधवारी करण्यात आले. १९ जागेसाठी ५७ जणांना हे वाटप केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी दिली.

निवडणूकीतील उमेदवार व त्यांची चिन्हे पुढीलप्रमाणे -प्रभाग १ अ-आशा महादेव मेटकरी (किटली), प्रतिक्षा सिध्देश्वर मेटकरी-(कमळ),अंजूम इरफान सय्यद -(ॲटोरिक्षा). प्रभाग १ ब - अनिता विनायक नागणे (ॲटो रिक्षा), संतोष रामदास नागणे (तुतारी वाजवणारा माणूस), येताळा नारायण भगत (कमळ). प्रभाग २ अ -नागर लहू गोवे (ॲटो रिक्षा), शारदा बबन जावळे (मशाल), अश्विनी अनिल मुरडे (कमळ), प्रभाग २ ब- प्रमोद दत्तात्रय सावंजी (ॲटो रिक्षा), समाधान दत्तात्रय हेंबाडे (कमळ). प्रभाग ३ अ-विद्यागौरी सिध्देश्वर अवघडे (ॲटो रिक्षा), सिमा नाथा ऐवळे (विजेरी टॉर्च), अरूणा विजय खवतोडे-(कमळ), अश्विनी सागर खाडे (किटली), तेजस्वीनी आनंद खांडेकर (कपबशी), प्रभाग ४ अ -विजया अरूण गुंगे (कमळ), स्नेहल राहुल घुले (ॲटो रिक्षा). प्रभाग ४ ब-चंद्रकांत राजाराम घुले (कमळ), राहुल रामचंद्र वाकडे (ॲटो रिक्षा). प्रभाग ५ अ-अनिल एकनाथ बोदाडे (ॲटो रिक्षा), मोहमद मुस्तफा अहमद मुलाणी (कमळ), ध्रुवकुमार राचय्या हिरेमठ (हिरा), प्रभाग ५ ब संध्या सतीश कोंडुभैरी (कमळ), रंजना रामचंद्र पवार (तुतारी वाजवणारा माणूस), प्रिती तेजस सुर्यवंशी-(ॲटो रिक्षा). प्रभाग ६ अ - कमल वसंत मुदगूल (ॲटो रिक्षा), मनिषा नितीन मेटकरी (कमळ). प्रभाग ६ ब-संजय तुकाराम नलवडे (ॲटो रिक्षा), गौरीशंकर शरणाप्पा बुरकूल (कमळ). प्रभाग ७ अ -अश्विनी गणेश धोत्रे (ॲटो रिक्षा), शशिकला अर्जुन मुदगूल (कमळ). प्रभाग ७ ब निवृत्ती महादेव कदम (शिट्टी), महादेव सिद्राम जाधव (कमळ), सोमनाथ महादेव माळी (ॲटो रिक्षा). प्रभाग ८ अ - महादेव लक्ष्मण धोत्रे (शिट्टी), सुर्यकांत शंकर पवार (झाडू), सोमनाथ महादेव हुशारे (कमळ). प्रभाग ८ ब राजामती तायाप्पा कोंडुभैरी (नारळ), सावित्रीबाई मच्छिंद्र कोंडुभैरी (कमळ), शरयू दत्तात्रय हजारे (कपबशी). प्रभाग ९ अ रुबीनाबी जमीर इनामदार (तुतारी वाजवणारा माणूस), तरन्नूम आझाद दारूवाले-(घडयाळ), नंदा ज्ञानेश्वर नाईकवाडी -(मशाल), माधुरी अनिल पवार (विजेरी टॉर्च), अनिता तानाजी भोसले-(हेलिकॉप्टर), गोसीया अझरुद्दीन मुजावर- (ॲटो रिक्षा),शोभा मनोहर हजारे -शिट्टी. प्रभाग ९ ब -मुझम्मील दादाहजरत काझी (कपबशी), प्रशांत बाबुराव गायकवाड (ॲटो रिक्षा), पांडुरंग शिवाजी नाईकवाडी (घडयाळ), प्रशांत सुभाष यादव (तुतारी वाजवणारा माणूस). प्रभाग १० अ - प्रविण विजय खवतोडे (घडयाळ), विक्रम शामराव शेंबडे (ॲटो रिक्षा). प्रभाग १० ब- गुलनाज हजरतपाशा काझी (घडयाळ), साहेरा मुझफ्फर काझी (तुतारी वाजवणारा माणूस), सीमा सोमनाथ बुरजे (ॲटो रिक्षा) प्रभाग क्र.३ ब मधून एकच अर्ज राहिल्याने सोमनाथ विष्णूपंत आवताडे हे अविरोध निवडून आले आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# खा.शरद पवारांबद्दल आजही मोठी क्रेझ

## वसंतनाना देशमुख यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२७ नोव्हेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा खा.शरद पवार यांच्याबद्दल तरुणांमध्ये आजही मोठी क्रेझ आहे. मध्ययंतरीच्या काळात आमच्या पक्षाची घडी जरासी विस्कटलेली होती. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या माध्यमातून आम्ही पुन्हा एकदा नव्याने पक्षबांधणी करीत आहोत, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांनी सांगितले.



खा.शरद पवार यांनी बळ दिलेला पदाधिकारी किंवा कार्यकर्ता हा नेहमीच राजकीय पटलावर उच्चपदावरच पोहचतो. कारण पवारांच्या नजरेतून त्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची जडणघडण झालेली असते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकांमध्ये जेथे जेथे शक्य असेल तेथे तेथे पक्षातर्फे जेथे शक्य असेल तेथे इतरांशी आघाड्या करुन आम्ही निवडणूकांना सामोरे जात आहोत, असेही ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून कधीही जातीपातीचे राजकारण करण्यात आलेले नाही. केवळ विकास हाच अजेंडा घेऊन सर्व पक्षाची वाटचाल सुरु असते. पंढरपूर, बार्शी, कुर्डुवाडी, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट, दुधनी, करमाळा, मोहोळ, मैंदर्गी आदी ठिकाणी आम्ही उमेदवार उभे केलेले आहेत. या निवडणूकीमध्ये विकासाच्या मुद्यांबरोबरच ज्या त्या भागातील स्थानिक मुद्यांना प्राधान्य देवून जातीपातीचे राजकारण न करता सर्वांना बरोबर घेऊन निवडणूकांना आम्ही सामोरे जात आहोत. जिल्ह्याच्या नव्हे तर संपुर्ण देशाच्या, राज्याच्या राजकारणात शरद पवार नावाची जादू अजूनही तसूभर देखील कमी झालेली नाही, हे प्रकर्षाने निदर्शनास येते आहे. सत्ताधारी मंडळींकडून जरी वाढता दबाव असला तरी तो सर्व झुगारुन आमच्या पक्षात काम करण्यासाठी जुन्या जाणत्या नेत्यांबरोबरच इच्छुकांची विशेषतः तरुणवर्गाची, महिलांची संख्या जास्तीची असल्याचे पहावयास मिळते, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# जिल्ह्यातील भाजपाचे सर्वच उमेदवार उधळणार गुलाल

- जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचा विश्वास
- होम टु होम प्रचाराच्या दोन राऊंड केल्या पूर्ण

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ट्रेलर म्हणून अनगरच्या नगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीने बिनविरोध विजय मिळविला आहे. जिल्हाभरात भाजपाला चांगले वातावरण आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ११ नगरपालिकांमधील भाजपाचे सर्वच उमेदवार गुलाल उधळणार असल्याचा विश्वास भाजपाचे पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केला.

या निवडणुकीच्या निमित्ताने होम टु होम प्रचाराच्या दोन राऊंड पूर्ण करण्यात आल्या आहेत असे सांगून ते पुढे म्हणाले, पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी मेगा भरती करणे गरजेचे आहे. आपल्या राज्याचे स्टार प्रचारक तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात नवीन प्रवेश दिले जात आहेत. जिल्ह्याचे प्रवेशही चालू आहेत; यामुळे पक्षही मोठा होत आहे. आम्ही जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून आणि योग्य त्या समन्वयातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत योग्य अशा कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आहोत; त्यांच्या राजकारणातील आजतागायत केलेल्या कामाची चाचपणी करुनच उमेदवारी फायनल केली आहे. या सर्वच उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी आमची आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. प्रचारासाठी आता अवघे ४ दिवस बाकी असल्याने यासाठी रात्रीचा दिवस आम्ही करीत आहोत. सध्या आमच्यापुढे सर्वच नगरपालिका ताब्यात घेण्याचे ध्येय आहे. त्या ध्येयापर्यंत आम्ही जनतेच्या माध्यमातून जाणार आहोत.



सध्या रोज एका नगरपालिका कार्यक्षेत्रात मी स्वतः जावून प्रचार यंत्रणा राबवित आहे. त्या ठिकाणच्या स्थानिक उमेदवाराचा प्रचारही करीत असल्याचेही ते म्हणाले.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, मंत्री आशिष शेलार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ.गोपीचंद पडळकर यांच्यासह अन्य स्टार प्रचारकांच्या जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले आहे. या सभांच्या यशस्वीतेसाठी आणि मतदारांच्या घरोघरी जावून भाजपाला मतदान करण्याविषयी पदाधिकारी, कार्यकर्ते परिश्रम घेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

बार्शी नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी १२० जण रिंगणात उतरले आहेत. पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी १३३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. अक्कलकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी ७६ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. अकलूज नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ९१ जण निवडणूक लढवित आहेत. सांगोला नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार व करमाळा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ७१ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. कुर्डुवाडी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवकपदासाठी १०३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मंगळवेढा नगराध्यक्षपदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ५८ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

मोहोळ नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी ७९ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. दुधनी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ५३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मैंदर्गी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी २ तर नगरसेवक पदासाठी ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

### माझ्यावर पाच नगरपालिकांची जबाबदारी

या निवडणुकीत जिल्ह्यातील १२ नगरपालिकांपैकी माझ्यावर बार्शी, कुर्डुवाडी, करमाळा, अकलूज आणि सांगोला या पाच नगरपालिकांची जबाबदारी आहे. पक्षाच्या कमळ चिन्हावरच आमचे उमेदवार लढत असून, सर्वच ५ ठिकाणी भाजपाचाच नगराध्यक्ष मोठ्या मताधिक्याने निवडूण आणणार आहे. सांगोला, करमाळा, कुर्डुवाडी याठिकाणी स्वतंत्र तर बार्शी व अकलूज येथे मित्रपक्षांसमवेत आम्ही निवडणूक लढवित आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेसला सोलापूर जिल्ह्यात येणार पुनर्वैभव

- सातलिंग शटगार यांचे प्रतिपादन
- पाच नगरपालिकांवर काँग्रेसचा झेंडा फडकणार



**तभा वृत्तसेवा। अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील मतदारांकडून काँग्रेस पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून काँग्रेसला पुनर्वैभव येणार आहे. जिल्ह्यातील पाच नगरपंचायतींवर काँग्रेसचा झेंडा फडकणार आहे, असा विश्वास काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी व्यक्त केला.

माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, खासदार प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत काँग्रेसकडून पूर्ण तयारीने प्रचारयंत्रणा राबविण्यात येत आहे. तेलंगणाचे मंत्री अझरूद्दीन यांना प्रचारासाठी आणण्याचे नियोजन सुरू आहे. जाहीर सभेतून केंद्र व राज्य सरकारच्या अपयशाची प्रचिती करून देण्यात येत आहे.

केंद्र व राज्य सरकारमुळे शेतकरी व महिलांवर अन्याय होत आहे. लोकशाही धोक्यात आली आहे. अनेक नेत्यांनी काँग्रेसचा वापर करून मोठ्या पदापर्यंत पोहोचले आहेत. कार्यकर्त्यांच्या बळावर अनेक पदे भूषविली आहेत. मात्र आता ते पक्ष सोडून स्वार्थासाठी अन्य पक्षात जात आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# काव्यमित्र संस्थेचा पुरस्कार सुजाता जुगदार यांना जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

काव्य मित्र संस्था, पुणेच्यावतीने देण्यात येणारा यंदांचा राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार येथील छत्रपती शिवाजी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांना जाहीर झाला आहे.



जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार देण्यात येत असून या पुरस्काराचे यंदाचे हे २५ वे वर्ष आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या रविवारी, ३० नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता पुण्यातील पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथील तारांगण ऑडिटोरिअम येथे या पुरस्काराचे वितरण मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील राजे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज तथा स्वराज्याचे सरसेनापती धनाजी जाधवराव यांचे थेट दहावे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधवराव यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखिका व कवयित्री सविता जंगम (ओतूर) या राहणार असून याप्रसंगी भोसरी येथीक उद्योजक डॉ. अशोक साळुंखे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. मुख्याध्यापिका जुगदार यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अरुण मित्रगोत्री, सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले आदींनी अभिनंदन केले आहे.


# महापालिका निवडणूक प्रारूप मतदार यादीवर गुरुवारी ३६ हरकती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर म हापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण ३६ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.







दरम्यान, २६ नोव्हेंबर रोजी ४५ हरकती प्राप्त झाल्या होत्या. तर गुरुवार दि. २७ नोव्हेंबर रोजी एकूण ३६ अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागातून वगळण्यात यावीत आणि संबंधित प्रभागात समाविष्ट करण्याबाबतचे २८ अर्ज तर इतर ७ अर्ज दाखल झाले आहेत. आज एकाच दिवशी एकूण ३६ हरकती व सूचनांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. २० ते २७ नोव्हेंबर दरम्यान एकूण २१५ हरकती व सूचना आल्या आहेत.

प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते ३ डिसेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय. सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील.

दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करणे या संदर्भात सूचना करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.





| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | धनश्री घटोळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २ | शितल बिराजदार | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ३ | प्रेमावती अण्णगुडुगी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ४ | राखी भिसे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ५ | अर्पिता स्वामी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६ | रागिणी पुजारी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७ | श्रावणी सपळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८ | अर्जुन बिराजदार | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ९ | मल्लिनाथ व्हनमाने | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १० | अमिता डावरे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ११ | अल्फिया बाणेवाले | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १२ | प्रणिती माळी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १३ | संस्कृती थोरात | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १४ | भक्ती वाडकर | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १५ | हरिप्रिया जामगावकर | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १६ | विद्या कुर्ले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १७ | वैष्णवी सोनटक्के | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १८ | नंदिनी जाधव | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| १९ | कुणाल कळसकर | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २० | श्रवण शिंदे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २१ | प्रेम माढेकर | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २२ | निधीश कोकरे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २३ | संस्कृती कसबे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २४ | हर्षवर्धन दीक्षित | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २५ | निलेश गवळी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २६ | सौदर्या मठपती | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २७ | वीर मठपती | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २८ | सायली पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २९ | अस्मिता बिराजदार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३० | सलोनी सुरवसे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३१ | क्रांती यादव | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३२ | वेदिका सिपुते | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३३ | समृद्धी नीळ | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३४ | जानवी गडगडे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३५ | आरोही सुतार | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३६ | शांतनु वाले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३७ | साई भोसले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३८ | सानवी पेरला | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३९ | मोहम्मद कुचबल | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४० | अवधूत गोसावी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४१ | आदित्य सुरवसे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४२ | आर्यन सुरवसे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४३ | सई झिमल | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४४ | वैष्णवी जाधव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४५ | नेहा शिंदे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४६ | दिपा हिरेमठ | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४७ | साक्षी वाणी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४८ | नम्रता खांडेकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४९ | तेजस फुलारी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५० | प्राविण्या शिंदे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५१ | संध्या राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५२ | अक्षमा रुपनुरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५३ | रूद्र राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५४ | अक्षता गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५५ | दिशा माने | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५६ | सांची गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५७ | अनुष्का जाधव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५८ | प्राजक्ता गायगवळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५९ | श्रावणी कांबळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६० | सुप्रिया कुडगी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६१ | अमित मोरे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६२ | आदर्श इंगळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६३ | वैभव पवार | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६४ | प्रथमेश राजगे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६५ | योगीराज हिरेमठ | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६६ | गणेश पाटील | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६७ | प्रणव कोळी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६८ | शुभ्रा बिराजदार | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६९ | नागेश भडकुंबे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ७० | वैष्णवी माळगे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ७१ | गौरी रेऊरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७२ | प्रार्थना देशपांडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७३ | दृष्टी कट्टीमनी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७४ | महानंदा गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७५ | पौर्णिमा पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७६ | आराध्या वाणी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७७ | श्रद्धा नागुरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७८ | सपना पाणी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७९ | स्नेहा पाटील | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८० | दिव्या कोरेकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८१ | आरव शिंदे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८२ | सृष्टी हावळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८३ | अनन्या देशमाने | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८४ | रघु खोडके | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८५ | स्वरा रणदिवे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८६ | अनैशा मंठाळकर | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८७ | शशांक टेंगळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८८ | रुद्र गुदगे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८९ | रिद्धीमा जमादार | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ९० | पृथ्वीराज नवगिरे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ९१ | पृथ्वीराज गौवडनुर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९२ | युवराज अमाने | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९३ | शिवतेज जगताप | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९४ | श्रीवरद कारंजकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९५ | शिवराज करपे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९६ | स्वराज्य यादव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९७ | जोया नदाफ | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९८ | कृष्ण पुकाळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९९ | समृद्धी हंचाटे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १०० | रितेश कोनदे | भारती विद्यापीठ, सोलापूर |

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ऊस वाहतूक वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ नोव्हेंबर :** विलास सहकारी साखर कारखाना लिमिटेड, वैशालीनगर, निवळी, ता. जि. लातूर येथे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रस्ते वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने रिफ्लेक्टर लावण्याचा विशेष कार्यक्रम संपन्न झाला.

साखर कारखान्याचे गळीत हंगाम सुरु असून यामुळे ऊसवाहतुकीसाठी वाहनांची मोठी रस्त्यावर वर्दळ आहे. विलास कारखान्याच्या ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक, ट्रॅक्टर, मिनीट्रॅक्टर, बैलगाडी व हार्वेस्टर पाठीमागील बाजूस हे रिफ्लेक्टर लावण्यात आले आहेत. रात्री - अपरात्री ऊसाने भरलेली वाहने रस्त्यावरून जाताना अपघात होवू नये हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रम प्रसंगी सचिन राठोर (आर.टी.ओ., लातूर), सौ. अंजली पाथरे (आर.टी.ओ., लातूर), ए.एन. उजगरे (पोलीस निरीक्षक, मुरुड), केंद्रे (पोलीस निरीक्षक, गातेगाव), या अधिकाऱ्यांनी यावेळी वाहन चालक व बैलगाडी चालकांना अनेक महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना दिल्या. या प्रसंगी बोलतांना वाहनांना सुरक्षिततेसाठी मागील बाजूस रिफ्लेक्टर लावणे आवश्यक आहे. वाहन चालवताना मोठ्या आवाजात टेप रेकॉर्डर लावू नये, अशा सुचना दिल्या.



# ‘भाजप’ मधील वाढत्या ‘इनकमिंग’ मुळे निष्ठावंत कार्यक्षेत्राबाहेर..?

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** केंद्रातआणि राज्यात सत्तास्थानी असलेल्या भाजपच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून विविध राजकीय पक्षातील नेते-कार्यकर्ते सध्या मोठ्या प्रमाणात भाजपाकडे वळत आहेत. लातूर जिल्ह्यातहीअन्य राजकीय पक्षातून भाजपकडे येणाऱ्या नेते-कार्यकर्त्यांची संख्याही सद्यस्थितीत लक्षणीय आहे. भाजपमध्ये वाढत असलेल्या ह्या ‘इनकमिंग’ मुळे मूळचे जनसंघापासून भाजपसोबत असलेले अनेक निष्ठावंत पदाधिकारी-कार्यकर्ते मात्र; ‘कार्यक्षेत्रा’च्या बाहेर जात असल्याचे वास्तव चित्र पाहावयास मिळत आहे. अन्य पक्षातून आपल्या पक्षात येणाऱ्या नेते-कार्यकर्त्यांमुळे आपल्यावर पक्षाकडून हेतुतःअन्याय होत असल्याची खदखद अशा निष्ठावंतांतून व्यक्त होत आहे.

निवडणूक डोळ्यासमोर आली की असे प्रकार वारंवार घडत असतात. सत्तेचा आस्वादाचा लाभ घेण्याच्या उद्देशाने असे प्रकार राजकारणात घडत असतात, किंबहुना हे अपेक्षितही मानले जाते. ज्यावेळीराज्यात-केंद्र काँग्रेसची सत्ता असायची तेव्हा अन्य राजकीय पक्षातील नेते- कार्यकर्त्यांचा ओढा काँग्रेसकडे अधिक असल्याचे आपण अनुभवले-पाहिले आहे. तीन-साडेतीन दशकांपूर्वी लातूर शहरात-जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी भारतीय जनता पार्टीला जेवढ्या जागा आहेत, तेवढे कार्यकर्ते उमेदवार म्हणूनही मिळत नसत. त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांवर तेव्हा काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व असायचे. राजकारणात वेळेला अनन्यसाधारण असे महत्व असते. कधी कोणता पक्ष जोमात येईल आणि कोणता राजकीय पक्ष कोमात जाईल याची शाश्वती नसते. तीन साडेतीन दशकांपूर्वी जी अवस्था भाजपाची होती, तशीच अवस्था आजमितीस भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची झाल्याचे पाहावयास मिळते. हा सगळा काळाचा महिमा असे संबोधले गेल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.

सध्याचे राजकारण युती-आघाडीचे झाले आहे. कोणताही एकच राजकीय पक्ष सत्ता स्थापनेच्या जवळ जाऊ शकत नाही, असेही दिसून येते. त्यामुळे भाजपासारख्या प्रमुख राजकीय पक्षांशी युती करून आपल्यालाही सत्तेचा थोडाफार वाटा मिळावा, या उद्देशाने अनेक छोटे छोटे पक्ष युतीमध्ये सहभागी होण्यास दिसतात. नेहमीच कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात ‘पक्षांतर’ हा विषय जणू ‘नेमेचि येतो पावसाळा..’ या उक्तीप्रमाणे उपयोगात आणला जात असल्याचे दृष्टीपथास येते. आजच्या बदलत्या राजकीय वातावरणात हे स्वाभाविकही आहे, असे म्हणता येईल. मागच्या काही वर्षात भारतीय जनता पक्षात अन्य राजकीय पक्षातून येणाऱ्या नेते-पदाधिकाऱ्यांची संख्या फार वाढली आहे. यामागे अनेक कारणे असल्याचे सांगितले, बोलले जात असले तरी जे घडतेय ते योग्यच आहे, असे म्हणण्याशिवाय पर्याय नाही.

अन्य राजकीय पक्षातून भारतीय जनता पक्षात येणाऱ्या लातूर जिल्ह्यातील अनेक नेते - कार्यकर्त्यांमुळे आजमितीस जिल्ह्यात भाजपाकडे नेत्यांची संख्या खूप वाढली आहे. वाढलेल्या नेत्यांच्या संख्येच्या तुलनेत सत्तेत सर्वांनाच लाभाची पदे मिळतीलच याचीही शाश्वती आता राहिलेली दिसत नाही. जिल्ह्यात भाजपचे तीन आमदार निवडून येऊनही कोणाला घ्यायचे आणि कोणाची नाराजी ओढवून घ्यायची, यामध्ये भाजपने एकाही आमदाराला मंत्रिपदाची संधी दिली नाही, हे वास्तव आहे. याउलट महायुतीत असणाऱ्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या बाबासाहेब पाटील यांना सहकार मंत्रिपदाची लॉटरी लागली. आता बाबासाहेबांपेक्षा सक्षम-कार्यक्षम चेहरे जिल्ह्यात असतानाही भाजप नेतृत्वाला तसे करता आले नाही. संख्याबळ आणि सत्तेच्या वाट्याची गणिते आखताना युती आघाडीमुळे अशा प्रकारचा अन्याय नेत्यांवरही होऊ शकतो, याकरिता लातूर जिल्ह्यातील हे उदाहरण फार बोलके आहे,असेच म्हणावे लागेल. जेथे नेत्यांना प्रसंगी अन्यायाला सामोरे जावे लागते तेथे पदाधिकारी-कार्यकर्त्यांचे काय? असाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवारी लातूर जिल्ह्यातील उदगीरमध्ये आले होते. त्यावेळी लातूर ग्रामीणचे काँग्रेसचे माजी आमदार त्र्यंबक भिसे, लातूर नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. येत्या काही दिवसात आणखी काही नवे चेहरे भाजपात येणार असल्याची चर्चा लातूरच्या राजकीय वर्तुळात आहे. लातूर शहर महापालिकेच्या निवडणुकीपर्यंत अनेकांचा भाजपात प्रवेश झालेला असणार आहे. प्रत्येकजण उमेदवारीच्या, सत्तेतील लाभाच्या दृष्टीनेच भाजपाकडे येणार आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. अशावेळी येणाऱ्या काळात भारतीय जनता पक्ष उमेदवारी-तिकिटे देणार तरी कोणाला ? हा खरा प्रश्र्न आहे. नव्याने पक्षात आलेल्या अन्य पक्षातील कार्यकर्त्यांना की जनसंघापासून तसेच वर्षानुवर्षे भाजपशी एकनिष्ठ, निष्ठावंत राहिलेल्या कार्यकर्त्यांना? असा प्रश्न आता उपस्थित होण्याची शक्यता वाढली आहे.

भाजपमधील या वाढत्या इनकमिंगवर जिल्ह्यातील जनसंघापासून भाजपशी संबंधित असलेल्या एका पदाधिकाऱ्याने खूपच बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली. सदरील पदाधिकारी आजही भाजपचा जिल्ह्यातील निष्ठावंत चेहरा म्हणून ओळखला जातो. आपण कितीही निष्ठावंत असलो तरी आता अन्य पक्षातून येणाऱ्यांना लाभाची पदे मिळणार मिळणार असल्याने आता आपल्यासारख्यांना काही कामच उरले नाही? अशी भावना त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

अन्य राजकीय पक्षातून भाजपात आलेल्या मंडळींनीच आज भाजपचा ताबा घेतला असल्याने खऱ्या निष्ठावंताना आता कोणी वालीच उरला नाही की काय? अशा प्रतिक्रियाही ऐकावयास मिळाल्या. त्यामुळे अन्य पक्षातून येणाऱ्या वाढत्या ‘इनकमिंग’ मुळे मूळच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय होतोय, ही बाब खरी असल्याने भाजपच्या वरिष्ठ पातळीवरील नेत्यांनी या बाबींकडे गांभीर्याने पाहावे, अशा अपेक्षाही वाढीस लागल्या आहेत. हा मुद्दा केवळ लातूर जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्यभर असे होत असल्याने त्याकडे पक्षनेत्यांनी सामंजस्याने पाहावे, अशा भावनाही निष्ठावंतांकडून व्यक्त केल्या जात आहेत. एकंदर परिस्थितीवरून तूर्तास निष्ठावंत कार्यकर्ते मोबाईलच्या भाषेत ‘कार्यक्षेत्राबाहेर’ असल्याचे कटाक्षाने निदर्शनास येत आहे.



## दयानंद महाविद्यालयात ‘रासेयो’ कार्यक्रमाधिकाऱ्यांची कार्यशाळा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ विद्यार्थ्यांची सेवाभावना जागृत करणारी योजना नसून समाजाचे ऋण फेडण्याची आणि परमार्थ साधण्याची संधी देखील आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही योजना प्रभावीपणे कार्य करीत असून त्यांच्यातील नेतृत्वगुण, शिस्तबद्धता व राष्ट्रनिष्ठा दृढ करण्याचे कार्य एनएसएसच्या माध्यमातून घडते, असे गौरवोद्गार सहाय्यक शिक्षण संचालक संजय पंचगल्ले यांनी व्यक्त केले.

ते दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे लातूर, नांदेड व धाराशिव जिल्ह्यातील महाविद्यालयीन एनएसएस कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पंचगल्ले पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना समाजातील विविध समस्यांची जाणीव करून देत त्या सोडवण्याची प्रेरणा एनएसएसच्या उपक्रमातून मिळते. कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातूनच गुणवत्तापूर्ण स्वयंसेवक घडू शकतात. त्यामुळे जबाबदारीने कार्य करत समाजनिर्मितीत सहभाग वाढवावा.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात एनएसएसची विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. लातूर विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे यांनी वर्षभर चाललेल्या सेवाभिमुख उपक्रमांची माहिती देत येणाऱ्या शैक्षणिक वर्षातील कार्ययोजनांची सविस्तर रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली. उत्तम नियोजन, योग्य समन्वय आणि स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग यामुळेच विभागीय शिबिरे यशस्वी होतात, असेही त्यांनी नमूद केले.

दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनीही दिशा व प्रेरणा देणारे मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेंतील अनुभव विद्यार्थ्यांना आयुष्यभर सोबत राहतात, असे सांगितले. यावेळी राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या डॉ. संदीपान जगदाळे यांचा सर्व अतिथी आणि कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेड जिल्हा समन्वयक प्रा. मारुती हनमंतकर, धाराशिव जिल्हा समन्वयक प्रा. मोहन राठोड आणि लातूर जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी यांनी विशेष परिश्रम घेतले. पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांनी कार्यक्रमाचे नियोजन पाहिले. सूत्रसंचालन प्रा. अनिल भुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मंत्री यांनी मानले. या कार्यशाळेत लातूर, नांदेड व धाराशिव जिल्ह्यांतील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व कार्यक्रमाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर रक्तदान महोत्सवात विक्रमी कामगिरी

### ■ संविधान दिनानिमित्त शहरात तब्बल ६०२ बॅग रक्तसंकलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ नोव्हेंबर :** संविधान दिनाचे औचित्य साधत लातूर जिल्हा वकील मंडळ व शहरातील नामांकित अकरा संस्थांनी एकत्र येत 'रक्तवीर लातूर गौरव लातूर' या प्रेरणादायी ब्रीदवाक्याखाली भव्य लातूर रक्तदान महोत्सव २०२५ आयोजित केला. या महोत्सवात तब्बल ६०२ रक्तबॅगचे अभूतपूर्व संकलन होत लातूरकरांनी ऐतिहासिक विक्रम रचला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड वाय डी जगताप यांनी भूषवले. उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका साहेब यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे या उपस्थित होत्या. तसेच जिल्हा न्यायमूर्ती आर. आर. भोसले, एस. व्ही. त्रिपाठी, एस.व्ही.जाधव विधीसेवा प्राधिकरणाचे सचिव




व्ही.एन.गिरवलकर एचडीएफसी बँकेचे दत्तात्रय महाबळ ,पत्रकार संघाचे सचिव दत्तात्रय परळकर, नागनाथ गित्ते, विक्रमी रक्तदाता पारस चापसी आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

जिल्हा न्यायाधीश भारूका यांनी लातूर जिल्हा वकील मंडळ व साप्ताहिक पत्रकार संघाचे विशेष कौतुक करत सर्व आयोजक संस्थांचे अभिनंदन केले. अशा उपक्रमांची गरज समाजाला आहे असे मत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी व्यक्त केले. महोत्सव स्थळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ.अर्चना पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

या भव्य महोत्सवाच्या यशात लातूर जिल्हा वकील मंडळ, लातूर जिल्हा न्यायिक अधिकारी व विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, लातूर, लातूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघ,लायन्स क्लब ऑफ सिटी, लातूर, विद्यार्थी कृती हक्क समिती, अखिल भारतीय अधिवक्ता परिषद, लातूर, लातूर ब्लड बँक अमूल दूध, द न्यू इंडिया इन्शुरन्स, एचडीएफसी बँक यांसह सर्व संस्थांच्या कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. गणेश गोजमगुंडे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. इरफान शेख, ॲड. निलेश मुचाटे यांनी तर आभार संजय राजुळे यांनी मानले.

लातूरकरांच्या या समाजहितैषी पुढाकाराने रक्तदान संस्कृतीला नवा आयाम मिळाला असून ६०२ बॅग संकलनाचा हा विक्रम लातूरच्या इतिहासात महत्वाची नोंद ठरला आहे.

## मनपाचे थकबाकीदारांना पुन्हा शास्ती सुटची भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ नोव्हेंबर :** कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिकामार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच संपूर्ण कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून कर संकलन केले जात आहे. त्यादृष्टीने नियमितपणे कर भरणारे मालमत्ताधारकांसाठी वर्षाच्या सुरुवातीस विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. तसेच थकबाकीदार यांच्या कडील थकीत कर वसुलीस चालना देण्यासाठी यापूर्वी वेळोवेळी शास्ती माफी योजना लागू करण्यात आले होती. तथापि काही थकबाकीदार प्रतिसाद देत नसल्याने, सद्यस्थितीत थकबाकीदार मालमत्ता धारकावर जप्ती ची धडक कार्यवाही करण्यात येत आहे.

**विशेष कर वसुली शिबिराचे आयोजन दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी शिबिर; शास्तीत ८०% सुट मिळवण्याची यावर्षातील शेवटची संधी**

पण तत्पूर्वी थकबाकीदार याना टॅक्स भरण्याची संधी मिळावी या दृष्टीने आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांच्या नियोजनातून दि ३० नोव्हेंबर रोजी विशेष कर वसुली शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात थकीत टॅक्स भरणारे मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर ८०% शास्ती माफी देण्याचा निर्णय घेण्यात आहे. तरी दि.३० नोव्हेंबर २०२५ रविवारी सकाळी १० ते ५ या वेळात महानगरपालिका मुख्यालय येथे सदरील शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तरी अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे .

या शिबिरापूर्वी ४००० थकबाकीदार मालमत्ता धारकाना नोटीस बजावण्यात येणार असून या शिबिरासाठी देण्यात येणारी ८०% शास्ती माफी ही या वर्षातील शेवटची शास्ती माफी योजना असल्याने अधिकाधिक मालमत्ताधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन टॅक्स भरणा करावा व १ डिसेंबर पासून सुरू होणारी जप्ती कार्यवाही टाळावी असे आवाहन मनपा उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## संविधान म्हणजे नागरिकांचे सुरक्षा कवच : अजित कव्हेकर

### शहर जिल्हा भाजपा कार्यालयात संविधान दिनानिमित्त उद्देशीकेचे वाचन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** जगातील सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशात नांदत आहेत. लोकशाहीला बळकट करण्याचे काम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केले आहे. देशातील समता एकता संविधानामुळे अबाधित असल्याचे सांगून संविधान म्हणजे देशातील नागरिकांचे सुरक्षा कवच असल्याचे प्रतिपादन लातूर शहर भाजपा जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात असलेल्या पक्ष कार्यालयात शहर जिल्हा भाजपाच्या वतीने संविधान दिनानिमित्त उद्देशीकेचे वाचन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर बोलत होते. याप्रसंगी शहर निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना



पाटील चाकूरकर, सरचिटणीस निखील गायकवाड, संजय गीर, प्रविण कस्तुरे, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष ॲड. पवन आल्टे , विनय जाकते, भरत लोंढे, आतिश कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकार्यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाची निर्मिती केली असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि या संविधान निर्मितीला आज ७५ वर्षे पुर्ण झाली आहेत. जगातील सर्वात मोठी लोकशाही भारत देशात नांदत असून या लोकशाहीला अधिक बळकट करण्याचे काम संविधानामुळे झाले आहे. संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला वेगवेगळे हक्क मिळालेले असून या हक्कांमुळे देशातील समता व एकता अधिक दृढ झाली आहे. संविधानाने जसे हक्क दिले आहे तसे काही कर्तव्य हि पार पाडण्यास सांगितले आहे. या कर्तव्यांच्या माध्यमातून संविधानाला अपेक्षित असणारी सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले योगदान देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी सरचिटणीस निखील गायकवाड, आतिश कांबळे, बाबा गायकवाड, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वप्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर संविधान उद्देशीकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

या वेळी मंडल अध्यक्ष राहुल भुतडा, रोहित पाटील, अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष मुन्ना हाश्मी, ॲड. दिपक मठपती, सुरेश राठोड, ज्योती रसाळ, शितल कुलकर्णी, आफरीन खान, ज्योती मारकडे, सिमा करपे, किशन बडगीरे, राजकुमार गोजमगुंडे, संतोष पांचाळ, गोविंद सूर्यवंशी, उदय देशपांडे, सागर घोडके, डॉ. संतोष जमदाडे, अरुण जाधव, आकाश बाभळे, अनिल कबाडे, ऋषिकेश पोतदार, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदान मतमोजणी दिवशी मद्यविक्री राहणार बंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ नोव्हेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, निलंगा आणि औसा या चार नगरपरिषदा व रेणापूर नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर,२०२५ रोजी मतदान होणार असून मतमोजणी ३ डिसेंबर, २०२५ रोजी होणार आहे. मतदानाच्या अगोदरचा एक दिवस आणि मतदानाचा दिवस म्हणजेच १ व २ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित नगरपरिषद आणि नगरपंचायत हद्दीतील सर्व अबकारी अनुज्ञप्त्या बंद राहतील. तसेच मतमोजणी दिवशी म्हणजेच ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणाऱ्या ठिकाणची मद्यविक्री बंद राहणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य नियम १९६९ च्या संबंधित कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुध्द महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ व त्या अंतर्गत असलेल्या नियमांतर्गत तरतुदीनुसार कडक कारवाई केली जाईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लाडकी बहीण योजना चालूच राहणार : मुख्यमंत्री

## युतीच्या पाठीशी आपली ताकद उभी करा; उदगीरमध्ये जाहीर सभेत मुख्यमंत्री फडणवीसांचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २७ नोव्हेंबर :** राज्य सरकारच्या वतीने चालू असलेली लाडकी बहीण योजना बंद होणार असल्याच्या अफवा विरोधकांकडून पसरविल्या जात आहेत. परंतु जोपर्यंत देवेंद्र फडणवीस आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही असे जाहीर आश्र्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उदगीर येथे नगर परिषद निवडणूकीच्या निमित्ताने आयोजित जाहीर सभेत बोलताना दिले.

उदगीर येथील भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या वतीने आयोजित जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आ.संजय बनसोडे, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, कर्नाटकचे माजी मंत्री भगवंत खुब्बा, माजी खा. सुधाकर शृंगारे, डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, माजी आमदार गोविंद केंद्रे, अरविंद पाटील निलंगेकर, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, राहुल केंद्रे, रामचंद्र तिरुके, अमोल निडवदे, सुनील सावळे, उषा कांबळे, उत्तराताई कलबुर्गे, भगवान पाटील, बसवराज बागबंदे, ॲड. व्यंकट बेद्रे, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, मनोज पुदाले, सुधीर भोसले, ॲड. दत्ता






पाटील, प्रा.श्याम डावळे, बाळासाहेब मरलापल्ले, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, वसंत पाटील, रामदास बेंबडे, अमोल अनकल्ले, शशिकांत बनसोडे, युतीच्या अध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.स्वाती सचिन हुडे, माजी नगरसेवक सचिन हुडे यांच्यासह भाजपा व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उदगीरचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत उदगीरची ओळख आखाडा, कुस्ती आणि विकासातील दोस्ती अशी असल्याचे सांगुन मुख्यमंत्र्यांनी जनतेचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी भुयारी गटार योजना राबवित असल्याचे सांगितले. या योजनेच्या पहिल्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच दुसऱ्या टप्प्यास मंजुरी देण्यात येणार आहे. लवकरच उदगीर शहर नाली मुक्त होणार असल्याचे सांगितले. वाढत्या शहरीकरणामुळे अन्न, वस्त्र निवारा सोबतच रोजगार, शिक्षण आरोग्याच्या समस्या शहरात निर्माण झाल्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगितले. संविधान दिनानिमित्त बोलताना, लोकशाही आणि समानतेचे श्रेय विश्र्वरत्न प.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना असून आता राज्यकर्ते मताच्या पेटीतून निवडला जातो असे ते म्हणाले.

शहरातील अतिक्रमण, कचरा, पाण्याची समस्या आणि प्रदूषण यावर उपाययोजना सुरू असल्याचे नमूद करत अटल योजनेतून महाराष्ट्राला ५० हजार कोटी तर उदगीरमध्ये भुयारी गटार योजना आणि लिंबोटी पाणीपुरवठा योजना गतीने राबवित असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. १४० कोटींच्या भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाल्याचे तर दुसरा टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले.

प्रास्ताविक भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर यांनी केले. माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी राज्य सरकारने शेतकऱ्यांना संकटात साथ देण्याचे काम केले असून आपण आमदारकीच्या काळात उदगीर मतदार संघाचा सर्वांगीण विकास केल्याचे सांगितले. उदगीर जिल्हा निर्मितीसाठी आवश्यक त्या इमारती उभ्या झाल्या असून मुख्यमंत्री महोदयांनी उदगीरकरांना आश्र्वस्थ करावे अशी अपेक्षा आ. संजय बनसोडे यांनी यावेळी व्यक्त केली.

नवीन जिल्ह्यांच्या मागणीवर सकारात्मक विचार करणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. उदगीर मध्ये नगर परिषदेच्या निवडणूकीसाठी माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी युती केल्याबद्दल आ.संजय बनसोडे यांचे अभिनंदन केले. उदगीर मध्ये भाजपा व राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. आभार रामचंद्र तिरुके यांनी केले. यावेळी उदगीर परिसरातील नागरिक व महिला उपस्थित होते.

# साखळी येथे अज्ञाताकडून बसची दुसऱ्यांदा तोडफोड

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, २७ नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथील बसस्थानकांवर मुक्कामी उदगीर



### आज साकोळ बंदचे केले आवाहन

आगाराची एस.टी.बस उभी केली असता दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मध्य रात्री अज्ञात व्यक्तींकडून एसटीच्या खिडक्यांची काचे फोडून मोठ्याप्रमाणात नुकसान केल्याची तक्रार शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशन मध्ये करण्यात आली आहे.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथे गेल्या ३० वर्षांपासून चालु असलेली उदगीर आगाराची बस दररोज संध्याकाळी मुक्कामी साकोळ येथे रहात असुन आत्तापर्यंतच्या कालावधीत उदगीर साकोळ बस ३ ते ४ वेळा फोडली असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. दर वेळेस अज्ञात व्यक्तींकडून बसची तोडफोड होत असते एसटी आगारांकडुन तक्रारही दाखल करण्यात येते पण पोलिसांना आरोपीचा शोधच लागत नाही. मग हे पोलीस नेमके करतात काय? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

अशा या वारंवार घडणाऱ्या घटनेचा व पोलिसांचा ग्रामस्थांकडून येथील महात्मा बसवेश्वर चौकात जाहीर निषेध करून एसटी फोडणाऱ्या आरोपीला पकडून जनतेसमोर आणुन त्याची जोपर्यंत धींड काढणार नाहीत तोपर्यंत ग्रामस्थांकडून साकोळ बंद ठेवणार असल्याचे येथील सामाजिक कार्यकर्ते अशिष धुमाळे, दलित महासंघाचे अध्यक्ष नरसिंग शिंदे, माजी सरपंच अब्दुल अजीज मुल्ला, माजी चेअरमन सुर्यकांत उमाटे, सामाजिक कार्यकर्त शिवाभाऊ डोंगरे, महेश तिवारी, मनोज वाघमारे, सिद्धेश्वर मोरे, अबुअकबर मुल्ला यांच्यासह गावातील शेकडो नागरिकांच्या सह्याचे तक्रारी अर्ज शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनला देण्यात आलेले आहे.

# ‘दैठणा’चा चैतन्य पाटील एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, २७ नोव्हेंबर :** दैठणा गावातील चैतन्य किरण पाटील यांची एमबीबीएस प्रवेशासाठी पात्रता ठरल्याने गावामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक किरण जनार्दन पाटील यांचे ज्येष्ठ चिरंजीव असलेल्या चैतन्य पाटील यांची वैद्यकीय क्षेत्रातील वाटचाल आता अधिकृतपणे सुरू झाली असून या यशाबद्दल दैठणा गावातून त्यांचा सत्कार करून कौतुकाचा वर्षाव करण्यात आला.

ग्रामपंचायत कार्यालय, दैठणा यांच्या वतीने या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन



करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख नियोजन दैठणा गावचे सरपंच शेषराव कांबळे तसेच गावचे माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच आशिष गोविंदराव बिरादार यांनी केले. हा सत्कार शाल श्रीफळ आणि पुष्पहार घालून करण्यात आला.

या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून चैतन्य पाटील यांचा उत्साहवर्धनाचा वर्षाव केला. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार, शिक्षणप्रेमी शिवाजीराव बिरादार, सुखदेव पाटील, संदीपान पाटील, किरण पाटील, प्रकाश गुडे, पांडुरंग पाटील, धनु महाराज, बालाजी तोटे, राजू बाबळधरे, बजरंग पाटील, माधवराव पाटील, राहुल येडले, हरी गुडे, शैलेंद्र पाटील तसेच ग्रामपंचायत कर्मचारी अमोल बिरादार, सतीश येडले यांसह अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.

गावकऱ्यांनी चैतन्य पाटील यांना भविष्यातील वैद्यकीय कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत, त्यांच्या मेहनतीचे आणि यशाचे कौतुक केले. दैठणा गावातून एका उज्ज्वल वैद्यकीय सेवकाची निर्मिती होत असल्याचा आनंद उपस्थितांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.




**उदगीर :** आर्य वैश्य युथ महिला मंडळ, उदगीर आणि श्री कोटलवार कलेकशन, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबीर अंबरखाने ब्लड बँकेमध्ये आयोजित केले. यात सौ अनुराधा मुक्कावार, सौ. प्रियांका पेन्सलवार, सौ. स्नेहल कोटलवार, सौ मयुरी कोटलवार, सौ. छाया पेन्सलवार, सौ. संध्या पत्तेवार हे उपस्थित होते. रक्तदाता श्रीमती. मीरा कोटलवार, सौ शिल्पा गबाळे, सौ. प्रीती कवटीकवार, सौ. संध्या बिरादार, सौ. रोहिणी कदम, सौ. अरुणा गजरा, अमोल कोटलवार, विजय गबाळे, रुपेश पालीवाल, बालाजी चिद्रेवार, राहुल बोतकुलवार, ओंकार दाचावार, इरखान पठाण, विजय होनराव पाटील, अनुप पेन्सलवार आदीनी रक्तदान केले.

# मंगेशकर महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २७ नोव्हेंबर :** निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात दि.२६ रोजी राज्यशास्त्र विभाग, पॉलिटिकल फोरम अंतर्गत संविधान वाचन कट्टा, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच भारतीय संविधानाच्या प्रतीचे पूजन केले.

सूत्रसंचालन तथा प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.नागनाथ तेलंगे यांनी केले. याप्रसंगी रा.छा.से. विभागाचे लेफ्टनंट डॉ.जाफर चौधरी, पॉलिटिकल फोरमचे डॉ. प्रदीप पाटील, प्रा.विकास पाटील,डॉ. विनोद चिंते, डॉ.अशोक नारनवरे, डॉ.सचिन हंचाटे, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.बलभीम सातपुते, विलास होटकर, रूपेश मोरे, राजेंद्र बेलूरे, विजयकुमार बाबछडे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रा.छा. से.विभागाचे कॅडेट्स व विद्यार्थी उपस्थित होते.

# भाजपा वचनपूर्ती करणारा पक्ष : आ. संभाजीराव निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २७ नोव्हेंबर :** भाजपने मागील निवडणुकीत दिलेले विकासाचे आश्वासन पूर्ण केली असून भाजप हा वचनपूर्ती करणारा पक्ष आहे. या पुढील काळातही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले. निलंगा येथे भटक्या विमुक्त समाजाच्या कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी खासदार पद्मश्री डॉक्टर विकास महात्मे यांच्या हस्ते निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी भाजपच्या जाहीरनामा प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी अरविंद पाटील निलंगेकर अनिल गोयेकर, संजय दोरवे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय हलगरकर यांच्यासह सर्व प्रभागातील भाजपा महायुतीचे उमेदवार उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार निलंगेकर म्हणाले भाजपने मागील काळात पालिका निवडणुकीत दिलेल्या आश्र्वासनाची पूर्तता करून त्याची कार्यपुस्तिका प्रकाशित करून जनतेच्या हाती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पप्रमाणे सबका साथ, सबका विकास हा मूलमंत्र कृतीत उतरवण्यासाठी २७ कलमी वचनांचा जाहीरनामा भाजपने प्रकाशित केले आहे. या वचनांची




पूर्तता करून आगामी काळात निलंगा शहराच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय हलगरकर यांच्यासह भाजपा महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी भटक्या विमुक्तांच्या प्रमुख उपस्थितीत माजी खासदार डॉ विकास महात्मे यांच्या हस्ते जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आले. यावेळी बोलताना पद्मश्री डॉ महात्मे म्हणाले, भटक्या विमुक्त लोकांनी इंग्रजांच्या विरोधात तीव्र लढा देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे काम केले. काँग्रेसच्या काळात व इंग्रजांच्या काळात या समाजाला देशद्रोहाचा ठपका लागला होता. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत सुविधांपासून हा समाज वंचित होता. परंतु केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारच्या महायुती सरकारने या समाजाला योग्य दिशा देवून या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यामुळे भटक्या विमुक्त समाजाने भाजप महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले.

# ‘पन्नगेश्वर’समोर सर्वपक्षीय ठिय्या आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**
**पानगाव, २७ नोव्हेंबर :** पानगाव येथील पन्नगेश्वर साखर कारखान्यासमोर गुरुवारी सर्वपक्षीय ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी,




वाहतूक ठेकेदारांसह अनेकांनी सहभाग नोंदवला.

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रान्ती आणण्याच्या उद्देशाने पन्नगेश्वर साखर कारखान्याची उभारणी केली होती. मुंडेंच्या कार्यकाळात हा कारखाना अतिशय व्यवस्थितरीत्या चालवण्यात आला. गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर या कारखान्याची धुरा पंकजाताई मुंडे यांच्याकडे आली. तेव्हापासून मात्र हा कारखाना डबघाईला आला आणि पाहता पाहता दिवाळखोरीत निघाला. मागची अनेक वर्षे हा कारखाना बंद होता. कालांतराने कोणत्याही शेतकरी सभासद-कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना कल्पना न देता दिवाळखोरीत निघालेला हा कारखाना विमल ॲग्रो कंपनीने विकत घेतला असून या कंपनीने चालू हंगामात गाळपाचे दृष्टीने कामही सुरु केले आहे. मात्र, विमल ॲग्रो कंपनीने शेतकऱ्यांचे शेअर्स लॅप्स केले असून शेतकऱ्यांची थकलेली ऊस बिले, कर्मचाऱ्यांचे थकलेले वेतन, ऊस वाहतूकदारांची थकलेली बिले देण्यास नकार दिला आहे.

शेतकऱ्यांनी कारखान्याचे नवीन शेअर्स विकत घ्यावे. जुन्या शेअरची व शेतकऱ्यांच्या बिलाची व कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाशी आमचे काहीही देणे घेणे नाही अशी भूमिका या कंपनीने घेतली आहे. या बाबतीत वेळोवेळी मनसे नेते संतोष नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळी आंदोलने करण्यात आली. मात्र कारखाना प्रशासक कसलीही दाद देत नसल्यामुळे गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी पन्नगेश्वर कारखान्याच्या गेट जवळ ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी येत्या दि. २ डिसेंबरपर्यंत आमच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा पुढील आंदोलनाची दिशा ठरवली ठरवली जाईल. यापुढील भूमिका आक्रमक असेल असे मत मनसे नेते संतोष नागरगोजे यांनी यावेळी व्यक्त केले.

शेतकऱ्यांचे शेअर्स, थकीत बिल तसेच कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देऊन त्यांना कामावर घेतल्याशिवाय कारखांना चालु देणार नाही,असा इशाराही संतोष नागरगोजे यांनी दिला आहे. या आंदोलनात ईश्वरनाना गुडे, गोविंद दुड्डे, सुरेश भंडारे, गोविंद बापू नरारे, चंद्रकांत भंडारे, चेतन चव्हाण यांच्यासह अनेक शेतकरी, कर्मचारी उपस्थित होते.

# ‘रसिका’त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर

**त.भा. वृत्तसेवा,**
**देवणी, २६ नोव्हेंबर :** येथील कै. रसिका महाविद्यालय, देवणी व दीप करिअर अकॅडमी देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. पोलीस सेवेतील सुवर्णसंधी या विषयावर प्रा.प्रशांत माने यांनी सविस्तर मार्गदर्शन करून पोलीस सेवेतील स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? यावर अभ्यासपूर्ण उदाहरणासह उपस्थित विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी माहिती दिली व जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्ना शिवाय पर्याय नाही असा अमूल्य संदेश दिला.

मंचावर दीप करिअर अकॅडमीचे प्रा. दत्ता तगरे, प्रा. राहुल चव्हाण, प्रा. प्रदीप कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी तर आभार प्रा.डॉ. गोपाल सोमानी यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# मुलींनी स्वयं संरक्षणाचे प्रशिक्षण घेणे गरजेचे : स्मिता जाधव

**त.भा. वृत्तसेवा,**
**अहमदपूर, २६ नोव्हेंबर :** येथील किलबिल नॅशनल स्कूल शाळेत इनरव्हील क्लब अहमदपूर व पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांचे स्वयं संरक्षण याविषयी जनजागृती करण्यासाठी शाळेतील विद्यार्थिनीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शिका म्हणून अहमदपूर पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक स्मिता जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून इनरव्हील क्लब अध्यक्षा सौ पूजा रेड्डी , सचिव रजनी महाजन, कोषाध्यक्षा पल्लवी हेंगणे, सुनीता गुणाले, कलावती भातांब्रे मॅडम, संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील आदी उपस्थित होते.

सध्या समाजात लहान मुलीं-




वर होणारे अत्याचार रोखण्यासाठी पोलीस प्रशासन प्रयत्नशील आहे पण आपणही समाजाचे घटक म्हणून विद्यार्थी दशेत कोणती काळजी घेतली पाहिजे त्यातही पालकांनी मुलींना स्वयं संरक्षणाचे धडे दिले पाहिजेत असे प्रतिपादन स्मिता जाधव यांनी केले. यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या, शाळेत मुलींना मैदानावर जाऊन मैदानी खेळ, साहसी खेळ, कराटे, बॉक्सिंग या सारख्या खेळाचे प्रशिक्षण दिले पाहिजे . प्रत्येक स्त्री ही स्वतःच्या पायावर उभी राहून सक्षम बनली तरच आपल्या देशातील महिलांवर होणारे अत्याचार कमी होऊ शकतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानोबा भोसले यांनी केले तर सूत्रसंचालन आजरा औरादवाले, तेजस्वी मुळे सह सचिन जगताप यांनी केले तर आभार अफरीन शेख यांनी मानले कार्यक्रमास सर्व विद्यार्थीनी सह महिला स्टाफ उपस्थित होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त...



### रामभाऊ पवार यांना राज्यस्तरीय महात्मा फुले पुरस्कार

**परंडा, दि.२७ नोव्हेंबर -**

परंडा तालुक्यातील भुमिपुत्र छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष शिवश्री रामभाऊ पवार यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद २०२५ यांच्या वतीने राज्यस्तरीय महात्मा फुले पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभ पुणे येथे सकाळी ११ वाजता पार पडला. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष होते सुप्रसिद्ध साहित्यिक कवि किशोर टिळेकर, तर राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी या वर्षीच्या महात्मा फुले राज्यस्तरीय पुरस्कारासाठी श्री रामभाऊ पवार यांची निवड केली असल्याची माहिती दिली. शिवश्री रामभाऊ पवार यांना सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी सहकुटुंब उपस्थितीत आनंद व्यक्त केला. धाराशिव जिल्ह्यात या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे शिवश्री रामभाऊ पवार यांचे कौतुक मोठ्या प्रमाणावर होत आहे.



### खामसवाडी प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा

**खामसवाडी, दि.२७ नोव्हेंबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवपूर येथे आज संविधान दिनाचे औपचारिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी व व्याख्याते म्हणून रामचंद्र पवार सर, मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले प्रकाश नरसिंगे (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवपूर), सहशिक्षक आनंत बाबर सर आणि श्रीमती अंकिता चव्हाण यांनी भूमिका बजावल्या. कार्यक्रमात पालक रमेश उगले आणि अमोल सोनटक्के उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थिनी स्वरा विधाते, श्रावणी मिसाळ, अनुष्का सोनटक्के, वैष्णवी उगले यांनी संविधान दिनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले, तर शिक्षक व उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.



### एकलव्य विद्या संकुलमध्ये संविधान दिनाचे आयोजन

**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**

तालुक्यातील एकलव्य विद्या संकुल, मंगरूळ यमगरवाडी येथे आज संविधान दिनाचे औपचारिक कार्यक्रम पार पडले. या दिवशी शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन तसेच पालक मेळावा आयोजित करण्यात आला. प्रारंभी घटना तज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित पालक इंगळे आणि अविनाश शिंदे यांच्या हस्ते फीत कापून, गोविंद सोमानी यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन उद्घाटित करण्यात आले. शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थित पालकांना शैक्षणिक साहित्याबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात बहुसंख्य पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन अनिल घुगे, दयानंद भडंगे, प्रणिता शेटकार, कन्हैया व्हनाले, फुलाजी ताटी कुंडलवार, माधव पाटील, राजेंद्र पाटील यांनी केले. तसेच विठ्ठल म्हेत्रे, संतोष बनसोडे, गोविंद सोमानी, कोंडिबा देवकर उपस्थित होते.



### बोरामणी येथे श्री भावार्थ रामायण ग्रंथ वाचन निरूपण सेवा सुरू

**इटकळ, दि.२७ नोव्हेंबर -**

बोरामणी येथे श्री संत एकनाथ महाराज कृत श्री भावार्थ रामायण ग्रंथ वाचन निरूपण सेवा मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडत आहे. या कार्यक्रमात दररोज सुमारे २०० रामभक्त उपस्थित राहतात. आत्तापर्यंत बालकांड, अयोध्याकांड आणि अरण्यकांड या तीन कांडांची सांगता पूर्ण झाली असून, किष्किंधा कांडाचा प्रारंभ सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी करण्यात आला. त्या दिवशी सकाळी गावात ग्रंथ दिंडी सोहळा उत्साहात पार पडला आणि सायंकाळी सात वाजता हनुमान मंदिरावर किष्किंधा कांड सुरू करण्यात आला. रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत हभप. शिवाजी महाराज चव्हाण यांच्या कीर्तनाचे कार्यक्रम पार पडले. रामकथेचे कार्यक्रम सयोजित आणि नियमित पार पाडण्यासाठी रामभक्त हभप. शिवाजी सुरवसे, नरेश येलम, श्रीमती शकुंतला आवटे, दत्ता हंगरगे, सुरेश विभुते, दत्तात्रय शेळके, पंडित पटणे, संजय विभुते आणि इतर ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.

### वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

शहरातील वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.२६ नोव्हेंबर रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमभंग प्रकरणी कारवाई केली. या दिवशी एकूण २८३ कारवाया केल्या असून, २ लाख ३३ हजार ४५० रूपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा नगराध्यक्ष आणि नगरसेवक मोठ्या संख्येने निवडून येतील : शशिकांत शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

धाराशिवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद निवडणुकीतील तुतारी चिन्हावरील ३० उमेदवार व दोन पुरस्कृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य जाहीर सभा उत्साहात आणि विजयी निर्धारात पार पडली. सभेला प्रचंड जनसमुदायाने उपस्थित राहून अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

आपल्या प्रभावी भाषणात शशिकांत शिंदे म्हणाले, महाविकास आघाडीसोबत लढण्याची आमची इच्छा होती; भाजपाला फायदा होऊ नये म्हणून आम्ही प्रयत्न केले. मात्र आम्हाला कमी लेखले गेल्याने तुतारी चिन्हावर स्वतंत्र लढत देणे भाग पडले आहे. ते पुढे म्हणाले, आजचा हा जनसागर या गोष्टीची साक्ष देतोय की परवीन खलिफा कुरेशी आजच विजयी झालेल्या आहेत. लोकांसाठी रात्रंदिवस काम करणारा माणूस जाती-धर्म पाहत नाही. सर्व समाजबांधवांनी चांगल्या उमेदवारांना साथ द्यावी. भारतीय जनता पार्टीवरही मतचोरीचा आरोप करत त्यांचाही खरपूस समाचार घेतला. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचेही नाव न घेता यावेळी




टीका केली. पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, मुस्लिम समाजाला दिलेल्या प्रतिनिधित्वाचे आणि पक्षाने दाखवलेल्या खऱ्या पुरोगामी विचारांचे विशेष कौतुक केले. तुतारी चिन्हावरील उमेदवार विजयी झाल्यास जाहीरनाम्यातील प्रत्येक आश्वासन पाच वर्षांत पूर्ण करण्याची शपथ त्यांनी घेतली.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, धाराशिव जिल्हा निरीक्षक भारत जाधव,प्रदेश चिटणीस मसूद शेख, माजी नगराध्यक्ष खलिफा कुरेशी, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार परवीन खलिफा कुरेशी, महिला जिल्हाध्यक्ष मनीषा राखुंडे पाटील, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.अविनाश तांबारे तसेच पक्षाचे ३२ उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, विलास रेणके, मनीषा पाटील, शहराध्यक्ष रणवीर इंगळे, उमेदवार अर्चना अंबुरे, तेजस भालेराव, शिवशाहीर अनिल माने, उमेदवार हिना शेख यांसह इतर मान्यवरांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयाज शेख यांनी केले तर प्रभावी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. तुषार वाघमारे यांनी केले.

## उमरगा : पवनचक्की प्रकल्पातून १५.७८ लाखांचे केबल साहित्य चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ नोव्हेंबर -**

उमरगा पोलिस ठाणे हद्दीत जे.एस. डब्ल्यू कंपनीच्या पवनचक्की जिव निर्मिती प्रकल्पाच्या स्टोअरमधून सुमारे १५ लाख ७८ हजार २५५ रूपये किमतीचा केबल आणि कॉपर वायरचा मोठ्या प्रमाणावर माल अज्ञात चोरट्यांनी लांबविल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.

१४ जून २०२५ ते २१ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नारंगवाडी शिवार येथील प्रकल्पाच्या नेसल युनिटमधून खालीलप्रमाणे केबल्सची चोरी झाल्याचे फिर्यादींनी नमूद केले आहे.

स्टाटर पॉवर केबल २३.५ मीटर, रोटर पॉवर केबल २४.५ मीटर, नेसल आर्थिंग केबल २२ मीटर, ४०० व्होल्ट सप्लाय केबल १६ मीटर, वायएडब्ल्यू प्लेटफॉर्म इमर्जन्सी केबल ४६ मीटर, टॉवर लाईट केबल ३५ मीटर, सेफ्टी चेन केबल १६० मीटर, जनरेटर एनकोडर केबल १६० मीटर वरील साहित्याची एकूण किंमत १५ लाख ७८ हजार २५५ रूपये इतकी आहे.

या प्रकरणी शिवाजी प्रभाकर गायकवाड (वय ४२, रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर) यांनी तक्रार दिल्यानंतर उमरगा पोलिसांनी भा.दं.वि. कलम ३८०(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सात विद्यार्थ्यांची चमक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

यंदाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात धाराशिव येथील सात विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करीत विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावली. चित्रकला स्पर्धेत जगदीश सुतार द्वितीय क्रमांक, गौरी सुतार तृतीय क्रमांक. वक्तृत्व स्पर्धेत समीर शेख तृतीय क्रमांक. विज्ञान प्रदर्शनात (समूह) मस्के दीक्षा, सावतार तनुजा, शिंदे स्नेहा, पोतदार मेघराज तृतीय क्रमांक पटकावला.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी नाट्यगृह, धाराशिव




येथे हा युवा महोत्सव उत्साहात पार पडला. महोत्सवात विज्ञान-तंत्रज्ञानावरील नवसंकल्पना, सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रकला, कथालेखन, वक्तृत्व, कविता, फोटोग्राफी आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड येथे होणाऱ्या विभागीय युवा महोत्सवासाठी तेरणा महाविद्यालयाच्या जगदीश सुतार याची चित्रकला स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे डॉ. सुशीलकुमार होळंबे, सहसमन्वयक प्रा. रवींद्र गुरव, प्रा.डी.बी. ठाकूर, प्रा.डी.बी. भक्ते, प्रा. बालाजी चव्हाण, प्रा.ए.के. पिंपळे, प्रा.व्ही.एस. बोंदर, डॉ.आर.बी. ननवरे यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष पद्मसिंह पाटील, आ. राणाजगजीतसिंह पाटील, प्रा. गणेश भातलवंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मलकापूर श्री क्षेत्र दत्त मंदिरात दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थान येथे दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व सुभाष बाप्पा ग्रंथ पारायण सोहळा शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर पासून आयोजित करण्यात आला आहे.



सप्ताहाची सुरुवात आबासाहेब लोमटे, रुक्मीनी घोळवे, राजेश लोमटे यांच्या हस्ते कलश पूजन करून होणार आहे. त्याचबरोबर, विना पूजन तात्याराव काकडे, गोविंद वणवे, दत्ता पाटील, नरसिंग लोमटे यांच्या हस्ते, तर टाळ-मृदंग पूजन नेताजी लोमटे, पाशाभाई सय्यद, अच्युत लोमटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावर्षी हा सप्ताह ४३ वा असून, वैकुंठवासी ह.भ.प. सुभाष बाप्पा लोमटे महाराज यांनी याची सुरुवात केली होती, आणि ह.भ.प. एकनाथ लोमटे महाराज यांनी ही परंपरा चालू ठेवली आहे.

सप्ताहात सात दिवस काकडा भजन, ग्रंथ पारायण, किर्तन, गाथा भजन, प्रवचन, हरी जागर व प्रहाप्रसाद यांचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. दररोज रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत किर्तन सेवा राहणार आहे. दि.२८ रोजी हभप. किरण ताकमोगे महाराज दि.२९ रोजी हभप. माधव महाराज बोधले, दि.३० रोजी हभप. उत्रेश्वर महाराज लोखंडे, दि.१ रोजी हभप. पापा महाराज बोबडे, दि.२ रोजी हभप. वैजिनाथ उस्तुरे महाराज दि.३ रोजी हभप. विलास मुळे महाराज दि.४ रोजी हभप. नाना महाराज कदम यांचे किर्तन होणार आहे. दत्त जयंतीच्या दिवशी पालखी सोहळा, महापूजा आणि महाप्रसादाचा दिवसभर कार्यक्रम पार पडेल. यासाठी मंदिरात विशेष मंडप उभारण्यात आले आहे.

कळंब व धाराशिव तालुक्यातील अनेक गावातील भजनी मंडळ या कार्यक्रमात सहभागी होतील. हभप. एकनाथ लोमटे महाराज यांनी सर्व भाविकांना सप्ताहाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## मलकापूर जि.प. शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात व देशभक्तीच्या उर्मीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर मुख्याध्यापक भंडारे बळीराम व शिक्षीका गाडे नंदिनी यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांची माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांकडून



संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन घेण्यात आले.

संविधान दिनानिमीत्त विविध सांस्कृतिक उपक्रम, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या त्यास सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या प्रसंगी पालक व ग्रामस्थांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

## लोटस पोदार लर्न स्कूल, नळदुर्ग येथे 'संविधान अमृत महोत्सव' साजरा




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ नोव्हेंबर -**

शासनाच्या जी.आर.नुसार सुरु असलेल्या संविधान अमृत महोत्सवा निमित्त नळदुर्ग येथील लोटस पोदार लर्न स्कूल येथे विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रतिमापूजनाचे कार्य शाळेच्या प्राचार्या रेवती शिंदे मगर यांनी केले, तर प्रशासकीय अधिकारी योगेश सुर्यवंशी यांनी पुष्पहार अर्पण करून भारतीय संविधानास व डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले.

प्रार्थना सत्रादरम्यान संविधानातील प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

उद्देशिकेचे स्पष्ट, सुबक वाचन सहावीतील विद्यार्थिनी समीक्षा सनी बनसोडे हिने केले. तर पाचवीतील विद्यार्थी प्रणव दीपक रगबले हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेत उपस्थित राहून आत्मचरित्रपर मनोगत सादर करीत कार्यक्रमाला विशेष आकर्षण दिले.

कार्यक्रमाची संकल्पना आणि अंमलबजावणी यशस्वी करण्यासाठी सीनियर कोऑर्डिनेटर देव मंगरुळे, इव्हेंट कोऑर्डिनेटर महेश कोरे, क्रीडा शिक्षक राजरत्न बनसोडे यांसह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

## दहिफळ येथे चंपा षष्टीनिमित्त खंडोबा यात्रेत भव्य सोंग-मिरवणूक



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील दहिफळ गावात गुरुवारी (ता. २७) चंपा षष्टी निमित्त ग्रामदैवत खंडोबा यात्रेच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक उत्साह, रंगत आणि सांस्कृतिक वैविध्याने भरलेली सोंग-मिरवणूक भव्यदिव्य वातावरणात पार पडली.

सकाळपासूनच गावातील मुख्य रस्ते आणि चौकांत गर्दी उसळली होती. बालकलाकारांनी रामायण, महाभारत, शिव-पार्वती, संत-महाराज, वाघोबा-भैरवनाथ यांसारख्या पारंपरिक सोंगांचे वेश परिधान करून उपस्थितांचे मन वेधून घेतले. तर युवक कलाकारांनी रांगडे, गोंधळी, वाघ्या-मुरळ्या, बुरुड, गवळी, वेशीकर, ऋषीमुनी, रावण तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या ऐतिहासिक वेशभूषा करून सोंगाचे प्रभावी सादरीकरण केले. पांढऱ्या अंगावर भस्म लावून तालावर नाचणाऱ्या कलाकारांनी यात्रेला विशेष गारुड निर्माण केले.

गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालक घरांच्या गच्च्यांवरून आणि रस्त्यालगत उभे राहून मिरवणुकीचे स्वागत करत होते. पारंपरिक ढोल-ताशा, हलगी-नगारे आणि लेझीम पथक यांच्या गजरामुळे संपूर्ण वातावरण दणाणून गेले. विविध धार्मिक आणि सांस्कृतिक प्रसंगांचे दृश्यरूप सादरीकरण केल्यामुळे सोंग कार्यक्रम पाहणाऱ्यांचे मनमोहक ठरले.

स्थानिक युवकांनी या सोंग-मिरवणुकीची तयारी गेल्या अनेक दिवसांपासून केली होती. सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि ग्रामदैवतावरील भक्तीभाव जपणारा हा सोहळा यंदाही विशेष उत्साहात पार पडला, असे ग्रामस्थांनी सांगितले.

मिरवणुकीचा समारोप खंडोबा मंदिर परिसरात झाला. पूजा-अर्चा, महाप्रसाद आणि भक्तांच्या गर्दीत उत्सवाला सुंदर पूर्णविराम मिळाला. उपस्थित भाविकांनी आणि ग्रामस्थांनी दहिफळ गावची समृद्ध पारंपरिक सोंगसंस्कृती पुन्हा एकदा उजळून निघाल्याचे समाधान व्यक्त केले.

## तुळजापूर : गोमांस वाहतूक प्रकरणात एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**

तुळजापूर पोलिसांनी लातूर-सोलापूर बायपास उड्डाणपूल परिसरात संशयित वाहन तपासणीदरम्यान एक व्यक्ती गोवंशीय जनावरांचे गोमांस वाहतूक करताना आढळून आला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोहसिन युनुसअली शेख (वय ४५ वर्षे, रा. शनिवार पेठ, सोलापूर) हा टो रिक्षा क्रमांक एमएच-१३-जी-९०७२ मध्ये अंदाजे १०० किलो गोमांस, किंमत सुमारे ३५ हजार रूपये विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचे पोलिसांना निदर्शनास आले.

या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५(सी), ९(अ) अन्वये तुळजापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## जयप्रकाश विद्यालयाचे क्रीडांगणात यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी करत डॉजबॉल स्पर्धेत विभागीय स्तरावर प्रवेश मिळवला आहे. दि.२७ नोव्हेंबर रोजी या यशस्वी खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा येथे दि.२५ नोव्हेंबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय डॉजबॉल स्पर्धेत विद्यालयाच्या संघांनी चमकदार कामगिरी केली. १७



वर्ष व १९ वर्ष मुलींच्या दोन्ही संघांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून दोन्ही संघांची विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे.

क्त मुलांच्या १७ व १९ वर्ष वयोगटातील संघांनीही द्वितीय क्रमांक मिळवून आपली ताकद सिद्ध केली.

विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे, क्रीडा शिक्षक प्रशांत कोळगे व अश्विन कुमार पवार यांनी विशेष मार्गदर्शन केले.

सत्कार सोहळ्याला डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर अभिजित घोळवे यांनी आभार मानले.

धाराशिव **दिनांक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## निष्काळजी वाहनचालकामुळे अपघात; एकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२७ नोव्हेंबर -**
सुपतगाव येथील दोन व्यक्तींचा मोटरसायकल अपघातात सहभाग असलेल्या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून आरोपी चालकावर निष्काळजी वाहनचालकाचे गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही घटना दि. २३ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री १२.४५ वाजता घडली.

आरोपी नागनाथ आप्पाराव हेंडगे, रा. सुपतगाव, ता. उमरगा, जि. धाराशिव हे आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र. चक २५ इऊ ८४३५ निष्काळजीपणे व हायस्पीडमध्ये चालवत होते. त्याच मोटरसायकलवर त्यांचे सोबत महादेव शिवाप्पा लामजने (वय ४९ वर्षे) हे देखील होते. वाहनाचा ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात महादेव लामजने गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताची पत्नी रेखाताई महादेव लामजने (वय ४३ वर्षे) यांनी दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून मुरुम पोलिस ठाण्यात भा.न्या.सं. कलम २८१, १०६(१), १२५(ए), १२५(बी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी घेतले श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन

**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**
राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले,महाराष्ट्राच्या एकात्मतेसाठी, सामाजिक बांधिलकीसाठी आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी आईच्या चरणी साकडे घालून संपूर्ण राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली. महाराष्ट्राची एकात्मता आणि सामाजिक सलोखा कायम अबाधित राहो, लोकशाहीचे रक्षण आणि राज्याची विस्कटलेली घडी पुन्हा उभी करण्याची शक्ती आम्हाला लाभो. आई भवानीचा आशीर्वाद आणि जनतेचा आशीर्वाद आमच्या कार्याला अधिक बळ देणारा आहे. माता तुळजाभवानी आमच्या प्रार्थना नक्कीच ऐकेल, अशी श्रद्धाभाव व्यक्त केला. यावेळी ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, अनिल शिंदे, जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील, शहराध्यक्ष अमर चोपदार, राकेश चोपदार, वैभव शिंदे आदी उपस्थित होते.



### किलजमध्ये संविधान पुस्तिकेचे वाटप

**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**
तालुक्यातील किलज येथे संविधान दिनाच्या निमित्ताने किलज येथील युवा नेतृत्व वैभव शिवराज मर्डे यांच्या मार्फत श्री सिद्धेश्वर विद्यालय व ग्रामपंचायत कार्यालय किलज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान पुस्तके भेट आणि विद्यालयातील १०५ शालेय विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी वैभव भैय्या मर्डे यांनी आयोजित कार्यक्रमात बोलताना संविधान दिवस हा का साजरा केला जातो यांसह विध्यार्थ्यानी शैक्षणिक जीवनात कशी वाटचाल करावी याबदल मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमास गजेंद्र भोयटे, माजी. ग्राम. सदस्य. भरत गवळी हे उपस्थित होते. तर विद्यालयाचे मुख्याध्यापक एन. काळे, शिक्षक एस. येळकोटे, एस. घोगरे, गायकवाड, गवळी यांच्यासह विध्यार्थी आणि मित्र परिवार उपस्थित होते.



### गणेश शिंदे यांचा सत्कार

**कळंब, दि.२७ नोव्हेंबर -**
कळंब येथे दि.२७ नोव्हेंबर रोजी मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे यांच्या हस्ते कळंब येथील नुतन आलेले उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांचा सत्कार पुष्प गुच्छ देऊन करण्यात आला. या सत्कार प्रसंगी पत्रकार अनिल गाडे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब टोपे, सुनील ताटे, सतीश टोपे, नटराज गायकवाड यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### शरद पवार गटाच्या वाशी तालुका महिला अध्यक्षपदी स्वाती जोगदंड

**वाशी, दि.२७ नोव्हेंबर -**
वाशी तालुक्यातील पिंपळगाव (क) येथील स्वाती जोगदंड यांची शरद पवार गटाच्या वाशी तालुका महिला अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी



महिला कॉँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षा ॲड. मनीषा पाटील यांच्या हस्ते दि.२६ नोव्हेंबर रोजी जोगदंड यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची ठरत असून, स्वाती जोगदंड यांची संघटना मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे. पारगाव गटातून जोगदंड या शरद पवार गटाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. तालुक्यातील महिला कार्यकर्त्यांमध्ये या निवडीमुळे उत्साहाचे वातावरण असून, गटबांधणी आणि आगामी निवडणुकांसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

### भिमनगरमध्ये भारतीय संविधान दिन साजरा

**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**
तालुक्यातील काटी येथील भिमनगरमधील बुध्द विहारमध्ये बुधवार दि.२६ रोजी भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बुध्द विहारमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दलित मित्र नंदू बनसोडे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित सर्वांनी भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिकरीत्या वाचन केले. यावेळी दलित मित्र नंदू बनसोडे,कादर शेख, भिमराव घोंगडे, रवि डोळसे, सचिन बनसोडे, बाळासाहेब साबळे, सोजरबाई बनसोडे आदीजण उपस्थित होते.

# तुळजापूर : नगराध्यक्ष पदाची लढत दुरंगी

## महंत इच्छागिरी महाराजांच्या माघारीने राजकीय समीकरणे बदलली...



**शहरात प्रचारयुद्ध तापले...**
मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवार घराघरात जाऊन नमस्कार-चमत्कार करत असून प्रचारात वेगवेगळ्या युक्त्या लढवल्या जात आहेत. भाजप आणि कॉँग्रेसने काढलेल्या भव्य रॅल्या शहरात चर्चेचा विषय ठरल्या आहेत.

**मंदिर व शहर विकासासाठी निर्णायक निवडणूक...**
तुळजाभवानी मंदिर परिसर आणि शहराच्या भविष्यकालीन विकासासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची व निर्णायक मानली जात आहे.

**आमदार विरुद्ध खासदार : प्रतिष्ठेची लढत**
तुळजापूर नगर परिषद निवडणूक ही राज्यभराचे लक्ष वेधून घेणारी ठरत आहे. या लढतीत आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि खासदार ओमराजे निंबाळकर यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. नगरपरिषदेवर सत्ता कोणाची येणार आणि या प्रतिष्ठेच्या लढतीत बाजी कोण मारणार, हे येणारा काळ ठरवणार आहे.

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२७ नोव्हेंबर -**
तुळजापूर नगरपरिषदेची निवडणूक शिगेला पोहोचली असून नगराध्यक्ष पदाचा राजकीय आखाडा दिवसेंदिवस पेटत चालला आहे. नगराध्यक्षपदासाठीची तिरंगी लढत महंत इच्छागिरी महाराजांच्या अनपेक्षित माघारीमुळे आता भाजपचे विनोद गंगणे व कॉँग्रेसचे अमर मगर यांच्यात थेट दुरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महंत इच्छागिरी महाराजांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे निवडणुकीतून माघार घेतल्याची घोषणा केली असली, तरी ईव्हीएम वर त्यांचे नाव कायम असल्याने ते रिंगणाबाहेर जाणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या माघारीचा लाभ कोणाला मिळणार, याबाबत शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.



नगराध्यक्ष पदासाठी विनोद गंगणे, अमर मगर, महंत इच्छागिरी महाराज, विजय शाम राज, अविनाश पवार, दत्तात्रय कदम, संदीप शिरसाट असे एकूण सात उमेदवार रिंगणात आहेत तर ११ प्रभागांतील २३ नगरसेवक जागांसाठी ६३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

या निवडणुकीत एकूण २९,५६१ मतदार मतदान करणार आहेत.

पुरुष : १४,५३८, महिला : १५,०१७, तृतीयपंथी : ६. मतदानासाठी ३५ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत.

## शिवसेनेच्या दोन्ही उमेदवारांना विजय मिळवून देण्यासाठी एकजुटीने काम करा : आ. राजन साळवी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ नोव्हेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या दोन्ही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी शिवसैनिकांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन शिवसेना (शिंदे गट) धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख आमदार राजन साळवी यांनी केले.

दि.२७ नोव्हेंबर रोजी आमदार साळवी यांनी नळदुर्ग येथील शिवसेना शिंदे गटाच्या संपर्क कार्यालयाला भेट देऊन निवडणूक तयारीचा आढावा घेतला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, तसेच प्रभाग क्र.२ मधील शिवसेनेचे उमेदवार शंकर वाघमारे व सुमन ठाकुर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

शिवसैनिकांशी संवाद साधताना आमदार साळवी म्हणाले, शिवसैनिकांनी निष्काळजी न राहता प्रभाग क्र.२ मधील दोन्ही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी घराघरात पोहोचावे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात पूर्ण ताकदीने काम करून शिवसेनेचे उमेदवार विजयी करावेत.

या कार्यक्रमाला उपशहरप्रमुख अफजल कुरेशी, युवा सेनेचे शहरप्रमुख विजय ठाकुर, तसेच सुनील गव्हाणे, विश्वजित कांबळे, महादेव वाघमारे, किशोर घोडके, आकाश घोडके यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भुममध्ये ज्वेलर्स दुकाने फोडून चांदीचे दागिने चोरी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ नोव्हेंबर -**
वालवड येथील आठवडी बाजार परिसरातील दोन ज्वेलर्स दुकानांचे कुलूप तोडून चांदीचे दागिने चोरीस गेल्याची घटना समोर आली आहे. ही चोरी दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.३० ते दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ६.०० या कालावधीत घडली.



पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी तानाजी आनंतराव वेदपाठक (वय ४३ वर्षे), रा. बावी, ता. भुम यांनी दिलेल्या माहितीनुसार वाल्मीकेश्वर मंदिर रोडवरील ओम ज्वेलर्स व शेजारील न्यू प्रेम ज्वेलर्स या दुकाने अज्ञात व्यक्तीने कुलूप तोडून व शटर उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी १,९६० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, अंदाजे ९८ हजार रूपये किंमतीचे, चोरून नेल्याचे आढळले.

या प्रकरणी तानाजी वेदपाठक यांनी दि.२६ नोव्हेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास भुम पोलीस करीत आहेत.

## कळंब आगारात श्री दत्त जयंती उत्सव सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ नोव्हेंबर -**
कळंब येथील आगारात श्री दत्त जयंती उत्सव सप्ताहाची सुरुवात उद्या शुक्रवार, दि.२८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता आगार व्यवस्थापक एस.डी. खताळ यांच्या हस्ते दीपपूजनाने होणार आहे. या उद्घाटनानंतर विविध पूजन विधी पार पडणार असून संतोष जोशी कलश पूजन, बालाजी भारती मंडप पूजन, हनुमंत पुरी ध्वजपूजन, विना पूजन विपीन कटारे, औदुंबर पूजन निलेश जाधव, हुंडी पूजा श्री लोहार, ग्रंथ पूजा डॉ. कल्याणकर, झोळी पूजन शिवाजी पचमिरे तसेच नामस्मरण लक्ष्मण शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.



सकाळी ६ काकडा आरती

सकाळी ७ ते ८ वाजेपर्यंत विष्णुसहस्त्रनाम पाठसेवा, सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत श्री गुरुचरित्र पारायण, दुपारी १२ वाजता श्री नैवेद्य, सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत महिला भजनी मंडळ, कळंब यांचे भजन व हरिपाठ हभप. सुनीता देवी अडसूळ महाराज या हरिपाठाचे नेतृत्व करणार आहेत.

या सप्ताहात दररोज विविध भजनी मंडळांचा सहभाग राहणार असून, धार्मिक वातावरण अधिक उत्साही होणार आहे.

दि.५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ वाजता हभप. बळीराम महाराज कवडे यांचे दत्त जयंती निमित्त गुलाल व काल्याचे कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. यानंतर महाप्रसादाचे आयोजन असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून धार्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन कळंब आगारातील वाहक-चालक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रुईभर विविध कार्यकारी सोसायटी बिनविरोध; चेअरमनपदी धनंजय चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ नोव्हेंबर -**
रुईभर विविध कार्यकारी सोसायटीच्या निवड प्रक्रियेत प्रत्येक वर्षी एकास संधी देण्याच्या ठरलेल्या पद्धतीनुसार यावर्षी भारतीय जनता पक्षाचे धनंजय चव्हाण यांची चेअरमन पदासाठी तर निलावती रोहिदास वडवले यांची व्हाईस चेअरमन पदासाठी बिनविरोध निवड करण्यात आली.



निवडीनंतर डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भगवानआबा गुलाबगिरी महाराज यांच्या वतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषकोळगे, शिवाजी पवार, आगतराव भोईटे, राजाराम कोळगे, रामदास कोळगे, शशिकांत कोळगे, बालाजी कोळगे, पांडुरंग कोळगे, नवनाथ गव्हाणे, मारुती कस्पटे, हरिदास गव्हाणे, पांडुरंग आगळे, बाबासाहेब कोळगे, नानासाहेब पवार, शाहूराज मते, राजेंद्र गव्हाणे, अशोक सिरसाठे, दत्तात्रय बनसोडे, अशोक गव्हाणे, दशरथ कस्पटे, अमर भोईटे, महादेव शिंपले, बालाजी वडवले, प्रशांत कोळगे, नवनाथ शेरखाने आदी मान्यवर उपस्थित होते. निवडणूक अधिकारी म्हणून ए.आर. सय्यद, तर सहाय्यक म्हणून नानासाहेब कदम यांनी काम पाहिले.

संपूर्ण निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## शेतातील झोपडी फोडून ४० हजारांची चोरी

**परंडा, दि.२७ नोव्हेंबर -**
रोसा शिवारातील शेतातील झोपडी फोडून रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ४० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी शैलेश आनंदराव बेले (वय ३९ वर्षे), रा. जवळी, ता. पुसद, जि. यवतमाळ, ह.मु. रोसा, ता. परंडा यांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना दि.२६ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ वाजता घडली. रोसा शिवारातील सचिन जगताप यांच्या शेतातील झोपडीमध्ये आरोपी विजय सह्रे, व त्याचे तीन साथीदार यांनी घुसून रोख ३५ हजार रूपये व मोबाईल फोन असा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.




## तलवारासह युवक ताब्यात; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ नोव्हेंबर -**
रत्नापूर पाटी परिसरात बेकायदेशीरपणे तलवार बाळगणाऱ्या एक विधी संघर्ष बालकास येरमाळा पोलिसांनी ताब्यात घेतले. दि.२६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता झालेल्या या कारवाईत आरोपी राहुल उर्फ काळ्या अनिल काळे (वय १९ वर्षे), रा. खामकरवाडी पारधी पिडी, ता. वाशी, जि. धाराशिव हा विनापरवाना तलवार जवळ ठेवून लोकांच्या जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या परिस्थितीत आढळून आला.

पोलिस पथकाने घटनास्थळी आरोपीकडील तलवार जप्त केली. याबाबत अमोल विकास जाधव, पोलिस ठाणे येरमाळा येथे कार्यरत, यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शस्त्र कायदा कलम ४, २५ सह भा.न्या. सं. कलम १३५ मपोका अन्वये येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या रणसंग्रामाला उधाण; चौरंगी लढतीत प्रचाराचा कळस

### निकाल ३ डिसेंबरला

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ नोव्हेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक चांगलीच रंगात आली असून भाजप, कॉँग्रेस, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (अजित पवार गट), राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (शरद पवार गट), एमआयएम, वंचित बहुजन आघाडी तसेच अपक्ष उमेदवार असा बहुमुखी सामना शहरात पाहायला मिळत आहे. नगराध्यक्ष पदाच्या चौरंगी लढतीमुळे निवडणुकीत चुरस आणि अटीतटीचा उच्चांक गाठला आहे.

२ डिसेंबरला मतदान होणार असून अवघे तीनच दिवस उरल्याने प्रचाराचा धुरळा ऊडत आहे. कर्णकर्कश आवाजातील प्रचारगाणी, सततच्या उद्घोषणांमुळे नागरिक वैतागले आहेत. लहान मुले, वृद्ध यांच्यासाठी हा गोंगाट त्रासदायक ठरत आहे. एक गाडी गेल्यानंतर लगेच दुसऱ्या पक्षाची गाडी त्याच ठिकाणी थांबते, अशी परिस्थिती शहरात निर्माण झाली आहे.

या निवडणुकीत आमदार राणा जगजितसिंह पाटील, कॉँग्रेस नेते अशोक जगदाळे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे नगराध्यक्ष उमेदवार संजय बताले, तसेच एमआयएम चे उमेदवार शहेबाज काजी यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

पराभवानंतर काहींचे राजकीय अस्तित्वच संपुष्टात येऊ शकते, अशी परिस्थिति असून अनेकांसाठी ही लढत अक्षरशः 'करो वा मरो' बनली आहे.

**प्रचारात मोठ्या नेत्यांची लगबग**
भाजपच्या विजयासाठी आमदार राणा जगजितसिंह पाटील, तुळजाभवानी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, नितीन काळे यांची धडपड सुरू आहे.

**नगरसेवक पदासाठीही हाय व्होल्टेज लढत**
अनेक प्रभागांमध्ये अतिशय चुरशीच्या आणि हाय व्होल्टेज लढती होत असून प्रत्येक पक्षाचे उमेदवार सत्ता आमचीच असा दावा करीत आहेत. शहरातील मतदार कोणाच्या बाजूने निकाल देतील, याचा फैसला मात्र ३ डिसेंबर रोजीच होणार आहे.



भाजपचे बसवराज धरणे, कॉँग्रेसचे अशोक जगदाळे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि एमआयएमचे शहेबाज काजी यांच्यात सरळ चौरंगी लढत आहे.

मतदार घराघरातून सर्वांना 'तुम्हालाच मत देतो' असा प्रतिसाद देत असल्याने उमेदवारांकडे नेमकी स्थिती धूसर आहे. कार्यकर्तेही सर्व पक्षांच्या रॅलीत फिरताना दिसत असल्याने उमेदवार गोंधळले आहेत. काही जण तर शहाण्याने निवडणूक लढवू नये, अशा प्रतिक्रिया देताना दिसत आहेत.

कॉँग्रेसचे उमेदवार अशोक जगदाळे स्वतःच मैदानात असून ठाकरे गटाचे कमलाकर चव्हाण, सरदारसिंग ठाकूर व संतोष पुदाले यांचा त्यांना पाठिंबा आहे. राष्ट्रवादी (अजित पवार गट) : अजित पवार यांच्या जाहीर सभेनंतर मोठे नेते न दिसूनही उमेदवार संजय बताले, मुश्ताक कुरेशी, शफीभाई शेख त्यांच्या परीने प्रचारात गुंतले आहेत.

एमआयएम : उमेदवार शहेबाज काजी यांच्या सभेला प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील आणि हाजी फारूक शाब्दी यांच्या उपस्थितीमुळे मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद चर्चेत आहे.